फेब्रुवारी २०१५ / पाने ६० / किंमत ₹१०

# लोकराज्य











## महाराष्ट्राची ग्लोबल भरारी

# एक प्रसन्न क्षण...



अमेरिकेचे राष्ट्रपती बराक ओबामा यांच्या स्वागत समारंभानिमित्त राष्ट्रपती भवनात आयोजित ॲट होम या चहापानाच्या कार्यक्रमात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि श्री. ओबामा

वर्ष ६६ वे | अंक ८ | फेब्रुवारी २०१५

माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, महाराष्ट्र शासन

# लोकराज्य

## संपादन

- अतिथी संपादक — मनीषा पाटणकर-म्हैसकर
- मुख्य संपादक — चंद्रशेखर ओक
- संपादक — सुरेश वांदिले
- कार्यकारी संपादक — प्रवीण टाके
- विशेष सहकार्य — कीर्ती पांडे, क्रिती लाला
- उपसंपादक — प्रवीण कुलकर्णी, राजाराम देवकर

## प्रशासन

- प्रशासन व वितरण अधिकारी — दिगंबर पालवे
- वितरण अधिकारी — विलास बोडके
- साहाय्य — विद्या कदम, नितीन कुटे

## मांडणी

- मुखपृष्ठ — सीमा रनाळकर
- मांडणी, सजावट — शैलेश कदम
- मुद्रण — एच.टी. मीडिया लि. दिघे, नवी मुंबई

## पत्ता

माहिती व जनसंपर्क महासंचालनालय,
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरू चौक,
दालन क्र. ३३, तळ मजला, मंत्रालय, मुंबई-३२.
संपादकीय संपर्क : ०२२-२२६२२२१६
email : lokrajya2011@gmail.com

## वितरण आणि वर्गणीदार

वर्गणीदार व तक्रार निवारण - ०२२-२२०२१५३०
वितरण - ०२२-२२६१६९७६
email : lokrajyavitaran@gmail.com
lokvitaran@dgipr.maharashtra.gov.in

ई - लोकराज्य http://dgipr.maharashtra.gov.in


# अंतरंग


## ग्लोबल महाराष्ट्राची डायनॅमिक झेप

स्वित्झर्लंडमधील दाव्होस येथे झालेल्या जागतिक आर्थिक परिषदेत (वर्ल्ड इकॉनॉमिक फोरम) मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी राज्याच्या औद्योगिक विकासाला गती मिळेल, या अनुषंगाने विविध सत्रांमध्ये 'मेक इन महाराष्ट्र'ची संकल्पना प्रभावीपणे मांडली. महाराष्ट्राने 'रेड टेप'ला बाजूला सारून 'रेड कार्पेट'चे धोरण कसे अवलंबले आहे हे त्यांनी उद्योगजगतासमोर ठळकपणे मांडले. ६




## आपले सरकार
## शासनाशी संवाद आता एका क्लिकवर

१०

लोकाभिमुख प्रशासनासाठी थेट संवादाचे दालन आपले सरकार या वेबपोर्टलच्या माध्यमातून उपलब्ध करून देण्यात आले आहे.



## रेल्वे फास्ट ट्रॅकवर

केंद्रीय रेल्वे मंत्री सुरेश प्रभू यांची विशेष मुलाखत १६

## शेवटच्या घटकाला न्याय

आदिवासी विकास मंत्री विष्णू सवरा यांची मुलाखत १८





## सुयोग्य नियोजन आणि कामाचा झपाटा

एक दिवस मंत्री सुभाष देसाई यांच्यासोबत.. २०



## परिवर्तनाची दिशा

मराठी भाषा गौरव दिनानिमित्त आजच्या मराठी भाषेच्या विकासाचा आढावा ८८ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे नियोजित अध्यक्ष व संत साहित्याचे गाढे अभ्यासक डॉ. सदानंद मोरे यांनी खास घेतला आहे. २२

## जलयुक्त शिवार



या योजनेद्वारे २०१९ पर्यंत संपूर्ण महाराष्ट्र टंचाईमुक्त करण्यात येणार आहे. २४

## दारूबंदी ते व्यसनमुक्ती

चंद्रपूर जिल्ह्यात दारूबंदीचा ऐतिहासिक निर्णय घेऊन महिलांना मोठा दिलासा देण्यात आला आहे. ३६

## प्रभावी मुख्यमंत्री.. उत्स्फूर्त प्रतिसाद

गांधीनगर येथील जागतिक प्रवासी दिवस कार्यक्रमात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी गुंतवणुकीसाठी महाराष्ट्राचे महत्त्व उपस्थित देश-विदेशातील मान्यवरांच्या मनावर ठसवले. ३०

## याशिवाय


- सरस महिला.. सक्षम महिला
- शासन-मंत्रिमंडळ निर्णय/ विशेष वार्ता
- **निरामय :** नको भीती क्षयरोगाची
- **भ्रमंती:** आपलो मालवण
- **प्रेरणा :** आपणच आपले मार्गदर्शक
- दिल्लीतील महाराष्ट्र



### आश्वासक

लोकराज्य जानेवारी २०१५ चा 'नवे वर्ष नवे संकल्प' हा अंक आवडला. नव्या सरकारने आश्वासक वाटचाल करत जनहिताचे निर्णय घेण्यास सुरुवात केल्याने जनसामान्यांना दिलासा मिळाला आहे. मंत्र्यांची ओळख व त्यांचे संकल्प कळले. महाराष्ट्राच्या विकासाची दिशा याच मासिकातून कळते.

– **दीपाली कदम,** मोहने, कल्याण




### खात्री पटली

लोकराज्य जानेवारी २०१५ चा अंक अप्रतिम वाटला. यामध्ये सर्व मंत्र्यांनी महाराष्ट्राच्या हितासाठी जे संकल्प केले आहेत ते वाचून खूप आनंद झाला. या संकल्पामुळे महाराष्ट्राची गतिमान प्रगती होईल, याची खात्री पटली.

– **संदेश सोनवलकर,** सांगली

### माहितीपूर्ण


मी लोकराज्य मासिकाचा नियमित वाचक आहे. डिसेंबर २०१४ चा अंक उत्कृष्ट माहितीपूर्ण व संग्राह्य आहे. मुंबई गतिमान, डिजिटल महाराष्ट्र हे लेख अधिक वाचनीय वाटले.

– **प्रतिक कांबळे,** वाई शहर

### सिंचनासाठी भक्कम तरतूद हवी

नोव्हेंबर २०१४ चा अंक केवळ देखणाच नव्हे तर कार्यक्षमता, पारदर्शकता आणि लोकाभिमुख प्रशासनाचा हा वचननामा ठरावा, असे त्याचे रूप आहे. खेड्यांची स्थिती बिकट आणि तेवढीच भयावह आहे. आत्महत्या वाढल्या आहेत. त्यामुळे केवळ पॅकेज जाहीर करून चालणार नाही. त्यासाठी भक्कम सिंचनाची तरतूद हवी. स्वच्छता अभियानाप्रमाणे शेततळ्यांच्या माध्यमातून पाणी अडवा पाणी जिरवाचा नारा द्यावा.

– **ॲड. एकनाथ साळवे,** माजी आमदार, चंद्रपूर




### वाचनीय

लोकराज्य नोव्हेंबरचा अंक खूप माहितीपूर्ण आहे. आमदारांची यादी, पक्षनिहाय जागा, मंत्र्यांची ओळख आदी माहिती महत्त्वपूर्ण वाटली. हा अंक संग्रही ठेवण्यासारखा आहे. सप्टेंबरचा प्रेरणा हा विशेषांक दहावीच्या विद्यार्थ्यांना वाचून दाखविला. त्यातील मनोगते प्रेरणादायी आहेत. कमी मूल्यामध्ये अचूक आणि चांगली माहिती उपलब्ध होते.

– **प्र. दा. पगार,** नाशिक

### ग्रामीण विद्यार्थ्यांसाठी उपयुक्त

लोकराज्यच्या सप्टेंबर २०१४ च्या प्रेरणा या स्पर्धा परीक्षा विशेषांकाची खूप उत्सुकता होती. हा अंक हातात पडताच पूर्णपणे वाचून काढला. या विशेषांकातील विविध स्पर्धा परीक्षांची इत्थंभूत माहिती, प्रशिक्षण संस्थांची ओळख, यशस्वी उमेदवारांनी सांगितलेली यशाची सूत्रे ही आमच्यासारख्या ग्रामीण भागात राहून स्पर्धा परीक्षेची तयारी करणाऱ्यांना नक्कीच उपयुक्त, प्रेरक व मार्गदर्शक ठरली.

– **शुभांगी पवार,** सातारा




### अप्रतिम

लोकराज्य नोव्हेंबर २०१४ चा अंक अप्रतिम वाटला. लोकराज्यच्या परंपरेनुसार हा अंक दर्जेदार झाला आहे. यामधील नवीन मंत्र्यांचा परिचय महत्त्वपूर्ण आहे. सुधीर पाठक यांचा लेख आवडला. असाच वाचनीय 'लोकराज्य' आम्हाला मिळत राहो, ही इच्छा.

– **विष्णू सोळंके,** अमरावती

### प्रतिक्रियांचे स्वागत

लोकराज्य अंकाची गुणवत्ता आणि संदर्भमूल्य वाढवण्यासाठी आपल्या प्रतिक्रिया अवश्य पाठवा.

**पत्ता : संपादक, लोकराज्य, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, पाचवा मजला, गोकुळदास तेजपाल रुग्णालय संकुल, नवीन मंत्रालय, लोकमान्य टिळक मार्ग, मुंबई-४०० ००१**

## वार्षिक वर्गणी

**वरिष्ठ सहायक संचालक (प्रकाशने), माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, बॅरेक नं. १९, फ्री प्रेस जर्नल मार्ग, मुंबई-४०००२१ या पत्त्यावर मनीऑर्डरने पाठवावी किंवा 'लेखाधिकारी, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई' यांच्या नावे मुंबई येथे वठणाऱ्या शाखेचा डिमांड ड्राफ्ट पाठवावा. लोकराज्य अंकाच्या वर्गणीदारांनी नूतनीकरणासाठी वार्षिक वर्गणी पाठवताना आपला वर्गणी क्रमांक कळवावा. (प्रति अंक मूल्य १० रुपये, वार्षिक वर्गणी रु. १००)**

लोकराज्यची वर्गणी ऑनलाईन भरण्यासाठी

http://dgipr.maharashtra.gov.in

* या अंकात व्यक्त केलेल्या मतांशी शासन सहमत असेलच असे नाही.

अतिथी संपादकीय



# बदलता महाराष्ट्र

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी स्वित्झर्लंडमधील दाव्होस येथे आयोजित वर्ल्ड इकॉनॉमिक फोरम - २०१५ मध्ये भारताच्या अधिकृत शिष्टमंडळात केंद्रीय अर्थमंत्री अरूण जेटली, ऊर्जा राज्यमंत्री पीयूष गोयल यांच्यासोबत महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा खास समावेश केला होता. दाव्होस येथे विविध बैठकांमध्ये मुख्यमंत्र्यांनी महाराष्ट्र हे उद्योगधंद्याच्या उभारणीसाठी सर्वोत्कृष्ट राज्य असल्याचे प्रभावीपणे उपस्थितांच्या मनावर बिंबवले.

उत्तम पायाभूत सुविधा, कुशल मनुष्यबळ आणि चांगली कायदा व सुव्यवस्था यामुळे महाराष्ट्र हा गुंतवणूकदारांना नेहमीच आकर्षित करत आला असल्याची बाब मुख्यमंत्र्यांनी गांधीनगर येथे पार पडलेल्या 'प्रवासी भारतीय दिवस' कार्यक्रमातसुद्धा जगभरातून आलेल्या उद्योजक आणि त्यांच्या प्रतिनिधींच्या मनावर बिंबवली. महाराष्ट्रात आता लालफितीला फाटा देण्यात आला असून उद्योजकांचे स्वागत लाल गालिच्याने करण्यात येईल, असे मुख्यमंत्र्यांनी दोन्ही ठिकाणी स्पष्ट केले.

या अंकात आम्ही केंद्रीय रेल्वेमंत्री सुरेश प्रभू यांची विशेष मुलाखत दिली आहे. देशाच्या रेल्वे विकासासाठी असलेला त्यांचा नावीन्यपूर्ण दृष्टिकोन या मुलाखतीतून अधोरेखित झाला आहे. महिला सक्षमीकरणात महत्त्वाची भूमिका बजावत असलेल्या यंदाच्या 'सरस महालक्ष्मी' प्रदर्शनाचा आढावा वाचकांसाठी मेजवानी ठरेल.

२७ फेब्रुवारीला ज्येष्ठ कवी व ज्ञानपीठ विजेते कुसुमाग्रज यांचा जन्मदिवस 'मराठी भाषा गौरव दिन' म्हणून साजरा केला जातो. त्यानिमित्त पंजाबमधील घुमान येथे होणाऱ्या ८८व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे नियोजित अध्यक्ष डॉ. सदानंद मोरे यांचा मराठी भाषा विकासाचा अभ्यासपूर्ण आढावा घेणारा विशेष लेख हे या अंकाचे खास आकर्षण ठरावे.

**'लोकराज्य'**चे भावंड असलेल्या **'महाराष्ट्र अहेड'** या इंग्रजी नियतकालिकाचे रिलॉंचिंग गांधीनगर येथील 'प्रवासी भारतीय दिवसा'च्या निमित्त केले गेले. हा अंक **'मेक इन महाराष्ट्र'** या संकल्पनेवर आधारित होता. या अंकास **'प्रवासी भारतीय दिवसा'**ला उपस्थित असलेल्या मान्यवरांनी उत्तम प्रतिसाद दिला. **'जय महाराष्ट्र'** हा दूरदर्शनवरील कार्यक्रम आता संध्याकाळी ७:१५ ते रात्रौ ८:०० या 'प्राइम टाइम'मध्ये प्रसारित होणार आहे. त्यामुळे तो आणखी अधिकाधिक प्रेक्षकांपर्यंत जाण्यास साहाय्य होईल. **'महान्यूज'** या वेबपोर्टलने आता ट्विटस्वरून काही ठळक बातम्या देण्यास सुरुवात केली आहे. त्यामुळे नागरिक व माध्यमांना शासकीय घडामोडी लवकरात लवकर कळण्यास मदत होत आहे. लोकराज्यच्या इतर अंकांप्रमाणेच हा अंकही वाचकांना आवडेल अशी खात्री आहे.

लोकराज्यमधील लेखांचे पुनर्मुद्रण केल्यास आम्हाला आनंदच होईल.

**मनीषा पाटणकर-म्हैसकर**
सचिव
(माहिती व जनसंपर्क महासंचालनालय)




# ग्लोबल महाराष्ट्राची डायनॅमिक झेप

**स्वित्झर्लंडमधील दाव्होस येथे झालेल्या जागतिक आर्थिक परिषदेत (वर्ल्ड इकॉनॉमिक फोरम) महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस सहभागी झाले होते. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी भारतीय शिष्टमंडळात त्यांचा खास समावेश केला होता. या परिषदेमध्ये त्यांनी राज्याच्या औद्योगिक विकासाला गती मिळेल, या अनुषंगाने विविध सत्रांमध्ये 'मेक इन महाराष्ट्र'ची संकल्पना प्रभावीपणे मांडली. महाराष्ट्राने 'रेड टेप'ला बाजूला सारून 'रेड कार्पेट'चे धोरण कसे अवलंबले आहे हे त्यांनी उद्योगजगतासमोर ठळकपणे मांडले. राज्याचा कारभार हातात घेऊन शंभर दिवस होण्याआधीच निर्णयांमध्ये गतिमानता आणि पारदर्शकता आणून नवा महाराष्ट्र घडवण्याची प्रक्रिया सुरू केल्याचे उपस्थितांच्या मनावर बिंबवण्यास मुख्यमंत्री यशस्वी ठरले. हेच या दौऱ्याचे फलित!**

स्वित्झर्लंड या देशातील दाव्होस येथे भरणारी जागतिक आर्थिक परिषद (वर्ल्ड इकॉनॉमिक फोरम) अनेक अर्थाने महत्त्वाची ठरते. आर्थिक-औद्योगिक प्रगतीच्या नव्या दिशा दाखवणाऱ्या आणि विकास प्रक्रियेला गतिमान करण्यास साहाय्यभूत ठरणाऱ्या या परिषदेत देश-विदेशातील महत्त्वाच्या व्यक्ती, राज्यकर्ते, उद्योजक, अर्थतज्ज्ञ, अभियंते, बँकर्स, प्रशासकीय अधिकारी सहभागी होतात.

दाव्होस येथे जानेवारी महिन्यात झालेल्या ४५व्या वार्षिक परिषदेत महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस सहभागी झाले होते. भारताच्या प्रतिनिधी मंडळाचे सदस्य म्हणून देशाचे प्रतिनिधित्व करतानाच त्यांनी महाराष्ट्राच्या विकास प्रक्रियेला गतिमान करण्यासाठी उपयुक्त ठरतील अशा चर्चा आणि बैठकांवर लक्ष केंद्रित केले. या परिषदेच्या कालावधीत मुख्यमंत्र्यांनी जनरल इलेक्ट्रिक, नेस्ले, पेप्सिको, लॉरियल, इस्पात, जेट्रो, मित्सुई, नोवार्टिस, सॅफ्रन, कॉग्निझंट या व इतर उद्योग समूहांच्या प्रमुखांशी वा प्रतिनिधींशी चर्चा करून महाराष्ट्रात उपलब्ध असलेल्या विपुल गुंतवणूक संधींची माहिती संबंधितांना करून दिली. महाराष्ट्रात गतिमान बदल

घडवणाऱ्या पाच ठळक मुद्द्यांवर या परिषदेत भर देण्यात आला.

### जागतिकीकरण आणि शेतकऱ्यांची उन्नती

आतापावेतो जागतिक आर्थिक परिषदेमध्ये संघटित आणि समृद्ध क्षेत्राविषयी अधिक चर्चाविनिमय करून हे क्षेत्र आणखी कसे विकसित होईल याकडे लक्ष पुरवले जाई. मात्र मुख्यमंत्र्यांनी इथे वेगळा मुद्दा मांडला. कृषी क्षेत्रासारख्या असंघटित क्षेत्राकडे प्राधान्याने लक्ष पुरवण्याकडे त्यांनी भर दिला आहे. 'शेपिंग ग्लोबल लिडरशीप ऑन फूड सेक्युरिटी' या चर्चासत्रातील त्यांचे भाषण शेतकऱ्यांच्या समस्यांना प्रभावीपणे मांडणारे होते. कृषिक्षेत्राच्या विकासासाठी नव्या दृष्टिकोनाची गरज असल्याचे त्यांनी सांगितले. महाराष्ट्रातील शेतकऱ्यांचे हित प्राधान्याने लक्षात ठेऊन कृषिक्षेत्रात सार्वजनिक-खासगी-सहभागाची आवश्यकता त्यांनी प्रतिपादित केली. शेतकऱ्यांच्या साहाय्यासाठी साठवणूक प्रक्रिया, पॅकेजिंग, विपणन, ग्रेडिंग यांसारख्या सुविधा उपलब्ध करणे आवश्यक असल्याचे त्यांनी निदर्शनास आणले. पेप्सिको, युनायटेड फॉस्फरस, एनव्हीए इंडिया बिझिनेस कौन्सिल, बेयर, चिप इंडिया, डाऊ ॲग्रो सायन्स, डीएसएम इंडिया, जैन इरिगेशन, केआरबीएल लिमिटेड, लुईस ड्रायफ्रुटस् इंडिया, मेरस्क इंडिया, मोनसॅन्टो, नेस्ले इंडिया, नोव्हाझाईम्स इंडिया, पेप्सिको इंडिया, स्टेट बँक इंडिया, स्विस रिइंशुरन्स कंपनी, वाल-मार्ट इंडिया, विल्मर, यारा इंडिया या कंपन्यांचे सहकार्य कृषिक्षेत्राच्या विकासासाठी मुख्यमंत्र्यांनी अपेक्षिले.

भारताच्या कृषी मंत्रालयाने तयार केलेल्या लघुकृषक कृषी व्यापार संघ (SFAC - स्माल फार्मर्स ॲग्री बिझनेस) या कृषी व्यापारासाठी असलेल्या कार्पोरेट साखळीने ५ लाख शेतकऱ्यांना जोडले आहे. यामुळे शेतकऱ्यांना त्यांच्या कृषिमालाची विक्री योग्य भावात करणे शक्य होत आहे. तसेच शेतकरी आणि ग्राहक यांच्यातील दरी कमी होऊन या क्षेत्रात

मेक इन महाराष्ट्र

Devendra Fadnavis
@Dev_Fadnavis

Schindler's Mr Jürgen Tinggren agrees to invest in Maharashtra. Appreciates Ease in doing business as fast as in China




**फोक्सवॅगन कंपनीचे डॉ. लिफ ऑस्टलिंग यांच्याशी महाराष्ट्राला छोट्या कारच्या उत्पादनाचे जागतिक केंद्र बनवण्याबाबत चर्चा करताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस.**



**जागतिक आर्थिक परिषदेच्या सत्रात देशाची भूमिका मांडताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस.**

## अशी होणार गुंतवणूक

| जनरल इलेक्ट्रिक | कॉग्निझंट |
| --- | --- |
| **रु.३००० कोटी** | **रु.३०० कोटी** |

- महाराष्ट्राला मोठा प्रतिसाद – २२ बैठकांचे नियोजन, मात्र प्रत्यक्षात झाल्या ३० बैठका
- महाराष्ट्रातील शेतकऱ्यांना लाभदायक ठरेल अशा व्हॅल्यूचेनची (मूल्य साखळी) रचना–१४ पिकांचा समावेश–उत्पादन ते विक्री यावर भर– पहिल्या टप्प्यात १० लाख शेतकरी लाभान्वित.
- मायक्रोसाफ्ट – देशातील पहिले दोन मुख्य डाटा सेंटर महाराष्ट्रात सुरू करणार
- लष्करी साधनांच्या जागतिक दर्जाची उत्पादक कंपनी – सॅफ्रन (नागपूर येथे येण्यास उत्सुक)
- टेक्सटाइल पार्कसाठी – टोरे कंपनी (उत्सुक)

**या गुंतवणुकीमधून पुढील तीन वर्षात २०००० रोजगारांच्या संधी अपेक्षित**

अधिकाधिक रोजगाराच्या संधी निर्माण करणे शक्य झाले आहे. यामुळे ग्रामीण उत्पन्नात वाढ होण्यास मदत झाली आहे. लघुकृषक साखळीचा २५ लाख शेतकऱ्यांना लाभ मिळावा यासाठी महाराष्ट्र प्रयत्नशील आहे. या परिषदेने याकरीता सहकार्य करावे अशी अपेक्षा मुख्यमंत्र्यांनी व्यक्त केली. जागतिक अर्थ परिषदेने यासाठी पूर्ण सहकार्य देण्याचे कबूल आहे. या अनुषंगाने पाठपुराव्यासाठी परिषदेमार्फत मुंबई येथे विशेष बैठक आयोजित केली जाणार आहे. कृषी विभागामार्फत शेतकऱ्यांच्या उत्पादनाला अधिक मूल्यवृद्धी व्हावी म्हणून विशेष धोरणे कार्यान्वित केली जाणार आहेत.

शाश्वत जलपुरवठ्याच्या अनुषंगाने आयोजित 'ग्लोबल वॉटर अजेंडा' या चर्चासत्रात मुख्यमंत्री सहभागी झाले. पाणीटंचाई दूर करण्यासाठी महाराष्ट्र शासनाने अंगिकारलेल्या 'जलयुक्त शिवार' योजनेची माहिती त्यांनी यावेळी दिली. जलसंवर्धन व्यवस्थापनाच्या अनुषंगाने ही योजना उपयुक्त ठरणार आहे. गोदावरी खोऱ्यामध्ये पाणीटंचाईच्या समस्येवर मात करण्यासाठी जलसंवर्धनाच्या विविध उपायांचा लाभ होऊ शकतो याकडे मुख्यमंत्र्यांनी लक्ष वेधले. बहुराष्ट्रीय कंपन्यांनी कार्पोरेट सोशल रिस्पॉन्सिबिलिटी (उद्योजकांची सामाजिक जबाबदारी) या अंतर्गत दुष्काळग्रस्त खेड्यातील टंचाई दूर करण्यासाठी पुढाकार घ्यावा यासाठी त्यांना आवाहन केले.

जैव तंत्रज्ञान आणि सेंद्रिय शेतीचे एकत्रीकरण करण्याची अभिनव कल्पना मुख्यमंत्र्यांनी यावेळी मांडली. विदर्भ आणि मराठवाडा या दुष्काळी भागात शेतकऱ्यांच्या उत्पादन खर्चात घट व्हावी यासाठी ही बाब उपयुक्त ठरू शकते. जैव तंत्रज्ञान पुढाकार हा केवळ नफा मिळवण्यासाठी नव्हे ही बाब लोकमानसावर बिंबवून त्यांच्यात या बाबतीत आत्मविश्वास निर्माण करण्यासाठी या विषयातील संशोधनात्मक सांख्यिकीवर भर देण्यावर मुख्यमंत्र्यांनी भर दिला.

### औद्योगिकदृष्ट्या मागास भागासाठी थेट परकीय गुंतवणुकीचे धोरण

दाव्होस ही आंतरराष्ट्रीय परिषद असली तर मुख्यमंत्र्यांनी अत्यंत कल्पकतेने राज्याच्या मागास भागाच्या विकासाचा प्रश्न वेगवेगळ्या व्यासपीठांवर आणला. मिहान प्रकल्पामध्ये उपलब्ध असलेला मुबलक जलसाठा, वायुसेनेच्या देखभाल केंद्राचे आणि बोईंगचे ठिकाण यांचा प्रभावीरीत्या दाखला देत 'सॅफ्रान' या जागतिक लष्करी उत्पादक कंपनीकडून नागपूर भेटीचे आश्वासन आणि नागपूर येथे लष्करी साधनांची निर्मिती, एरो-इंजिनीअरींगचे केंद्र उभारण्याविषयी विचार करण्याचे आश्वासन मिळवले.

नागपूर-अमरावती हे क्षेत्र जरी कापूस उत्पादनात आघाडीवर असले तरी या भागात वस्त्रोद्योग मात्र फारसे नाहीत. शिनिची कॉयझुमी आणि जपानी बहुराष्ट्रीय कंपनीस नागपूर येथे जागतिक दर्जाचे एकात्मिक वस्त्रोद्योग पार्क नागपूर येथे उभारण्यासाठी त्यांनी उद्युक्त केले. या पार्कच्या उभारणीसाठी सर्व प्रकारचे साहाय्य देण्याची त्यांनी तयारी दर्शवली. दिअॅजिओ या कंपनीची महाराष्ट्रात मोठी गुंतवणूक आहे. ही कंपनी आपला विस्तार आणखी करू शकते. या कंपनीच्या उत्पादनासाठी पाण्याची मोठी गरज भासते. ही गरज लक्षात घेऊन विपुल जलसाठा असलेला भूभाग उपलब्ध करून देण्याची या कंपनीने विनंती केली.

### १० टक्के दराने विकासवृद्धी

'इंडिया इन्व्हेस्टमेंट राऊंडटेबल', या चर्चेत केंद्रीय वित्त मंत्री अरुण जेठली, आंध्रप्रदेशचे मुख्यमंत्री चंद्राबाबू नायडू यांच्यासोबत मुख्यमंत्री सहभागी झाले होते. महाराष्ट्रात

## मेक इन महाराष्ट्र



**शिंडलर कंपनीसोबत महाराष्ट्रात गुंतवणुकीवर सकारात्मक चर्चा व निर्णय झाल्यानंतर या कंपनीचे जॉर्गन टिंगरेन यांच्यासमवेत मुख्यमंत्री.**

सत्तेत येऊन १०० दिवस होत असतानाच ठोस कृती आणि कार्यक्रमाद्वारे राज्याच्या विकासाचा दर १० टक्के करण्याची प्रक्रिया गतिमान झाल्याचे त्यांनी निदर्शनास आणले.

व्यवसाय, उद्योगाबाबत महाराष्ट्रातील वातावरणात मोठा बदल घडून येत असून परवाने ३ दिवसांत देण्यात येतात. परवान्यांचे नूतनीकरण गतीने केले जाते. मानीव परवानगी देण्यात येतात. औद्योगिक चटई निर्देशांक क्षेत्र ०.१५ वरून १ करण्यात आला आहे. जिल्हाधिकाऱ्यांकडून त्याची परवानगी तातडीने दिली जाते. त्यामुळे उद्योगांसाठी जागेची उपलब्धता सुलभ झाली आहे. पर्यावरणीय घटकांना पूर्ण संरक्षण देत परवानगी देण्याची प्रक्रिया सुलभ करण्यात आली आहे. या बाबी मुख्यमंत्र्यांनी ठळकपणे निदर्शनास आणल्या. त्याचे सकारात्मक परिणाम या परिषदेत तत्काळ दिसून आले. जनरल इलेक्ट्रिक कंपनीच्या व्हाईस प्रेसिडेंटनी पुणे येथे ३००० कोटी रुपयांची गुंतवणूक असणाऱ्या टप्पा-२ च्या उभारणीची घोषणा केली. कॉग्निझंटचे प्रमुख गॉर्डन कोबर्न यांनीही भारतात उद्योग करण्यासाठी उत्तम वातावरण असल्याचे सांगत पुणे येथील त्यांच्या कंपनीचा विस्तार करण्याची घोषणा केली. यामुळे २० हजार नव्या रोजगाराची निर्मिती होण्याची अपेक्षा आहे. ही गुंतवणूक ३०० कोटी रुपयांची राहील. हिंजेवाडी येथे गुंतवणूक करण्यासाठी ही कंपनी उत्सुक होती.

एमआयडीसीने या कंपनीसोबतच्या बैठकीमध्ये जमिनीच्या हस्तांतरणाची कागदपत्रे कंपनीला सुपुर्द करून गतिमान प्रक्रियेचा पुरावा दिला. लिफ्ट आणि एक्सलेटर निर्मितीच्या क्षेत्रातील जगातील आघाडीची शिंडलर ही कंपनी नदी नियामक क्षेत्राच्या काही नियमांच्या गुंत्यात अडकली होती. ही अभियांत्रिकी कंपनी असून कोणत्याही प्रकारच्या औद्योगिक, रासायनिक निचरा करत नाही. मात्र कंपनीचे ठिकाण नदीपासून १.८ किलोमीटरच्या क्षेत्रात येत असल्याने या कंपनीला २ वर्षांपासून उत्पादन करता येत नव्हते. महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने या कंपनीस उत्पादन सुरू करण्याची परवानगी दिली असतानासुद्धा अशी अडचण निर्माण झाली. केंद्रीय पर्यावरण संरक्षण नियमन आणि महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रणाच्या नियमांची पूर्तता या कंपनीने करताच कंपनीला उत्पादन सुरू करण्यास तत्काळ मान्यता देण्यात आली. महाराष्ट्रात सध्या मेट्रो रेलचा मोठा विस्तार होत आहे. त्यासाठी लागणारे एस्कलेटर हे स्वित्झर्लंडवरून आयात करण्यात येतात. शिंडलरचा प्रकल्प कार्यान्वित झाल्यावर हे एस्कलेटर आता स्थानिकरीत्या मिळतील व मोठा रोजगारही उपलब्ध होईल. निर्मिती क्षेत्रात महाराष्ट्र व देशात अत्यंत उत्साहाचे वातावरण असल्याची बाब या परिषदेत ठसवण्यात मुख्यमंत्री यशस्वी ठरले. नागरीकरण, दारिद्र्य निर्मूलन, तज्ज्ञांची मते, वस्तुनिष्ठ गटांची स्थापना करण्याबाबत या परिषदेने महाराष्ट्राला सर्वतोपरी सहकार्य करण्याचे आश्वासन दिले.

### नवे पर्व सहकार्याचे

**मुंबईला जागतिक दर्जाचे वित्तीय केंद्र बनविणे, राज्यात सिलिकॉन व्हॅलीची निर्मिती करणे, गतिमान औद्योगिक प्रगतीसाठी अडथळा ठरू शकणाऱ्या समस्यांचा शोध घेणे, या समस्या सोडवण्यासाठी थिंक टँकची स्थापना करणे, विविध योजना तयार करण्यासाठी साहाय्य करणे, मुंबई येथे आंतरराष्ट्रीय उद्योजक आणि तज्ज्ञांची गोलमेज परिषद भरवणे आदींबाबत जागतिक अर्थ परिषदेमार्फत सहकार्याचा हात पुढे करण्यात आला आहे.**



'महाराष्ट्र हे मोबाइल आणि कॉम्प्युटरच्या माध्यमातून सोशल मीडिया वापरणारे सर्वाधिक प्रगत राज्य आहे. दिवसभरात शेकडो एसएमएस मला येत असतात. यामध्ये ९० ते ९५ एसएमएस हे सूचना, मागण्या आणि तक्रारी करणारे असतात...बरेचशा बाबी व्यक्तिगतही असतात. काहींना माहिती हवी असते, काहींची जिज्ञासा असते, काहींच्या तक्रारी असतात, काहींना शासनाला काही सुचवायचे असते. लोकशाही व्यवस्थेत या साऱ्या लोकभावनांचा आदर झाला पाहिजे. प्रशासन हे लोकाभिमुख असले पाहिजे. त्यामुळेच आता थेट संवादाचे दालन महाराष्ट्राच्या जनतेच्या हाती मी देत आहे. थेट संवाद साधा, या बेवपोर्टलच्या माध्यमातून माझ्याशी बोला. हा संवाद दुहेरी असेल. आपल्या प्रत्येक मागणीला २१ दिवसात शासनाकडून प्रतिसाद दिला जाईल.'

आपले सरकार

# शासनाशी संवाद आता एका क्लिकवर

२६ जानेवारी २०१५ रोजी माहिती व तंत्रज्ञान विभागाने 'आपले सरकार' नवे वेबपोर्टल जनतेच्या हाती दिले आहे. मुख्यमंत्री महोदयांनी त्यांच्या पक्षाच्या जाहीरनाम्यातही जनतेच्या सूचनांचे प्रशासनात स्वागत आणि सहभाग करण्याठी १०० दिवसात वेबपोर्टल सुरू करण्याचे आश्वासन दिले होते. याशिवाय जगभरात राहणाऱ्या अनिवासी भारतीयांना ९ जानेवारी रोजी प्रवासी भारतीय दिनाच्या कार्यक्रमात त्यांनी थेट संवादासाठी 'आपले सरकार'



प्रजासत्ताक दिनाच्या मुहूर्तावर सह्याद्री अतिथिगृहामध्ये 'आपले सरकार' वेबपोर्टलचे लोकार्पण करताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस. सोबत मुख्य सचिव स्वाधीन क्षत्रिय, सामान्य प्रशासन विभागाचे अपर मुख्य सचिव डॉ. पी. एस. मीना, माहिती व तंत्रज्ञान विभागाचे प्रधान सचिव अजय मेहता, संचालक सूर्यकांत जाधव.


# ‘आपले सरकार’साठी असे व्हा लॉग ईन

‘आपले सरकार’ या वेबपोर्टलवर जाण्यासाठी www.aaplesarkar.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर जाणे आवश्यक आहे. मराठी आणि इंग्रजी भाषेत या वेबपोर्टलचा वापर करता येतो. मुखपृष्ठावर दर्शनी भागात ठळकपणे तीन आयकॉन येतात. यामध्ये तक्रार निवारण, माहितीचा अधिकार, सहयोग या तीन (आयकॉनचा) विभागाचा सहभाग आहे. यापैकी ज्या विभागामार्फत शासनाशी संवाद साधायचा असेल त्यामध्ये प्रवेश करा. आपला मोबाईल क्रमांक आणि ई–मेल पत्ता मात्र प्रतिसाद बघण्यासाठी नोंदणी करून टोकन आयडी मिळवणे आवश्यक आहे. उदाहरणार्थ तक्रार निवारण या विभागात एकदा आपण तक्रार दाखल केली की, आपला ट्रॅकिंग क्रमांक तयार होईल. या क्रमांकाच्या माध्यमातून आपल्या तक्रारीची सद्य:स्थिती बघता येईल. माहितीचा अधिकार ऑनलाइन मिळण्याची व्यवस्था दुसऱ्या भागात करण्यात आली आहे. ऑनलाइन पेमेंट ही सुविधा या विभागाचे वैशिष्ट्य आहे. तिसरा विभाग हा सहयोगाचा आहे. राज्यभरातील समाजसंवेदनशील नागरिकांसाठी सरकारला सूचना आणि नावीन्यपूर्ण कल्पना देण्यासाठी हे दालन आहे. यामध्ये सहा विभाग आहेत. यात युवा महाराष्ट्र, दुष्काळमुक्त महाराष्ट्र, मेक इन महाराष्ट्र, पर्यटन, डिजिटल महाराष्ट्र, स्वच्छ महाराष्ट्र या सहा विभागात सूचना मागवण्यात आल्या आहेत, तथापि याव्यतिरिक्त अन्य कल्पनाही ५०० शब्दात मांडल्या जाऊ शकतात.

मुख्यमंत्री महोदयांशी संपर्क या ठिकाणावरून साधला जाऊ शकतो. ऑडिओ, व्हिडीओ आणि पीडीएफ फाइल अपलोड करण्याची या वेबपोर्टलवर सुविधा आहे.




**तक्रार निवारण, माहितीचा अधिकार, सहयोग हे वेबपोर्टलचे तीन महत्त्वपूर्ण घटक आहेत.**




हे वेबपोर्टल सुरू करण्याचे सुतोवाच केले होते. डिजिटल महाराष्ट्राच्या धोरणातील हे पुढचे पाऊल असून राज्य शासनातर्फे जनतेला कालबद्ध सेवा देण्यासाठी आगामी काळात विधिमंडळात सादर होणाऱ्या सेवा हमी विधेयकाचा आरसा म्हणून या वेबपोर्टलचा उपयोग केला जाणार आहे. जनता आणि सरकारचे प्रभावी संवाद साधण्याचे माध्यम म्हणून हे वेबपोर्टल

## प्रवीण टाके

लोकाभिमुख करण्याचा शासनाचा उद्देश आहे. सध्या मंत्रालय स्तरावरील विभागासाठी हे पोर्टल कार्य करेल. त्यानंतर क्षेत्रीय आणि जिल्हास्तरावर त्याचा विस्तार होईल. संवादाची एक नवी क्रांती या वेबपोर्टलच्या माध्यमातून सुरू झाली आहे. त्यानुसार २६ जानेवारीला माध्यमांच्या पुढे या वेबपोर्टलचे लोकार्पण करण्यात आले.

### हे वेबपोर्टल काय आहे?

राज्यातील जनतेचा थेट मंत्रालयाशी संपर्क साधणारी ही ऑनलाइन व्यवस्था आहे.

**माहितीचा अधिकार ऑनलाइन करणारे पहिले राज्य**

या वेबपोर्टलमुळे माहितीचा कायदा ऑनलाइन करणारे महाराष्ट्र हे पहिले राज्य झाले आहे. या कायद्याचा वापर करताना कोर्ट फी स्टॅम्प वापरावे लागत होते. आता आपल्या बँक अकाऊंटमधून आवश्यक असलेले शुल्क इंटरनेट बँकिंग/डेबिट कार्ड/क्रेडिट कार्ड यांचा वापर करून अदा करता येईल.

मोबाइल व कॉम्प्युटरच्या माध्यमातून सरकारशी दुहेरी संवाद साधणारी ही इंटरनेट यंत्रणा आहे. ‘प्रतिसाद’ देण्याच्या प्रक्रियेतून शासन जनतेप्रती यामध्ये आपले ‘दायित्व’ २१ दिवसांत पूर्ण करते. मुख्यमंत्री कार्यालयातून या वेबपोर्टलचे नियंत्रण करण्यात येणार आहे. प्रतिसादाची हमी हे या वेबपोर्टलचे वैशिष्ट्ये आहे. ❐ ❐

# उद्योगांना नवसंजीवनी

**राज्यात 'मेक इन महाराष्ट्र' उपक्रम यशस्वी व्हावा म्हणून शासनाने सर्वोच्च प्राधान्य दिले आहे. महाराष्ट्रात उद्योग यावेत, असलेल्या उद्योगांची भरभराट व्हावी आणि रोजगाराच्या संधी येथील तरुणांना उपलब्ध व्हाव्यात यासाठी राज्यसरकार उद्योगांना सर्वतोपरी मदत करत आहे. त्याचबरोबर सरकारने दिलेल्या सवलतीतून उद्योग उभारत आहेत किंवा नाही, याकडेही सरकारचे लक्ष आहे. त्यामुळेच उद्योगांसाठी अकृषिक परवानगी घेतल्यानंतर त्यावर उद्योग उभा करणे आवश्यक असल्याचे मुख्यमंत्र्यांनी स्पष्ट केले आहे. त्याबाबतचे नियोजन करण्याचे संबंधित संस्थांना आदेश दिले आहेत.**

'मेक इन इंडिया' या कार्यक्रमाच्या धर्तीवर राज्यात 'मेक इन महाराष्ट्र' हा उपक्रम अत्यंत गतिमान पद्धतीने राबवून राज्यातील विविध भागात उद्योगधंदे स्थापन व्हावेत, यासाठी राज्य शासन सर्वोच्च प्राधान्य देणार आहे. राज्यातील वातावरण उद्योगांना पूरक व्हावे यासाठी सरकारने कामाचा धडाका लावला आहे. धोरणात्मक निर्णयाबरोबरच उद्योगवाढीसाठी प्रयत्न सुरू केले आहेत. याचा फायदा उद्योगांना करून देताना त्याचा गैरफायदाही कोणी घेऊ नये याची काळजी सरकार घेणार असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी स्पष्ट केले आहे.

औद्योगिक वापराकरिता अकृषिक परवानगी मोठ्या प्रमाणावर घेण्यात येतात. मात्र या जागांवर तातडीने उद्योग उभारले जाताना दिसत नाहीत. अकृषिक परवाना मिळाल्यानंतर पाच वर्षांत उद्योग उभारणे बंधनकारक करण्यात आले आहे. त्यानंतर पाच वर्षापर्यंत विलंब झाल्यास संबंधिताकडून दंड वसूल केला जाईल. त्यानंतरही उद्योग उभा न राहिल्यास ही जमीन शेतकऱ्याला परत करावी लागेल किंवा इतर उद्योजकांना ती उपलब्ध करून दिली जाईल.

### कालबाह्य ना हरकत प्रमाणपत्रांबाबत

उद्योग सुरू करताना अनेक ना-हरकत प्रमाणपत्रे सादर करावी लागतात. यातील कालबाह्य ठरलेली ना-हरकत प्रमाणपत्रे न मागितल्यास विशेष फरक पडेल काय, यावर अभ्यास करण्यात येईल.

### वृक्षतोडीला परवानगी

काही राज्यात वृक्षतोड परवानगी कमी कालावधीत देण्यात येते. मात्र यासाठी कायद्यातील तरतुदीनुसार वृक्षतोड प्राधिकरणाकडे हे प्रकरण जाते व त्यासाठी सुमारे ९० दिवस एवढा कालावधी लागतो. हा वेळ कमी करता यावा, यासाठीही प्रयत्न करण्यात येतील. मुंबई महापालिकेतर्फे



## गतिमान-मेक इन महाराष्ट्र

- मेक इन महाराष्ट्रासाठी उच्चस्तरीय समिती स्थापन
- या समितीमार्फत राज्यात १० मोठ्या उद्योगांना परवानगी
- या दहा उद्योगातून ४ हजार २८५ रोजगार निर्मिती शक्य
- येत्या काळात ८ हजार ४५६ कोटी रुपयांच्या गुंतवणुकीतून १२ मोठे उद्योग उभे राहणार
- या माध्यमातून ११ हजार ८०० रोजगार निर्मिती शक्य
- उद्योग उभारणीसाठी यापूर्वी सुमारे ७५ परवानग्या घ्याव्या लागत होत्या. ही संख्या २५ वर आणणार
- एमआयडीसीच्या १४ परवानग्यांची संख्या आता पाचवर आणण्यात आली.
- पर्यावरणविषयक परवानग्यांचे सुलभीकरण.
- एका आठवड्यात १०० परवानग्या मंजूर.
- पर्यावरणविषयक परवानग्यांचे विस्तृत धोरण येत्या तीन महिन्यात तयार करण्यात येईल.
- शिंडलर इंडिया प्रायव्हेट लिमिटेड या कंपनीला गेल्या दीड वर्षांपासून नदीनियमनक्षेत्राच्या नियमांमुळे परवानगी मिळत नव्हती, ती देण्यात आली.
- लेंझिंग मोदी फायबर्स इंडिया प्रायव्हेट लिमिटेड हा उद्योग गेल्या पाच वर्षांपासून रखडला होता. त्यालाही सर्व परवानग्या देण्यात आल्या.
- अल्ट्राटेक, पर्किन्स इंडिया लिमिटेड या उद्योगांसमोरच्या अडचणीही दूर करण्यात आल्या आहेत.
- सेवाक्षेत्राशी संबंधित कामे बाह्यस्रोताद्वारे करण्यात येतील.

बांधकामाकरिता लागणाऱ्या २५ परवानग्यांची संख्या १६ वर आणण्यात येणार आहे. तसेच परवानगी आणि ना हरकत प्रमाणपत्रासाठीची पद्धती सुलभ करण्यात येणार आहे.

### राज्य ५० व्या क्रमांकावर आणणार

जागतिक बँकेच्या मानांकनानुसार महाराष्ट्र सध्या १४२ व्या क्रमांकावर आहे. येत्या वर्षभरात ५० व्या क्रमांकावर आणण्यासाठी केंद्राने मेक इन इंडियासाठी दिलेला ९८ कलमी अजेंडा मे २०१५ पर्यंत पूर्ण करण्यात येणार असल्याचे आश्वासन केंद्राला देण्यात आले आहे.

राज्यात सुमारे साडेतीन कोटी असंघटित कामगार आहेत. त्यांच्यासाठी महाराष्ट्र असंघटित कामगार सामाजिक सुरक्षा मंडळाची स्थापना करण्यात येईल. माथाडी कामगार कायद्यातील तरतुदींचा होणारा गैरवापर थांबावा यासाठी कामगार कायद्यात सुधारणा करण्यासाठी प्रयत्न केले जातील.

❐ ❐

## ऑस्ट्रेलियाने राज्यातील उत्पादन क्षेत्रात गुंतवणूक करावी



**मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी ऑस्ट्रेलियाचे व्यापार आणि गुंतवणूक मंत्री ॲन्ड्र्यू रॉब यांच्या नेतृत्वाखालील शिष्टमंडळाची भेट घेतली.**

ऑस्ट्रेलियाने राज्यातील उत्पादन क्षेत्रात आपली गुंतवणूक वाढवावी, अशी विनंती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी ऑस्ट्रेलियाचे व्यापार आणि गुंतवणूक मंत्री ॲन्ड्र्यू रॉब यांना केली आहे. श्री. रॉब यांच्या नेतृत्वाखालील शिष्टमंडळाने मुख्यमंत्र्यांची नुकतीच भेट घेतली. त्यावेळी मुख्यमंत्र्यांनी ही विनंती केली.

मुख्यमंत्र्यांनी रॉब यांच्या निदर्शनास आणले की, उभय देशांमध्ये विविध क्षेत्रातील गुंतवणुकीत वाढ होणे गरजेचे आहे. प्रामुख्याने उत्पादन क्षेत्रात गुंतवणूक झाल्यास राज्यासाठी ती लाभकारक ठरेल. ऑस्ट्रेलियातील उद्योजकांनी राज्यात उत्पादन क्षेत्रात गुंतवणूक करावी, त्यासाठी शासन सर्वोतोपरी मदत करेल. राज्यात तांत्रिक शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या मोठी आहे. त्यांना ऑस्ट्रेलियाने प्रशिक्षण दिल्यास कुशल मनुष्यबळ तयार होण्यास मदत होऊन दोन्ही देशांना त्याचा फायदाच होईल.

शिष्टमंडळासोबतच्या बैठकीत गुंतवणूक आणि आर्थिक सेवा, पायाभूत सुविधा, वाहतूक आणि वाहतूक सुरक्षितता, कृषी उपकरणे आणि कृषी तंत्रज्ञानसेवा,शिक्षण आणि संशोधन, पर्यटन, आरोग्य, नैसर्गिक साधनसंपत्ती आणि ऊर्जा, पर्यावरण संतुलन आदी विषयांवर चर्चा झाली.

# कौशल्य विकास नवा मंत्र प्रगतीचा



एका बाजूला चांगले शिक्षण घेऊनही तरुणांना रोजगार मिळत नाही आणि त्याचवेळी उद्योगांना आवश्यक असलेले तज्ज्ञ मनुष्यबळ मिळत नाही. या दुष्टचक्रातून राज्याला बाहेर काढायचे असल्यास तरुणांच्या कौशल्यविकासावर भर देणे आवश्यक आहे. हे ओळखून राज्य सरकार आता कौशल्य विकासाचा कार्यक्रम प्रभावीपणे राबवणार आहे.

महाराष्ट्रात उच्चशिक्षित तरुणांची वानवा नाही, पण त्याचबरोबर उद्योगांसाठी कौशल्यपूर्ण मनुष्यबळाचीही आवश्यकता असते. त्यासाठी शासनाने आता खास धोरण ठरविले असून राज्यात कौशल्य विकासाचा कार्यक्रम प्रभावीपणे राबवण्यात येणार आहे. अखिल भारतीय तांत्रिक शिक्षण परिषदेच्यावतीने आयोजित 'नॅशनल स्किल क्वालिफिकेशन फ्रेमवर्क' कार्यक्रमात मुख्यमंत्री फडणवीस यांनी राज्य सरकारची ही भूमिका विशद केली.

रोजगाराबाबत बदलत्या आंतरराष्ट्रीय व राष्ट्रीय परिस्थितीत कौशल्य विकासावर अधिक भर देण्याची आवश्यकता निर्माण झाली आहे. या पार्श्वभूमीवर कौशल्य विकास व उद्योजकतेस अधिक प्रोत्साहन देण्यासाठी व याबाबतच्या कार्यक्रमांची प्रभावीपणे अंमलबजावणी करण्यासाठी कौशल्य विकास व उद्योजकता या स्वतंत्र विभागाची केंद्र शासनाने निर्मिती केली आहे.

**राज्यातही कौशल्य विकास व उद्योजकता विभाग**

केंद्र शासनाच्या धर्तीवर राज्यातही कौशल्य विकास व उद्योजकता विभाग निर्माण करण्यास मंत्रिमंडळाने मान्यता दिली आहे. यापूर्वीचा रोजगार व स्वयंरोजगार विभाग आता कौशल्य विकास व उद्योजकता विभाग म्हणून ओळखला जाईल. या विभागासाठी प्रधान सचिव दर्जाचे स्वतंत्र पद निर्माण करण्यास मान्यता देण्यात आली आहे.

❐ ❐

**ऊर्जा निर्मितीसह इतर सर्व उद्योगांमध्ये स्थानिक युवकांना रोजगार उपलब्ध करून देण्यासाठी त्यांच्यातील क्षमता विकसित कराव्या लागतील. स्थानिक विकासासाठी असलेल्या राखीव निधीमधून उद्योजकांनी कौशल्य विकास कार्यक्रम राबवल्यास सुमारे पन्नास हजार युवकांना रोजगार उपलब्ध होऊ शकेल. स्थानिक औद्योगिक प्रशिक्षण संस्था, तंत्रशिक्षण संस्था तसेच उद्योजकांना आवश्यक असलेले मनुष्यबळ यांचा समन्वय साधून कौशल्य विकासाचा कार्यक्रम प्रभावीपणे राबवता येईल.**



**चंद्रशेखर बावनकुळे**
**ऊर्जामंत्री**



# लंडनमध्ये महामानवाचे स्मारक

**भारतीय घटनेचे शिल्पकार भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे लंडन येथे भव्य स्मारक उभारण्याचा मार्ग महाराष्ट्र सरकारने तातडीने पावले उचलल्यामुळे अखेर मोकळा झाला आहे. डॉ. आंबेडकर लंडनमधील ज्या घरात वास्तव्यास होते ते घर महाराष्ट्र सरकार ३५ कोटी रुपयांना विकत घेणार आहे. दलित, शोषितांच्या आयुष्यात आशेचा, समृद्धीचा दीप तेजोमय करणाऱ्या या महामानवाचे स्मारक लंडनमध्ये उच्चशिक्षणासाठी येणाऱ्या जगभरातील विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी ठरेल.**



डॉ. बाबासाहेब आंबेडकर उच्चशिक्षणासाठी लंडनमध्ये वास्तव्यास होते. त्यामुळे या घराला एक ऐतिहासिक वारसा लाभला आहे. हे घर भारताच्या ताब्यात येण्याचा मुद्दा अखेर मार्गी लागला आहे. विदेशातील ही मालमत्ता असल्याने या संपूर्ण व्यवहारात केंद्र सरकारने दिलेल्या 'लेटर ऑफ इंटेंट'ने (इरादापत्र) मोलाची भूमिका बजावली आहे. यासाठी महाराष्ट्र शासनाने केलेला पाठपुरवा यशस्वी ठरला आहे.

भारताच्या लंडनमधील उच्चायुक्तांमार्फत राज्य सरकारने ही खरेदी प्रक्रिया पुढे नेण्याचे ठरविले आहे. लंडनमधील या घराचा लिलाव होणार होता. या घराचा लिलाव होऊ नये यासाठी बुद्धिस्ट फोरमचे डॉ. संतोष दास प्रयत्नशील होते. त्याच दरम्यान जागतिक शिक्षण मंत्र्यांच्या परिषदेसाठी शिक्षणमंत्री विनोद तावडे लंडनमध्ये होते. त्यांनी यासंदर्भात बुद्धिस्ट फोरमच्या संतोष दास यांच्याशी संपर्क साधला व व्यवहाराची माहिती घेतली. हे घर सुमारे ३५ कोटी रुपयांना विकण्यात येत आहे, अशी माहिती मिळाल्यानंतर श्री. तावडे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याशी दाव्होस येथे संपर्क साधला. मुख्यमंत्र्यांनी हे घर राज्य सरकारनेच विकत घ्यावे अशी भूमिका घेतली. त्यानंतर राज्य सरकारने हे घर विकत घ्यावे, याबाबतचा निर्णय झाला. आवश्यक प्रक्रिया पूर्ण करून, कायदेशीर बाबी तपासून आणि परराष्ट्रातील खरेदीचे नियम पूर्ण करून आगामी दोन महिन्यांत सर्व प्रक्रिया पूर्ण करण्यात येणार आहे. त्यामुळे १४ एप्रिल २०१५ या दिवशी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीला लंडनमधील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे निवासस्थान स्मारक म्हणून जनतेला खुले करता येईल, असा निर्णय घेण्यात आला आहे.

❑ ❑

# रेल्वे फास्ट ट्रॅकवर

**केंद्रीय रेल्वे मंत्री सुरेश प्रभू यांची दिल्लीतील ओळख 'मॅन ऑफ आयडियाज्' अशी आहे. मंत्रिपदाची सूत्रे हाती घेतल्यानंतर त्यांनी अनेक धडाडीचे निर्णय घेतले. सर्वप्रथम त्यांनी रेल्वेची श्वेतपत्रिका काढण्याचा निर्णय घेतला. रेल्वे प्रवाशांना सुरक्षिततेची हमी, आंतरराष्ट्रीय मानकांनुसार रेल्वेत सुधारणा, विद्युतीकरण, रेल्वे रुळांची दुरूस्ती व रेल्वेला जास्तीत जास्त नफा मिळवून देण्यासाठी युद्धपातळीवर नियोजन सुरू आहे. रेल्वे अर्थसंकल्पात त्याचे प्रतिबिंब उमटेल. रेल्वेच्या कारभारात श्री. प्रभू आल्यापासून पारदर्शकता आली आहे.**

प्रमोद मुजुमदार
टेकचंद सोनवणे

**पुढील पाच वर्षासाठी रेल्वे विकासाचा काय आराखडा आहे?**

याच महिन्याच्या अखेरीस रेल्वे अर्थसंकल्प सादर होणार असल्याने आराखडा सांगता येणार नाही. पण रेल्वे आपला संपन्न वारसा आहे. रेल्वे खऱ्या अर्थाने सर्वसामान्यांची आहे.



रेल्वे ही सर्वसामान्य माणसाला आसरा देणारी संस्था आहे. देशाचा आर्थिक गाडा रेल्वेवर अवलंबून आहे. रेल्वेचे दोन तृतीयांश उत्पन्न मालवाहतुकीतून येते. दिवसातून सरासरी तीन कोटी लोक रेल्वेने प्रवास करतात. ही संख्या ऑस्ट्रेलियाच्या लोकसंख्येपेक्षाही जास्त आहे. रेल्वेचे सामान्यांशी जवळचे नाते आहे. रेल्वे लोकांना जोडणारी संस्था आहे. याच भावनेतून आम्ही ईशान्य भारताला रेल्वेने जोडणार आहोत.

चीनच्या सीमेपर्यंत अर्थात अरुणाचल प्रदेशासह संबंध भारतात रेल्वेचे जाळे निर्माण करण्यावर आमचा भर आहे. त्याचप्रमाणे जम्मू-काश्मीर व नक्षलग्रस्त भागात आम्ही रेल्वेचा विस्तार करणार आहोत. रेल्वेकडे राष्ट्रीय संपत्तीच्या दृष्टीने पाहावे लागेल. रेल्वे हा समृद्ध वारसा आहे. रेल्वेच्या विकासाकडे कदापि दुर्लक्ष होणार नाही.

**केंद्र सरकार रस्तेनिर्मितीवर भर देत आहे. त्यामुळे स्वाभाविकपणे मालवाहतुकीसाठी रस्त्यांना पसंती दिली जाईल. या स्पर्धेत रेल्वे कशी टिकणार?**

रस्त्यांचे जाळे वाढले तरी रेल्वेचे महत्त्व कमी होणार नाही. त्याउलट ते सतत वाढेल. वाढत्या स्पर्धेत समन्वयाची गरज आहे. रेल्वे, रस्ता, हवाई व जलवाहतूक – परिवहनाच्या साऱ्या पर्यायांना एकत्र करून रेल्वे मंत्रालयाच्या पुढाकाराने 'बहुपर्यायी परिवहन विकास महामंडळ' स्थापण्यात येणार आहे. त्यामुळे देशवासीयांना कमी खर्चात वाहतुकीचा पर्याय उपलब्ध होईल.

कोकणातल्या गोगटेंना रायपूरला आंबे धाडायचे असतील तर त्यासाठी रेल्वे, हवाई, रस्ता व जल मार्गापैकी कोणता स्वस्त व सोयीचा मार्ग आहे, याचा विचार प्रस्तावित महामंडळाच्या माध्यमातून केला जाईल. यातून रेल्वेला मोठा आर्थिक लाभ होईल.


**रेल्वे विद्यापीठ कधी अस्तित्वात येणार ?**

रेल्वेत काम करणाऱ्यांना सिग्नल, ट्रॅक लेनिंग, सुरक्षा तसेच अनेक प्रकारच्या तंत्रशिक्षणाची गरज असते. रेल्वेला तांत्रिकदृष्ट्या प्रशिक्षित, तज्ज्ञ कर्मचारी मिळाल्यास रेल्वेचा गुणात्मक दर्जा सुधारेल, विकसित मनुष्यबळ ही काळाची गरज आहे. रेल्वेसाठी आवश्यक प्रशिक्षण रेल्वे विद्यापीठामार्फत देण्यात येईल.




या वर्षअखेर सुरुवात म्हणून देशातील काही विद्यापीठांसमवेत रेल्वे सहकार्य करार करणार आहे. रेल्वे विद्यापीठाच्या स्थापनेच्या दिशेने हे महत्त्वाचे पाऊल असेल.

'लोकराज्य' च्या वाचकांना सांगायला आवडेल की, मराठी मुलखात मुंबई विद्यापीठाशी सहकार्य करार करण्यावर गांभीर्याने विचार सुरू आहे. महाराष्ट्राबद्दल विशेष सांगायचे तर



निर्णय सांगितला. त्यावर त्यांनी प्रतिक्रिया दिली – असा क्रांतिकारी निर्णय रेल्वेच्या इतिहासात एकदाही झालेला नाही. गुड गव्हर्नन्स व सरकारी कारभारात पारदर्शकता आणण्यासाठी हा धाडसी निर्णय मी घेतला. या निर्णयामुळे अनेकांनी मला गमतीशीर प्रतिक्रिया दिली. ती म्हणजे – यापुढे रेल्वे मंत्री होण्यास कुणीच इच्छुक नसेल. कारण एकप्रकारे हा निर्णय म्हणजे स्वत:च्या अधिकारांवर पाणी सोडण्यासारखे आहे. यावरच न थांबता रेल्वे खात्यातील विविध नियुक्त्यांमध्येही मी पारदर्शकता आणली. रेल्वे नियुक्त्यांमध्ये भ्रष्टाचाराची अनेक प्रकरणे उघडकीस आली. मी सूत्रे हाती घेतल्यापासून अवघ्या दीड महिन्यांच्या कालावधीत अनेक वर्षांपासून रिक्त असलेली पदे अत्यंत पारदर्शक पद्धतीने भरली. आज रेल्वे मंडळ असो वा अन्य विभाग एकही पद रिक्त नाही. जराही कुरबुर न होता 'रेकॉर्ड टायमिंग' मध्ये सर्वच्या सर्व पदे भरली गेल्याचे हे पारदर्शी कारभाराचे सर्वोत्तम उदाहरण आहे. यापुढे केटरिंग (खानपान) टेंडरिंगची पद्धत लागू करण्यात

**रेल्वेला तांत्रिकदृष्ट्या प्रशिक्षित मनुष्यबळ उपलब्ध होण्यासाठी रेल्वे विद्यापीठाची स्थापना करण्यात येणार आहे. देशातील काही विद्यापीठांसमवेत रेल्वे सहकार्य करार करणार आहे. या अनुषंगाने मुंबई विद्यापीठाशी सहकार्य करार करण्यावर गांभीर्याने विचार सुरू आहे.**

मुंबईच्या समस्या सोडवण्यावर आमचा भर आहे.

**मुंबईतून प्रस्तावित बुलेट ट्रेन कधी धावणार?**

मुंबई बुलेट ट्रेनविषयी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याशी अलीकडेच चर्चा झाली. मी त्यांना सांगितले की, जागा, लॅण्डिंग पॉइंट कुठे असावे हे निर्णय जपानच्या तज्ज्ञांना घेऊ द्या. त्यांचे युद्धपातळीवर प्रयत्न सुरू आहेत. सर्व तांत्रिक बाबींची पूर्तता करून लवकरच बुलेट ट्रेन धावणार.

**रेल्वेच्या कारभारात पारदर्शकता कशी आणली?**

रेल्वे मंत्रिपद अत्यंत संवेदनशील असते. संपूर्ण देशात रेल्वे हाच पहिला विभाग असा असेल जेथे एकही कंत्राट, निविदा रेल्वे मंत्र्याकडे येणार नाही. त्यामुळे साधारण वर्षभरात निघणारी आठ ते दहा लाख कोटी रुपयांची टेंडर्स माझ्याकडे येणार नाहीत. ई. श्रीधरन यांना मी हा

येईल. या टेंडरिंगमध्ये गैरव्यवहार झाल्यास कुणीही त्याविरोधात तक्रार करू शकेल. त्यासाठी आम्ही एक कस्टमर सर्व्हिस पोर्टल सुरू करणार आहोत.

**रेल्वे परीक्षांमधील गैरव्यवहार कसा टाळणार?**

यापुढे रेल्वेची प्रत्येक परीक्षा ऑनलाइन होईल. त्यानंतर लगेचच निकाल लागेल. पारदर्शी कारभाराच्या दिशेने घेतलेला हा देखील महत्त्वाचा निर्णय आहे. अर्थात या निर्णयामुळे दलालांचा चेहरा (रागाने) लाल होईल ! ऑनलाइन परीक्षा पद्धतीमुळे दलांलाची सद्दी संपेल.

(प्रमोद मुजुमदार (९८१११२०१७०) हे जन्मभूमी वृत्तसमूहातील दिल्ली स्थित ज्येष्ठ पत्रकार आहेत तर टेकचंद सोनवणे (९९९९५०६१९१) हे दै. लोकसत्ताचे दिल्लीस्थित वरिष्ठ प्रतिनिधी आहेत.)

❑ ❑

### ॲक्शन प्लॅन

- ईशान्य भारताला रेल्वेने जोडणार
- जम्मू-काश्मीर व नक्षलग्रस्त भागात रेल्वेचा विस्तार करणार
- रेल्वे, रस्ता, हवाई व जलवाहतूक – परिवहनाच्या या पर्यायांना एकत्र करून रेल्वे मंत्रालयाच्या पुढाकाराने 'बहुपर्यायी परिवहन विकास महामंडळा'ची स्थापना
- वर्षअखेर रेल्वे विद्यापीठाची स्थापना
- सर्व तांत्रिक बाबींची पूर्तता करून लवकरच बुलेट ट्रेन धावणार
- यापुढे कंत्राट वा निविदा रेल्वे मंत्र्याकडे मंजुरीसाठी येणार नाहीत.
- रेल्वेकडून वापरले जाणारे इंधन, रेल्वेमुळे होणारे कार्बन उत्सर्जन, रेल्वे स्थानकांवर जमा होणारा कचरा आदीचा विचार यापुढे पर्यावरणीय मानकांवर करण्यात येणार.
- रेल्वे परीक्षांतील गैरकारभार रोखण्यासाठी ऑनलाइन परीक्षा
- मानवरहित रेल्वे क्रासिंगवरील अपघात रोखण्यासाठी इस्रोच्या सहकार्याने 'रिमोट सेन्सिग' च्या माध्यमातून अशा रेल्वे क्रासिंगवर रेल्वे पोहोचण्यापूर्वी परिसरातील नागरिकांच्या मोबाइलवर एसएमएस पाठवणार.
- बॅटरीच्या माध्यमांतून नियंत्रण ठेवता येईल असे 'रेल्वे गेट' बसवणार.
- रेल्वेचे पाच लाख कोटी रुपयांचे मंजूर झालेले प्रकल्प पूर्ण करण्यासाठी जाहिराती व इतर माध्यमांमधून निधी उभारणार.

विशेष मुलाखत

# शेवटच्या घटकाला न्याय



**ठाणे जिल्ह्यातील आदिवासीबहुल भागात गेले तीन दशके आदिवासींच्या हक्कांसाठी संघर्षरत असलेले आदिवासी विकास मंत्री विष्णू सवरा हे अभ्यासूवृत्तीचे नेते म्हणून ओळखले जातात. नुकत्याच झालेल्या विधानसभा निवडणुकीत श्री. सवरा हे सहाव्यांदा आमदार म्हणून निवडून आले. मंत्रिमंडळात सवरा यांच्याकडे आदिवासी विकास, सामाजिक न्याय आणि विशेष साहाय्य या खात्यांची जबाबदारी सोपवण्यात आली आहे. यापूर्वी युती शासनात त्यांनी हे दायित्व पार पाडले होते. राज्यातील आदिवासी आणि मागास घटकांच्या समस्यांचे निवारण आणि उन्नती यासाठी हे खाते महत्त्वाची भूमिका बजावते.**

राज्यात आदिवासींची लोकसंख्या ही एकूण लोकसंख्येच्या ९ टक्के इतकी आहे. या विभागातील योजनांसाठी लोकसंख्येच्या प्रमाणात वार्षिक अर्थसंकल्पात ९ टक्के एवढी भक्कम आर्थिक तरतूद केली जात असते. आदिवासी विकास योजनांच्या प्रभावी अंमलबजावणीचा प्रश्न, आदिवासींचे कुपोषण, आश्रमशाळांची दुरवस्था यांसारखे अनेक प्रश्न चर्चेत असतात. राज्यातील आदिवासी आणि मागास घटकांचा विकास साधणाऱ्या या खात्याचे कॅबिनेट मंत्री विष्णू सवरा यांची ही विशेष मुलाखत.

**आपल्याकडे असणाऱ्या विभागाबाबत नवीन काही विशेष योजना तुमच्या मनात आहेत?**

आदिवासी विकास आणि सामाजिक न्याय विभागामार्फत एकूणच ज्या काही योजना सध्या राबवल्या जातात त्यात अशा काही योजना आहेत ज्यांचा सद्य:स्थितीत काही उपयोग राहिलेला नाही. त्या कालबाह्य झालेल्या आहेत. अशा योजना कालसुसंगत करून त्यात नावीन्यता कशा प्रकारे आणता येईल ते मी बघतोय. गरीब आदिवासींना न्याय मिळवून देणे हा आमचा उद्देश आहे. विविध योजनांचा आढावा घेण्याचे काम आम्ही सुरू केले आहे.

हारिस शेख

राज्य शासनाच्या योजना आदिवासीपर्यंत पोहचल्या पाहिजे, त्यांच्या उपयोगी पडल्या पाहिजे हा राज्य शासनाचा दृष्टिकोन आहे. काही नवीन योजनांचाही आम्ही समावेश करणार आहोत.

**आदिवासींच्या विकासासाठी असणाऱ्या योजनांची प्रभावी अंमलबजावणी होताना दिसत नाही?**

आदिवासींच्या कल्याणाकरिता अनेक

योजना आहेत. सार्वजनिक योजना आहेत तर काही वैयक्तिक लाभाच्याही योजना आहेत. त्या योजना आदिवासींपर्यंत पोहचत नाही, ही तक्रार सर्वदूर आहेत. या तक्रारी कमी करून या योजनांसाठीचा निधी प्रत्यक्ष त्यांच्या कारणी कसा लावता येईल अशाप्रकारचा माझा प्रयत्न असेल.

आदिवासींच्या लोकसंख्येच्या प्रमाणात राज्याच्या अर्थसंकल्पात त्यांच्या विकासाच्या निधीची तरतूद करण्यात यावी, अशी शिफारस सुखटणकर समितीने केली होती. महाराष्ट्रात नऊ टक्के म्हणजे जवळपास एक कोटी आदिवासींची लोकसंख्या आहे. बजेटच्या जवळपास ९ टक्के आर्थिक तरतूद करण्यात येते. यावर्षी आदिवासी विकास खात्याचे बजेट साधारण सहा हजार कोटी रुपये एवढे आहे. आदिवासींच्या विकासासाठी सरकार इतका पैसा खर्च करतेय, तो योग्य कारणासाठी सार्थकी लागतोय की नाही याचा आढावा घेण्यासाठी आदिवासी विकास विभागाची स्वतंत्र यंत्रणा सध्या अस्तित्वात नाही. कृषी, बांधकाम, शिक्षण यांसारखे विभाग त्यासाठी काम करत असतात. त्या-त्या विभागाला आम्ही ठरलेल्या प्रमाणात निधी देत असतो. हा पैसा कामी आला की नाही, बांधकामाचा दर्जा काय असतो, त्याचं मॉनेटरिंग मात्र आमच्या विभागामार्फत होत नाही. कारण तशी यंत्रणा आमच्याजवळ नाही. तशी यंत्रणा उभारण्याचा माझा विचार आहे.

**'अस्सल आदिवासी' आणि 'बोगस आदिवासी' असा एक जुना वाद आहे. आदिवासींची बोगस प्रमाणपत्रे रोखण्यासाठी काय उपाययोजना करणार?**

महाराष्ट्रात बोगस आदिवासींचे प्रमाण मोठे आहे. त्यांना संरक्षणही दिले गेले. त्याला विरोधही झाला आहे. ८० हजारांच्यावर नोकऱ्या बोगस आदिवासी प्रमाणपत्राच्या आधारावर मिळविलेल्या आहेत. ते सरकारच्या खात्यामध्ये बरीच वर्षे काम करत आहेत. त्यांना नोकरीवरून काढून टाका असेही आम्ही सांगत नाही. परंतु जात प्रमाणपत्राची पडताळणी करा, अशी आम्ही मागणी केली होती. यातली बरीचशी प्रकरणे प्रलंबित आहेत. त्यांना पुरावे सादर करता येत नाही. त्यामुळे जात प्रमाणपत्राची पडताळणी होत नाही. त्यांची काही व्यवस्था दुसऱ्या खात्यात करण्यात यावी अशीही एक मागणी आहे. त्या नोकऱ्या मूळ आदिवासींना देण्यात याव्या अशी भूमिका आहे.

## ॲक्शन प्लॅन

- आउटडेटेड योजनांमध्ये नावीन्यता आणणार.
- आदिवासींच्या कल्याणासाठी असलेल्या योजनांसाठीचा निधी प्रत्यक्ष त्यांच्यासाठीच कसा खर्ची पडेल, याकडे विशेष लक्ष. यासाठी मॉनेटरिंग यंत्रणा उभारणार.
- मूळ गाव आणि त्याच्या आजूबाजूला असलेल्या पाड्यांना जोडणारे रस्ते करणार.
- ठाणे जिल्ह्यात मोखाडा, जव्हार, विक्रमगड अशा दुर्गम भागात पाण्याची व्यवस्था प्राधान्याने करणार.
- स्थलांतर थांबवून रोजगार राहत्या ठिकाणीच मिळवून देण्याचा प्रयत्न.
- आदिवासी विभागात उद्योजकांना पायाभूत सुविधा उपलब्ध करून देणार

**आदिवासी मुलांच्या कुपोषणाचे प्रमाण आटोक्यात कसे आणणार?**

आदिवासीबहुल जिल्ह्यात दुर्गम भागात कुपोषणाचा मोठा प्रश्न आहे. १९९५ साली युतीचे सरकार होते, त्यावेळी आम्ही आदिवासींच्या विकासासाठी 'नवसंजीवनी योजना' राबवली होती. या योजनेमार्फत पाणी, रोजगार, आरोग्य अशा एकूण चार ते पाच योजना एकत्रित करून राबवल्या होत्या.

आदिवासी भागात रोजगारासाठी स्थलांतर हा गंभीर प्रश्न आहे. रोजगाराच्या शोधासाठी आदिवासी शेजारच्या राज्यांमध्ये जात असतात. आदिवासी भागात त्याला जगायला जातो असे म्हटले जाते. स्थानिक ठिकाणी त्याला जगता येत नाही म्हणून तो काम-धंदा शोधायला जातो, म्हणजे जगायला जातो. ठाणे, नंदुरबार जिल्ह्यात याचे प्रमाण जास्त आहे. या परिस्थितीत त्याच ठिकाणी त्याला रोजगार मिळेल अशी व्यवस्था करायला पाहिजे. आदिवासी भागांमध्ये उद्योजक यायला तयार आहेत. परंतु त्यांना हवी असलेली पायाभूत सुविधांची व्यवस्था करायला पाहिजे. छोटे, मध्यम प्रकल्प आणले गेले पाहिजेत. रस्ते, वीज, पाण्याची जर का व्यवस्था केली गेली तर उद्योजक नक्कीच येऊ शकतात आणि रोजगार निर्मिती होऊ शकते.

**मराठा व धनगर समाजाच्या आरक्षणाची मागणी आहे, याबद्दल सरकारची भूमिका नेमकी काय आहे?**

मराठा समाजाला न्याय मिळाला पाहिजे अशी आमच्या सरकारची भूमिका आहे. वेळ आल्यास कायद्यात बदल करू असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी स्पष्ट केले आहेच. धनगर समाजाचा प्रश्न संपूर्ण राज्यात गाजला होता. आदिवासींच्या यादीत समाविष्ट करण्याची त्यांची मागणी आहे. धनगर समाजाला आरक्षण देण्याबाबत आमची हरकत नाही. पण आदिवासींच्या निकषामध्ये ते बसत नाहीत. या




मागणीसाठी धनगर समाजाच्या नेत्यांनी बारामतीत उपोषण केले होते. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, तेव्हा विरोधी पक्षात असताना बारामतीला उपोषण सोडवायला गेले होते. आदिवासींचे सात टक्क्यांचे आरक्षण अबाधित ठेवून धनगर समाजाला आरक्षण दिले जाईल अशी घोषणा त्यांनी त्यावेळी केली होती. धनगर समाजच नाही तर अनेक समाज आपल्याला आदिवासींच्या यादीत टाकण्याची मागणी करत असतात. मात्र घटनेतील तरतुदीच्या ते विरोधात जाते आहे.

(लेखक महाराष्ट्र टाईम्स ऑनलाइनचे ज्येष्ठ पत्रकार आहेत.) **संपर्क :** ०९९८७५७८८८४

एक दिवस मंत्र्यांसोबत

# सुयोग्य नियोजन आणि कामाचा झपाटा



आदल्या दिवशी उशिरा रात्रीपर्यंत कार्यरत असल्यामुळे उद्योगमंत्री सुभाष देसाई साहेब यांचा दिवस उशिरा तर सुरू होणार नाही ना, असे मला वाटले होते. नियमितपणा आणि वक्तशीरपणा हे देसाई साहेबांचे खास वैशिष्ट्य. रात्री कितीही उशीर झाला तरी सकाळी ते ठरलेल्या वेळी उठणारच. त्यानंतर सकाळचे फिरणे, व्यायाम, पूजा आदी वेळेवर झाली की दिवसाच्या कामांना सुरुवात होते. त्यात एक प्रकारचा झपाटा असतो आणि सर्व कामांचे सुयोग्य नियोजन केलेले असते. त्यामुळे डोंगराएवढ्या कामांची जंत्री असूनही एकेक काम मार्गी लागत जाते. काही कामांना गती मिळते. कार्यकर्त्यांच्या गराड्यात वेळेचे नियोजन नेहमीच पाळले जाईल असे नाही, पण देसाई साहेबांचा मात्र आग्रह आणि कटाक्ष काटेकोर नियोजनाकडे व त्याबरहुकूम काम पूर्ण करण्याकडे असतो. त्यामुळे त्यांच्यासोबत असलेल्या प्रत्येकाला अतिशय ॲलर्ट राहावे लागते. त्यांचा फोन कधी येईल हे सांगता येत नाही.

साधारणत: महत्त्वाच्या कामांची सुरुवात सकाळच्या वृत्तपत्रांचे वाचन झाले की ते करतात. त्यांचा विभाग व जनसामान्यांच्या समस्यांवरील बातम्या, लेखांचे वृत्तपत्रांमधील वाचन झाले की अत्यंत महत्त्वाच्या बाबींची नोंद करून ठेवण्याची त्यांची सवय आहे. मग दिवसभरात जसा वेळ मिळेल त्याप्रमाणे या बातमी वा लेखातील माहितीच्या अनुषंगाने ते आवश्यक असल्यास फॉलोअप घेतात व संबंधितांना सूचना देतात.

लोकराज्यसाठी ‘मंत्रिमहोदयांसोबत एक दिवस’ या सदरासाठी मला देसाई साहेबांसोबतच्या एक दिवसावर लिहावयाचे असल्याने मी तयारीला लागलो होतो. तोच सकाळी ७.३० वाजता साहेबांचा फोन खणाणला. ‘आहे का एक मिनिट, बोलू का?’

नितीन शिंदे

देसाई साहेब मृदू आवाजात बोलत होते. ते नेहमीच सर्वांशी तसेच बोलतात. पण तरीसुद्धा त्यांचा फोन आला की दडपण येतेच. त्यांच्या ज्या सूचना असतात त्या विसरू नये म्हणून मी लगेच डायरी घेतली व त्यांच्या सूचना टिपून ठेवल्या.

त्यांच्याकडे कार्यरत असलेल्या माझ्यासारख्या इतर सहकाऱ्यांनाही ते अशाच प्रकारे फोन करतात आणि त्यांना आज करावयाच्या कामांची कल्पना देतात. ‘आपल्याला दुपारी अमुक-अमुक सद्‌गृहस्थांना वेळ देता येईल का?... परवा सांगितलेल्या कामाचे काय झाले?’ अशा प्रकारची विचारणा ते करतात. या प्रश्नांबाबत समाधानकारक उत्तरे मिळाल्यावर, ‘आपण भेटल्यावर सविस्तर बोलू,’ असे सांगून ते फोन बंद करतात.

सकाळी कामाच्या नियोजनाची सुरुवात ते स्वत: अशाप्रकारे करत असल्याने त्यांच्याकडे येणारे मेसेज, ईमेल, संभाषण या अनुषंगाने ते अपडेट राहतात. त्यातील आवश्यक संदर्भ आमच्याकडे पाठवितात. त्यामुळे कामाच्या पूर्ततेच्या अनुषंगाने आमच्यावर एक वेगळ्या प्रकारचे दडपण असते.

सकाळची ही कामे उरकली की, साहेब न्याहरी घेतात. सहसा ही न्याहरी चुकवत नाहीत, कारण पुढे मग दिवसभर योग्यवेळी जेवताच येईल, याची खात्री नसते. न्याहरी झाली की मग ते नियमित कामाला सुरुवात करतात. एव्हाना सकाळचे आठ वाजून गेले असतात. कार्यकर्त्यांची वर्दळ सुरू झाली असते. प्रत्येकजणाला साहेबांना काही ना काही सांगावयाचे असते. अर्ज द्यायचा असतो. प्रत्येकालाच त्याचे काम तातडीचे आणि महत्त्वाचे वाटते. भेटायला येणाऱ्या प्रत्येकाचे समाधान करण्याचा प्रयत्न साहेब करतात. शक्य असेल तर तेव्हाच या कामाच्या संदर्भात संबंधित अधिकाऱ्यांना फोन लावतात. त्याला योग्य ते निर्देश देतात. ही आपुलकी आणि कार्यतत्परता बघून कार्यकर्ते आणि नागरिक भारावून जातात.

सकाळची ही गर्दी साधारणत: बारा वाजेपर्यंत कमी होत नाही. सर्वांशीच काही ना काही बोलून, त्यांचे समाधान करून साहेब मग मंत्रालयाकडे निघतात. सध्या गोरेगाव ते मंत्रालय या प्रवासाला किमान अडीच तास लागतात. या प्रवासातही त्यांचे काम सुरूच असते. त्यांची गाडी यावेळेस 'मोबाइल ऑफिस'मध्ये रूपांतरित होऊन जाते. लॅपटॉप, मोबाइल, आयपॅडवरून कागदपत्रे बघणे, मेसेज बघणे, त्यावर निर्देश देणे, संबंधितांना फोनवरून सूचना देणे, फॉलोअप घेणे ही कामे सुरूच असतात. मंत्रालय येईपर्यंत बऱ्यापैकी कामांचा उरक झालेला असतो.

यावेळी मतदार संघातील प्रलंबित कामाचा आढावाही ते शाखाप्रमुख आणि विभागप्रमुख यांच्याकडून घेतात. त्यांना आवश्यक सूचना त्याचवेळी देतात. त्या देताना गाडीच्या वेगामुळे लिंक तुटली तर वाहनचालकास 'गाडी जरा हळू चालव रे बाबा' असे मृदू आवाजात सांगतात. मंत्रालयात आल्यावर सचिवांसोबत बैठका, शिष्टमंडळांसोबत चर्चा, वेगवेगळ्या कार्यक्रमाची पूर्वतयारी, विभागामार्फत नवे काय करावयाचे आहे याबाबतची विस्तृत चर्चा यात बराच वेळ जातो. याशिवाय मंत्रालयातील त्यांच्या दालनात भेटायला आलेल्या प्रत्येक नागरिकाला ते आवर्जून भेटतात. त्यांच्या मागण्यांचे निवेदन स्वीकारतात, प्रत्येकाशी दोन शब्द का होईना पण बोलतात. मंत्रालयातील बैठकींची काटेकोर तयारी त्यांना हवी असते. ते स्वत: संबंधित विषयाचा अभ्यास करूनच पूर्ण तयारीनीशी बैठकीत सहभागी होतात. त्यामुळे विषय सहजतेने समजून घेणे, निर्णय घेणे सुलभ होते. निर्णय प्रक्रियेतील टप्प्यांची प्राथमिकता ठरवणेसुद्धा सुलभ होते. संबंधितांना अतिशय प्रॅक्टिकल सूचना ते देतात. त्यामुळे बऱ्याचदा समाधानकारक तोडगा काढणे शक्य होते. मंत्रालयातील बैठका व इतर शासकीय कामकाज संपल्यावर ते लगेच मंत्रालय सोडत नाहीत. शेवटच्या व्यक्तीला भेटूनच मंत्रालय सोडण्याचा त्यांचा शिरस्ता आहे. एव्हाना पाच-साडेपाच वाजलेले असतात. स्वीय साहाय्यकांना विचारून 'आता आणखी काही कामकाज राहिले आहे का, व्हिजिटर आहेत का?' याची खातरजमा करूनच ते मंत्रालयाच्या बाहेर पडतात. गोरेगावला घरी परतण्यापूर्वी जर एखादा कार्यक्रम असेल तर आधी त्या ठिकाणी वेळेवर पोहचण्याचा त्यांचा नेहमीच कटाक्ष असतो. कार्यक्रमस्थळाची अचूक माहिती स्वीय साहाय्यकांनी घेऊन ठेवावी अशी त्यांची अपेक्षा असते. त्यानुसार ही माहिती नोंदवून ठेवली जाते. त्यामुळे कार्यक्रमस्थळी योग्यवेळी जाणे शक्य होते. कार्यक्रमाचा विषय बघून ते भाषणासाठी टिपण मागवतात. मात्र प्रत्यक्ष भाषण उत्स्फूर्तपणे करतात. आधीच्या वक्त्यांनी त्यांच्या भाषणात काही अपेक्षा व्यक्त केल्या असतील किंवा काही वेगळे मुद्दे उपस्थित केले असतील तर त्यांची दखल ते भाषणात घेतात. कार्यक्रमाच्या ठिकाणी कोणत्याही प्रकारचा बडेजाव त्यांना आवडत नाही. जमलेल्या लोकांमध्ये ते सहजतेने मिसळतात. त्यामुळे ते सर्वांनाच आपले वाटतात.

कार्यक्रम संपवून घराकडे परतताना पुन्हा मोबाइल ऑफिस सुरू होते. वेगवेगळी कामे हातावेगळी करू लागतात. अशावेळी मध्येच एखाद्याचा फोन येतो. काहीतरी गंभीर चर्चा होते. एक-दोन क्षण स्तब्धतेत जातात. मग माझ्याकडे वळून साहेब सांगू लागतात 'अरे नितीन, आमच्या बाई वसुधा पाटील यांना आजार झालाय. त्यांना जमेल तेवढी मदत केली पाहिजे आपण!' वसुधाबाईंच्या आठवणीत साहेब रंगून जातात. 'बाई गोष्टी खूप छान सांगत. त्यांनी सांगितलेल्या सिंड्रेलाच्या गोष्टीची मोहिनी अद्याप माझ्या मनावरून उतरली नाही. साधारणत: १९५२ साल असावे ते.' साहेबांची स्मरणशक्ती किती दांडगी आहे याची प्रचिती येते. माझा जन्मसुद्धा १९५२ साली झाला नव्हता असे मी जेव्हा त्यांना सांगितले तेव्हा त्यांनी हलकेसे स्मित केले. घर येईपर्यंत बरीच रात्र झालेली असते. घरी कार्यकर्ते गोळा झालेले असतात. दिवसभराचा थकवा बाजूला सारून ते या कार्यकर्त्यांना भेटतात. त्यांची विचारपूस करतात. एवढे काम करूनही त्यांच्या चेहऱ्यावरची प्रसन्नता कमी होत नाही. सकाळचाच उत्साह कायम असतो हे बघून आश्चर्यचकित व्हायला होते. एका मितभाषी, विनम्र आणि जनतेच्या हितासाठी अखंड कार्यरत असलेल्या नेत्यासोबत आपल्याला काम करायचे भाग्य मिळाले याचा मला आनंदच वाटतो. साहेबांचा मी निरोप घेतो... मध्यरात्र कधीचीच उलटून गेली असते...



**मंत्रालयातील बैठका व इतर शासकीय कामकाज संपल्यावर ते लगेच मंत्रालय सोडत नाहीत. शेवटच्या व्यक्तीला भेटूनच मंत्रालय सोडण्याचा त्यांचा शिरस्ता आहे.**



**मंत्रालयातील बैठकींची काटेकोर तयारी त्यांना हवी असते. ते स्वत: संबंधित विषयाचा अभ्यास करूनच पूर्ण तयारीनीशी बैठकीत सहभागी होतात.**

(विशेष कार्यकारी अधिकारी)
**संपर्क :** ०९८२०२४१९३१

मराठी भाषा गौरव दिनानिमित्त
विशेष लेख

# परिवर्तनाची दिशा



मराठी भाषा ही जगातील महत्त्वाच्या भाषांपैकी एक आहे, याबद्दल कुणाचे दुमत व्हायचे कारण नाही. मराठी भाषेचा इतिहासही तितकाच रंजक आणि उद्बोधक आहे. त्याचा संबंध मराठी माणसांच्या कर्तृत्वाशी आहे हे येथे आवर्जून नोंदवले पाहिजे. आजच्या मराठी भाषेचा विकास टप्प्याटप्प्याने होत गेला. वेगवेगळ्या शतकांमध्ये महाराष्ट्रात ज्या राजवटींची सत्ता होती त्यांचाही प्रभाव भाषेच्या विकासावर पडला. या सर्वांच्या प्रभावातून आजची मराठी भाषा विकसित झाली. या बाबींचा आढावा घुमान (पंजाब) येथे होणाऱ्या **८८ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे नियोजित अध्यक्ष व संत साहित्याचे गाढे अभ्यासक डॉ. सदानंद मोरे** यांनी घेतला आहे.

गेली काही वर्षे मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळवण्याची चर्चा चालली आहे, तिचाही संबंध या इतिहासाशी आहे.

आपण आज जी मराठी भाषा बोलतो वा लिहतो तिचे रूप कसे सिद्ध आहे हे पाहण्यासाठी उलट्या गतीने मागे जायचे ठरवले तर असे दिसेल की १८१८ साली पेशवाई बुडून मराठ्यांचे राज्य विस्तारले गेल्यानंतर महाराष्ट्रात एक वेगळी बाब दिसून आली. ती म्हणजे शाळा, कॉलेज, प्रशासन इत्यादीच्या माध्यमातून इंग्रजी भाषेचा शिरकाव. गरज म्हणून तेव्हाचे मराठी लोक इंग्रजी भाषा शिकू लागले. ती राज्यकर्त्यांची भाषा असल्यामुळे तिच्यातून लिहू, बोलू लागले. त्याचा परिणाम म्हणून इंग्रजी शब्द मराठीत घुसले. मराठी शब्द इंग्रजीवरून बोलण्याची सवय लागली. विशेष म्हणजे इंग्रजीच्या प्रभावामुळे नवशिक्षितांनी मराठीत इंग्रजी भाषेतील अनेक लकबी उचलल्या. मराठी वाक्यरचनेवरही त्याचा परिणाम झाला त्यामुळे व त्यातूनच आजच्या आपण बोलतो त्या मराठीचे रूप सिद्ध झाले. मराठीतील हे परिवर्तन विष्णुशास्त्री चिपळूणकर यांच्या निबंधमालेतील लेखनामधून आढळून येते. शास्त्रीबुवांनी मराठीला संस्कृत आणि इंग्रजी वळणाची पंडिती भाषा बनवले अर्थात आधुनिक विचार मराठीत व्यक्त करण्यासाठी अशा काही गोष्टांची आवश्यकता होती हेही विसरता कामा नये. त्यामुळे चिपळूणकरांच्या मराठीतील अतिरिक्त अंलकारिक्ता सोडली. तर हे ठीकच झाले असे म्हणता येईल.

महाराष्ट्रात ब्रिटिश राजवट येण्यापूर्वी येथील लोक जी मराठी बोलत तेसुद्धा मराठीचे मूळ रूप मानता येत नाही. तेराव्या शतकाच्या अखेरीस महाराष्ट्रातील मराठी लोकांची म्हणजे यादव घराण्याची राजकीय सत्ता नामशेष होऊन तेथे मुसलमान राजवट आली. या धर्माचे राज्यकर्ते अरबी, तुर्की आणि फारसी भाषा बोलत असत. यातील भाषांपैकी शेवटी फारसी भाषा भारतात व महाराष्ट्रात रुजली असली तरी फारसी भाषा, अरबी आणि तुर्की भाषांच्या प्रभावातून मुक्त नव्हती हे लक्षात ठेवले पाहिजे. थोडक्यात तेराव्या शतकापासून सतराव्या शतकापर्यंत छत्रपती शिवाजी महाराजांनी मराठ्याचे स्वराज्य स्थापन करण्याच्या कालापर्यंत मराठी व फारसी यांच्यात अशी आंतरक्रिया होत होती. तिच्यातून मराठी पुन्हा एकदा घडत होती. या प्रकारच्या मराठीचा पुरावा विशेषत: सरकारी दफ्तरातील व राज्यव्यवहारातील कागदपत्रांमध्ये पुरेसा मिळू शकतो. संत एकनाथांची भारुडे त्यासाठी सर्वोतम साधन.

### मराठी झाली राजभाषा

मराठीवरील हे अतिक्रमण हटवायचे असेल तर त्यासाठी राजसत्ताच हवी होती. सुदैवाने



शिवाजी महाराजांच्या रूपाने मराठी भाषेला ती मिळाली. महाराजांनी पंडितांकरवी राज्यव्यवहारकोश सिद्ध करून राज्यकारभारातील फारसी शब्द हटवले आणि मराठीला खऱ्या अर्थाने राजभाषा बनवले. मराठीची ही अवस्था फार दिवस टिकू शकली नाही. कारण त्यानंतर मराठी सत्तेचा विस्तार उत्तरेत झाल्यानंतर परत एकदा मराठी पर्शियन देवाणघेवाणीला जोर चढला. अर्थात यावेळी मराठी माणसांची सत्ता असल्याने हा व्यवहार एकतर्फी नव्हता. मराठीसुद्धा इतर भाषांवर प्रभाव पाडीत होती.

**पण मग मराठीचे मूळ रूप समजावे तरी कोणते?**

या प्रश्नाच्या उत्तरासाठी इस्लामी राजवटींच्याही मागे जावे लागते. यादवकाळ हा मराठी भाषेचा सुवर्णकाल मानायला हरकत नसावी. या काळात विशेषत: महानुभाव यांची वारकरी संप्रदायातील लेखक-कवींनी मराठी भाषेला साहित्यभाषेचे रूप दिले. यादवकाळात घरात, दारात, दरबारात, कारभारात, देवळात, न्यायलयात सर्वत्र मराठीचा वापर होऊ लागला. हा विशेषत: तत्कालीन संस्कृत आणि कन्नड या भाषांच्या वर्चस्वाला जणू शह होता. यादवकालीन मराठी भाषा ही इंग्रजी किंवा फारसी अशा परकीय भाषांच्या प्रभावापासून पूर्णपणे मुक्त होती.

यादवकाळ हा खरे तर इसवी सनाच्या सुरुवातीच्या पुढच्या मागच्या काही शतकांची म्हणजे सातवाहन काळाची आठवण करून देणारा होता. हा काळ म्हणजे महाराष्ट्रीय प्राकृत भाषेच्या प्रसाराच्या काळ होय. सातवाहन राजांनी महाराष्ट्री साहित्यशास्त्रातही प्रवेश केला. महाराष्ट्रीचा झेंडा सर्वत्र फडकला. प्राकृत संवादाशिवाय संस्कृत नाटक शक्य नाही. संस्कृत साहित्यशास्त्रातील अलंकारांच्या, रसध्वनीच्या उदाहरणांवरही महाराष्ट्री काव्याची छाप स्पष्ट दिसून येते. सातवाहनराजांचे शिलालेखसुद्धा महाराष्ट्रीमध्येच!

खुद्द महाराष्ट्री प्राकृताची जडणघडण कशी झाली याविषयी विद्वानामध्ये मतभेद आहेत. प्राकृत भाषांना संस्कृतोद्भव मानणाऱ्या पंडितांचा एक वर्ग आहे. त्याचप्रमाणे संस्कृत हीच प्राकृतातून निघाली असे म्हणणारे राजारामशास्त्री भागवतासारखे महापंडितही आहेत. माझ्यामते हिंदुस्थानातील भाषेच्या उत्क्रांतीच्या प्रक्रियेत प्राथमिक स्वरूपाच्या (आदिप्राकृत म्हणता येईल?) प्राकृतावर संस्कार होत-होत म्हणजे तिला अधिकाधिक refine करत-करत महाराष्ट्री प्राकृत तयार झाली आणि महाराष्ट्री प्राकृत आणखी refine करून संस्कृत सिद्ध झाली. इतरत्र संस्कृतची चलती असताना सातवाहनराजे मात्र महाराष्ट्री प्राकृतला धरून बसले हे विशेष मानायला हवे.

सातवाहन राजवटीच्या अंतानंतर स्थळकाळाचा महिमा म्हणून आधी संस्कृतने डोके वर काढले. वाकाटकी राजवटींमध्ये संस्कृतचा उपयोग होऊ लागला. तोच कित्ता गिरवाणाऱ्या चालुक्य राष्टकुटादिकांनी नतंरच्या काळात कन्नड भाषेला आश्रय दिल्याने मराठीची कोंडी झाली. गळचेपी म्हटली तरी चालेल! या कठीण काळात महाराष्ट्रातील जैनधर्मीय पंडितांना महाराष्ट्रात रचना करून महाराष्ट्रीला तारण्याचे महत्त्वकार्य केले.

**संजीवनी मिळाली**

मागे पडलेल्या महाराष्ट्री प्राकृताला संजीवनी मिळाली ती देवगिरीच्या यादवांच्या राजवटीत. या काळात कन्नडला मागे सारून आणि संस्कृत काळात बरोबर स्पर्धा करून ज्ञानेश्वरदेवांनी प्राकृतला पुन्हा एकदा गतवैभव प्राप्त करून दिले. दरम्यान या भाषेवर संस्कृतचा आणि काही प्रमाणात कन्नडचा प्रभाव पडणे स्वाभाविक व अटळ आहे.

यादवकालीन भाषा ही आजच्या मराठीचे ज्ञात पूर्वरूप म्हणता येते. या काळातील लोकाचरित ज्ञानेश्वरी, संतांचे अभंग लोक आजही मराठीतील रचना म्हणूनच वाचतात व त्या त्यांना समजतात. त्यांच्या आधारेच कीर्तनप्रवचनांचा धार्मिक, आध्यात्मिक व्यवहार होतो. त्यामुळे त्यांना समकालीन समजायला हरकत नाही.

## मराठीच्या अभिजात दर्जासाठी पत्रांचा पाऊस पाडा

मराठी भाषेला अभिजात दर्जा देण्यासाठी राज्य शासनाचा मराठी भाषा विभाग प्रयत्न करीत आहे. या प्रयत्नांमध्ये सर्व स्तरातील लोकांनी सहभागी व्हावे आणि मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळवण्यासाठी एक लोकचळवळ उभी करावी, असे आवाहन मराठी भाषा विभागाचे मंत्री विनोद तावडे यांनी केले आहे. या लोकचळवळीत प्रसारमाध्यमे, सर्व खासदार, सर्व आमदार, सर्व कुलगुरु, महाविद्यालये, महापौर, नगरसेवक, जिल्हा परिषद अध्यक्ष व सदस्य, मुख्याध्यापक, शिक्षक, मराठीप्रेमी जनतेने सहभागी व्हावे, असे आवाहन विनोद तावडे यांनी केले आहे. यासाठी साहित्य अकादमीचे अध्यक्ष डॉ. विश्वनाथ प्रसाद तिवारी यांच्या नावे मराठी भाषेला अभिजात दर्जा मिळावा, अशी आग्रही विनंती करणारी पत्रे पाठवावीत. पत्र पाठविण्यासाठी साहित्य अकादमीचा पत्ता- डॉ. विश्वनाथ प्रसाद तिवारी, अध्यक्ष, साहित्य अकादमी, रवींद्र भवन, ३५, फिरोजशाह मार्ग, नवी दिल्ली-११० ००१ असा आहे. किंवा vptiwari378@hotmail.com आणि secretary@sahity-akademi.gov.in या ईमेल आयडीवरही आपण पत्र पाठवू शकता.



सातवाहन काळापासून आज बोलल्या जाणाऱ्या महाराष्ट्रातील लोकांच्या भाषेला वेगवेगळ्या टप्प्यावर प्राकृत मराठी, देशी, महाराष्ट्री अशी नावे पडली व ही नावे नेहमीच समानार्थी समजण्यात आली. ज्ञानेश्वर माझा 'मराठीचि बोलु कौतुके ' असे म्हणतात तर तुकाराम शिष्या बहिणाबाई तुकोबांच्या संदर्भात 'महाराष्ट्र भाषेत वेदांताच्या अर्थ बोलिला लोक्यात सर्वदृष्टा' असे म्हणतात. यावरून या सर्व एकाच भाषेच्या अवस्था आहेत हे सिद्ध होते आणि म्हणूनच भाषेची अभिजातता सिद्ध होते. मग तिला सरकारी दर्जा मिळो न मिळो !

या भाषेचे भविष्य ती बोलणाऱ्या लोकांच्या म्हणजेच आपल्या हातात आहे. अभिजात भाषेच्या अंगी आपला मूळ गाभा कायम ठेवून काळानुसार नित्य नवी रूपे धारण करण्याची क्षमता असते. ती मराठीमध्येही आहे. मात्र त्या क्षमतेचा कसा उपयोग करायचा हे शेवटी आपणच ठरवणार. बाजारपेठी जगाच्या आहारी न जाता तिला अधिक सक्षम करण्याची प्रतिज्ञा आपणच करायला हवी.

❑ ❑

# जलयुक्त शिवार

**राज्याच्या काही भागात दर दोन वर्षांनी या ना त्या कारणांनी निर्माण होणाऱ्या टंचाईवर मात करण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी 'जलयुक्त शिवार' अभियान ही नवी योजना राबवण्याचा निर्णय घेतला आहे. या नावीन्यपूर्ण योजनेनुसार जलसंधारणांतर्गत सर्वसमावेशक उपाययोजनाद्वारे एकात्मिक पद्धतीने शाश्वत शेतीसाठी तसेच पिण्यासाठी पाणी उपलब्ध करून देण्यास प्राधान्य दिले आहे. या योजनेद्वारे २०१९ पर्यंत संपूर्ण महाराष्ट्र टंचाईमुक्त करण्याचा केलेला निर्धार खऱ्या अर्थाने क्रांतिकारीच... या योजनेविषयी थोडेसे.**



**एस. आर. माने**

राज्यात सतत उद्‌भवणारी टंचाई परिस्थिती विचारात घेऊन सर्वांसाठी, पाणी टंचाईमुक्त महाराष्ट्र २०१९ अंतर्गत 'जलयुक्त शिवार' अभियान राज्य शासनाने हाती घेतले आहे. २०१४-१५ मध्ये भूजल पातळीत २ मीटरपेक्षा जास्त घट झालेल्या १८८ तालुक्यातील २ हजार २३४ गावे तसेच शासनाने टंचाई परिस्थिती जाहीर केलेल्या २२ जिल्ह्यातील १९ हजार ५९ गावांमध्ये हे अभियान प्राधान्याने राबवण्यात येत आहे. भविष्यात राज्याच्या उर्वरित भागात पाणी टंचाई निर्माण होऊ नये, यासाठी उपाययोजना करण्यावरही भर दिला आहे. या अभियानात विविध विभागाकडील योजना, अशासकीय संस्था आणि लोकसहभाग यावर विशेष लक्ष केंद्रित केले आहे.

अपुऱ्या आणि अनियमित पावसामुळे राज्यात टंचाई परिस्थिती निर्माण झाल्याने कृषी क्षेत्रावर त्याचा विपरीत परिणाम होतो. या बाबी राज्याच्या विकासात एक आव्हान ठरत आहेत. राज्यात गेल्या चार दशकात पाण्याच्या पुरेशा उपलब्धीअभावी कोरडवाहू क्षेत्रातील पिकांच्या उत्पादनात मोठ्या प्रमाणात चढ-उतार दिसून येतो. निसर्गाच्या लहरीपणावर अवलंबून असणारी ही परिस्थिती बदलण्यासाठी हे अभियान एकात्मिक पद्धतीने सर्व विभागांच्या समन्वयाने नियोजनबद्ध आराखडा तयार करीत आहे. हे अभियान राबवल्यास पिण्याचे पाणी व पिकास संरक्षित सिंचन देण्याची व्यवस्था निश्चितपणे निर्माण होईल. गेल्या दोन वर्षात राज्यात पाणी अडविणे आणि जिरविण्यासाठी

जलसंधारणाच्या राबवलेल्या विविध प्रणालीमुळे पाणी टंचाईवर मात करण्यास मदत झाली आहे. या सर्व कार्यक्रमाची फलश्रुती विचारात घेऊन 'जलयुक्त शिवार' अभियान राज्य शासनाने प्रभावीपणे राबवण्याचा निर्णय घेतला आहे. नवीन वर्षातील जानेवारीमध्येच राज्याच्या सर्व तालुक्यात जलयुक्त शिवार अभियानांतर्गत कामे सुरू करण्याचा निर्धार शासनाने केला आहे. या अभियानाला गती देण्याच्या दृष्टीने पुणे विभागीय आयुक्त विकास देशमुख यांनी संबंधित अधिकाऱ्यांसमवेत चर्चा करून मार्गदर्शक सूचना केल्या.



**जलयुक्त शिवार अभियानांतर्गत...**

- पाणलोट विकासाची कामे, साखळी सिमेंट नालाबांधांचे खोलीकरण आणि रुंदीकरणासह कामे
- जुन्या जलसंरचनांचे पुनर्जीवन
- कोल्हापूर पद्धतीच्या साठवण बंधाऱ्यांची दुरुस्ती
- पाझर तलाव, लघुसिंचन तलाव दुरुस्ती
- नूतनीकरण व क्षमता पुनर्स्थापित करणे
- पाझर, गाव, साठवण, शिवकालीन, ब्रिटिशकालीन आणि निजामकालीन तलावातील माती व नालाबांधातील गाळ काढणे
- मध्यम व मोठ्या प्रकल्पाच्या सिंचन क्षमतेनुसार प्रत्यक्ष वापर होण्यासाठी उपाययोजना करणे
- छोटे ओढे/नाले जोड प्रकल्प राबवणे
- विहीर/बोअरवेल पुनर्भरण, पिण्याच्या पाण्याचे स्रोत तसेच पाणी वापर संस्थाचे बळकटीकरण
- कालवा दुरुस्ती या उपाययोजनांवर भर

राज्यात जलयुक्त शिवार अभियानासाठी विविध विभागाकडील विविध योजनांतर्गत उपलब्ध निधीची एकत्रित सांगड घालून जलसंधारणाची कामे हाती घेण्यात येत आहेत. यामध्ये कृषी, वन, सामाजिक वनीकरण, लघु सिंचन, जलसंपदा, जिल्हा परिषदेकडील कृषी व लघुसिंचन, पाणी पुरवठा व स्वच्छता, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा अशा जिल्हास्तरीय यंत्रणांमध्ये समन्वय राखून हे अभियान राबवण्यात येत आहे.

याबरोबरच नावीन्यपूर्ण योजनासाठी जिल्हा नियोजन समितीकडे उपलब्ध असलेला ३.५ टक्के निधी तसेच राज्य व जिल्हा स्तरावर उपलब्ध असलेला मदत व पुनर्वसन निधी जलयुक्त शिवार अभियानासाठी प्राधान्यक्रमाने वापरण्यास शासनाने मान्यता दिली आहे. यामधून जेसीबीचा वापर करून नाल्यातील गाळ काढणे तसेच खोलीकरण/रुंदीकरणाची कामे घेण्याचे अधिकार शासनाने जिल्हाधिकाऱ्यांना दिले आहेत. या अभियानाचा आराखडा तयार करणे, प्रभावी अंमलबजावणी, समन्वय व सनियंत्रणासाठी उपविभागीय अधिकाऱ्यांची तालुकास्तरावर तर जिल्हाधिकाऱ्यांची जिल्हास्तरावर नोडल अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.

सर्वांसाठी पाणी-टंचाईमुक्त महाराष्ट्र २०१९ अंतर्गत टंचाई परिस्थितीवर कायमस्वरूपी मात करण्यासाठी 'जलयुक्त शिवार' अभियान राज्यात राबवण्यात येत आहे. ❒❒

**दुष्काळ निर्मूलनासाठी दरवर्षी ५ हजार गावांची निवड करून ती जलयुक्त करण्याचे शासनाने ठरविले आहे. या योजनेचा आत्मा लोकसहभाग आहे. राज्य कायमस्वरूपी दुष्काळमुक्त करण्याच्या या कामात लोकसहभाग वाढविण्यावर शासनाचा भर राहील.**
**- पंकजा मुंडे, जलसंधारणमंत्री**



### 'जलयुक्त शिवार' अभियानाचे काही प्रमुख उद्देश...

- पावसाचे पाणी गावाच्या शिवारातच अडविणे
- भूगर्भातील पाणी पातळीत वाढ करणे
- राज्याच्या सिंचन क्षेत्रात वाढ करून शेतीसाठी संरक्षित पाणी व पाण्याच्या वापराच्या कार्यक्षमतेत वाढ करणे, सर्वांना पुरेसे पाणी उपलब्ध करण्याची शाश्वती निर्माण करणे
- भूजल अधिनियमाची अंमलबजावणी
- विकेंद्रित पाणीसाठा निर्माण करणे
- पाणी साठवण क्षमता निर्माण करणारी नवीन कामे हाती घेणे
- अस्तित्वात असलेले व निकामी झालेले बंधारे, गावतलाव, पाझरतलाव, सिमेंट बंधारे आदी जलस्त्रोतांची साठवण क्षमता वाढविणे
- जलस्रोतातील गाळ लोकसहभागाने काढून पाणीसाठा वाढविणे
- पाण्याच्या ताळेबंदाबाबत आणि कार्यक्षम वापराबाबत प्रभावी जनजागृती तसेच वृक्षलागवडीस प्राधान्य देणे

### अभियानाच्या यशस्वी अंमलबजावणीसाठी...

- विभागीय आयुक्तांच्या अध्यक्षतेखाली विभागीय स्तरावर समन्वय समिती
- जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हास्तरीय समिती
- उपविभागीय अधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली तालुकास्तरीय समिती



# गतिमान

# सागरी पथ

**मुंबई शहराला आंतरराष्ट्रीय दर्जाचे व्यापारी केंद्र बनविण्यासाठी राज्यशासन प्राधान्याने प्रयत्न करीत आहे. त्यासाठी विविध पायाभूत सुधारणा राबवण्यात येणार आहे. त्या अनुषंगाने सागरीरस्ते प्रकल्पाला चालना देण्यात येत आहे. प्रकल्पामुळे मुंबईच्या वाहतूककोंडीला सुलभ व गतिशील प्रवासाचा पर्याय मिळू शकतो. हा प्रकल्प पूर्णत्वास नेण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे जोरदार प्रयत्न सुरू आहेत. प्रकल्पातील पर्यावरण अडथळे दूर करण्यासाठी नवी दिल्ली येथे महत्त्वपूर्ण बैठक झाली. हा प्रकल्प पूर्ण झाल्यावर येत्या पाच वर्षांत या महानगराच्या वैभवात आणि सौंदर्यात भर पडेल.**

प्रकाश बाळ जोशी

मुंबई सागरी रस्ते प्रकल्प केंद्र सरकारच्या विविध प्राधिकरणाकडून परवानगी आणि निधीअभावी दीर्घ कालावधीपासून प्रलंबित होता.

बृहन्मुंबई महानगरपालिकेने या प्रस्तावाच्या व्यवहार्यतेबद्दल आणि तांत्रिकतेबद्दल तज्ज्ञांच्या एका समितीचे गठन केले होते. तीनही बाजूंनी समुद्र असणाऱ्या मुंबईसाठी या प्रकल्पाच्या आवश्यकतेचा या समितीने अभ्यास केला आहे. महाराष्ट्र शासनाच्या पुढाकाराने स्थापित केलेल्या आणि तत्कालीन महानगरपालिका आयुक्त सुबोध कुमार यांच्या नेतृत्वात गठीत झालेल्या या समितीत नगररचना विभागाच्या अनेक तज्ज्ञांचा समावेश होता. अनेक वर्षांच्या अभ्यासानंतर तज्ज्ञांनी एक निष्कर्षही काढला आहे, तो म्हणजे हा प्रस्तावित सागरी रस्ते प्रकल्प मुंबईसाठी एक रिंगरोड म्हणून तर काम करू शकतोच सोबतच उत्तरेकडून दक्षिणेकडे आणि पूर्वेकडून पश्चिमेकडे वाहतूक सुलभ करण्यासाठी उपयुक्त ठरू शकतो.

या प्रकल्पाची अद्ययावत माहिती बृहन्मुंबई महानगरपालिकेने नुकतीच केंद्रीय पर्यावरण मंत्रालयाला नवी दिल्ली येथे केलेल्या सादरीकरणात दिली आहे. मुंबईला मोठ्या प्रमाणात चांगल्या पायाभूत सुविधा देण्यासाठी प्रयत्नरत असलेले महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यावेळी जातीने उपस्थित होते. ते स्वत: या महत्त्वाकांक्षी प्रकल्पाचा पाठपुरावा करीत आहेत. काही पर्यावरणाविषयक परवानगीचे प्रश्न या महानगराच्या रस्ते प्रकल्पाशी जुळलेले आहेत.

बृहन्मुंबई महानगरपालिका आणि राज्य सरकारने पर्यावरण विभागाला याबाबत आश्वस्त केले आहे. यामध्ये समुद्राच्या लाटांना अडथळा होईल अशा प्रकारचे कोणतेही बांधकाम समुद्रकिनाऱ्यानजीक ३०० ते ४०० मीटर परिसरात करणे टाळले जाईल, याशिवाय समुद्रकिनाऱ्यावरील बांधकामाच्या संदर्भात सध्या अस्तित्वात असणाऱ्या कायद्याचे उल्लंघन होणार नाही, याचीही

शाश्वती देण्यात आली आहे. प्रस्तावित प्रकल्पामुळे मुंबईच्या ट्रॅफिक जॅममुळे मंदावलेल्या वाहतुकीत सुलभता तर येईलच सोबतच शहराच्या सौंदर्यातही मोठी भर पडणार आहे. या प्रकल्पामध्ये मैदाने, बगिचे आणि नागरिकांना फेरफटका मारण्यासाठी मोठ्या प्रमाणात जागा उपलब्ध होणार आहे. याशिवाय या प्रकल्पाच्या निर्मितीमध्ये पुढच्या काळातील सागरी वाहतुकीच्या आली आहे. प्रवाशांसाठी अद्ययावत बसस्थानके व अन्य आवश्यक सुविधा पुरविल्या जाणार आहेत. प्रस्तावित प्रकल्पाला आकार देताना कमीत कमी निधीत काम व्हावे या हेतूने सध्या अस्तित्वात असणाऱ्या रस्त्यांनाही या प्रकल्पामध्ये समाविष्ट करण्यात आले आहे. त्यांची रुंदी वाढवून आणि आवश्यकता असेल त्या ठिकाणी समुद्राच्या लाटांमुळे वाहतूक यामध्ये काही विलंब झाल्यास त्यात काही वर्षांची वाढ होऊ शकते.

हा रस्ता समुद्रातून आणि समुद्राच्या तळातील बोगद्यातून बनविला जात असल्यामुळे पर्यावरणाला कुठलाही धोका पोहचणार नाही याची काळजी घेतली जात आहे. या संदर्भातील अभ्यास मुंबईतील एजेंसीसह गोवा येथील नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ ओशोनोग्रॉफी सोबत केला जात आहे.



**मुंबईच्या सागरी मार्गातील पर्यावरण संदर्भात तसेच सीआरझेडमधील नियमात सुधारणा करण्यासाठीच्या बैठकीत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासमवेत खा. पूनम महाजन, मुंबई महापालिका आयुक्त सीताराम कुंटे.**

शक्यतेसाठीही पर्यायी विचार करण्यात आला आहे.

प्रस्तावित सागरी रस्ते प्रकल्प हा केवळ थेट रस्त्यांचे सरळसरळ बांधकाम नसून दोन ठिकाणी समुद्राच्या आतून बोगदा करण्यात येणार आहे. या प्रकल्पाची किंमत १० हजार कोटींच्या घरात आहे. या चार पदरी रस्त्यावर दोन पथ हे बस वाहतुकीसाठी राखून ठेवण्यात आले आहे. मुंबईतील प्रवासी वाहतुकीला प्रभावी करण्याची महत्त्वाकांक्षा लक्षात घेऊन रस्त्यांची आखणी करण्यात विस्कळीत होणार नाही, याची काळजी घेतली गेली आहे. लाटांचा प्रवाह बाधित होणार नाही अशा पद्धतीने उन्नत रस्त्यांचे नियोजन करण्यात आले आहे. या प्रस्तावित प्रकल्पासाठी ७० हेक्टर जमीन अधिग्रहीत करण्यात आली आहे.

प्रकल्पाचा प्रस्ताव पूर्ण असून पर्यावरणाच्या परवानग्या मिळण्यासाठी जवळपास एक वर्षाचा अवधी लागण्याची शक्यता आहे. सागरी रस्ते प्रकल्प पूर्ण होण्याचा कालावधी ५ ते ६ वर्षांचा असून

सागरी रस्त्यामुळे सध्या अस्तित्वात असणाऱ्या पूर्व द्रुतगती मार्ग आणि पश्चिम द्रुतगती मार्गावरील वाहतुकीचा भार कमी होईल आणि दक्षिण मुंबईकडे जाण्यासाठी नवा पर्याय उपलब्ध होईल. याशिवाय या प्रकल्पामुळे मुंबईच्या सौंदर्यात मोठी भर पडणार आहे.

(लेखक हे महाराष्ट्रातील ज्येष्ठ पत्रकार असून विविध वृत्तपत्रासाठी स्तंभलेखन करतात.)
**संपर्क :** ०९८६९०१४५५५

### प्रकल्पाची किंमत १० हजार कोटी

- **मुंबईचे वैभव सांगणाऱ्या क्वीन नेकलेस, वांद्रे-वरळी सी-लिंक याप्रमाणेच मुंबईच्या सौंदर्यात हा प्रकल्प भर घालणार**
- **शहराची वाहतूक व्यवस्था दर्जेदार होणार**

### पाच ते सहा वर्षांत प्रकल्प पूर्ण होणार

- **मुंबईसाठी हा एक रिंगरोड आहे. सोबतच उत्तरेकडून दक्षिणेकडे आणि पूर्वेकडून पश्चिमेकडे वाहतूक व्यवस्थेला यामुळे मदत मिळेल.**
- **अधिग्रहित जमिनीचा वापर पार्क, बाग-बगिचे, सायकल ट्रॅकसाठी**

### बस वाहतुकीला प्राधान्य

- **या चार पदरी रस्त्यावर दोन पथ हे बस वाहतुकीसाठी राखीव आहेत. मुंबईतील प्रवासी वाहतूक गतिशील व प्रभावी होईल.**
- **ट्रॅफिक जॅम होऊ नये यासाठी खासगी वाहतुकीवर आवश्यक निर्बंध**




# महाकुंभ विज्ञानाचा

**तब्बल ५४ वर्षानंतर मुंबई व मुंबई विद्यापीठ विज्ञानमय झाले होते. कारण होते १०२ व्या भारतीय विज्ञान परिषदेचे. मुंबई विद्यापीठाने केलेले हे आयोजन 'न भूतो न भविष्यती' अशा प्रचंड प्रतिसादाने यशस्वी झाले. देशविदेशातील विज्ञान व तंत्रज्ञान क्षेत्रातील १६,६१० प्रतिनिधी यामध्ये सहभागी झाले होते. हजारो विद्यार्थी व विज्ञानप्रेमींनी परिषदेला तसेच विज्ञान प्रदर्शनाला आवर्जून भेट दिली.**

विनोद माळाळे

मुंबईत ३ ते ७ जानेवारी २०१५ या ५ दिवसांच्या कालावधीत विज्ञान व तंत्रज्ञानामधील ३२ सिम्पोझिया व १४ सेशन्स होती. यामध्ये ॲग्रिकल्चर ॲण्ड फॉरेस्ट्री सायन्स, ॲनिमल, वेटेरनरी ॲण्ड फिशरी सायन्स, एन्थ्रोपॉलॉजी ॲण्ड बिहेवियरल सायन्स, केमिकल सायन्स ॲण्ड टेक्नॉलॉजी, अर्थ सिस्टम सायन्स, इंजिनिअरींग सायन्स, एनव्हायरनमेंटल सायन्स, इन्फॉर्मेशन ॲण्ड कम्युनिकेशन सायन्स ॲण्ड टेक्नॉलॉजी, मटेरीअल सायन्स, मॅथेमेटीकल सायन्स, न्यू बायोलॉजी, फिजिकल सायन्स, प्लॅन्ट सायन्स या विषयावर होती. यामध्ये देशविदेशातील १५० हून अधिक शास्त्रज्ञ व संशोधकांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले. यात नोबेल पारितोषिक विजेते शास्त्रज्ञांचाही सहभाग होता.

विज्ञानाचे अंतिम ध्येय हे मानवाच्या विकासासाठी असते. हेच सूत्र या परिषदेचे होते. 'मानवी विकासासाठी विज्ञान व तंत्रज्ञान' हा मुख्य विषय या परिषदेद्वारे मांडण्यात आला. याव्यतिरिक्त चिल्ड्रन्स सायन्स, वुमेन सायन्स, कम्युनिकेटर मीट, स्वच्छ भारत अभियान व मेक इन इंडिया अशी विशेष चर्चासत्रेही यात ठेवली होती.

भारतीय विज्ञान परिषद १९१४ साली तत्कालीन कलकत्ता येथे स्थापण्यात आली व येथेच पहिली परिषद घेण्यात आली. यानंतर १९४७ साली दिल्ली येथे भरलेल्या ३४ व्या विज्ञान परिषदेचे अध्यक्ष हे पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू होते. यानंतर या परिषदेचे उद्घाटन पंतप्रधानांच्या हस्ते करण्याची परंपरा सुरू झाली. यानुसार या परिषदेचे उद्घाटन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते दि. ३ जानेवारीला झाले. पंतप्रधानांनी त्यांच्या शैलीमध्ये भारतीय विज्ञान परिषदेचे उद्घाटन करून मौलिक मार्गदर्शन केले. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी ज्येष्ठ संशोधक डॉ. वसंत गोवारीकर यांना श्रद्धांजली अर्पण करून भाषणास सुरुवात केली. संशोधनपूरक वातावरण तयार करणे महत्त्वाचे असल्याचे सांगत, पंतप्रधानांनी संशोधनास बळ देण्यासाठी लाल फितीला फाटा देऊन, विद्यापीठांना अधिक स्वायत्तता व स्वातंत्र्य देण्यात येईल, असे आश्वासन दिले.



पंतप्रधानांच्या भाषणाने उपस्थित समुदाय मोहित झाला होता. याच उद्घाटन समारंभात विज्ञान व तंत्रज्ञानमंत्री डॉ. हर्षवर्धन यांनी विज्ञान हे रचनात्मक व विकासात्मक कार्यक्षेत्रासाठी उपयोगात आणले पाहिजे, विध्वंसात्मक कार्यासाठी नाही असे सांगितले तर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विकासात विज्ञानाचे महत्त्व मोठे आहे. येथील संशोधकांनी विज्ञान व तंत्रज्ञानाच्यामार्फत आपत्ती व्यवस्थापनासंदर्भात काही उपाययोजना केल्या पाहिजेत, असे सांगितले.

### 'मंगळयान मोहीम'

भारतीय अवकाश संशोधन संस्थेचे माजी अध्यक्ष डॉ. के. राधाकृष्णन यांनी 'मंगळयान मोहिमे'बद्दल संपूर्ण माहिती दिली तसेच त्यांनी अगामी 'चांद्रयान-२' व चंद्र व सूर्य यासंबंधी अभ्यास करणाऱ्या

'आदित्य' या प्रकल्पाविषयी माहिती दिली. त्यांच्या ४५ मिनिटांच्या संवादात त्यांनी मंगळयान मोहीमच जिवंत केली. मॅथेमॅटिक्स व कम्प्युटिंग या विषयावर २००७ चे पुरस्कार विजेते एस.आर.एस. वर्धन यांनी एन्ट्रॉपी ॲण्ड प्रॉबाब्लिटी, २०१४ चे फिल्डमेडॅलिस्ट पुरस्कार विजेते मंजूल भार्गव यांनी 'नंबर थिअरी' २०१४ चा रोल्फ नेवानलिना



पुरस्कार विजेते सुभाष खोत यांनी कॉम्प्युटर सायन्स व २००२ चे रोल्फ नेवानलीना पुरस्कार विजेते मधू सुदान यांनी 'रिलायबल मिनिंगफूल कम्युनिकेशन' या विषयावर मार्गदर्शन केले. या विषयातील सध्याच्या संशोधनाचा ऊहापोह केला. शरीरविज्ञान व औषधामधील नोबेल पुरस्कार विजेते, रॅन्डी स्कहेमन यांनी 'मानवी सेल्स' या विषयावर मार्गदर्शन केले.

२००६ चे शांतता नोबेल पुरस्कार विजेते बांग्लादेशाचे मोहम्मद युनुस यांनी ग्रामीण बँक व वित्तीय पुरवठा यासंदर्भात विवेचन केले व सामाजिक व्यवसायानेच मानवाच्या समस्या सोडविण्यास मदत होईल व यास विज्ञानाचा सहभाग असणे आवश्यक आहे, असे प्रतिपादन केले. याच दरम्यान एमएमआरडीएच्या मैदानावर विज्ञान प्रदर्शनाचे म्हणजेच 'प्राईड ऑफ इंडिया' या प्रदर्शनाचे उद्‌घाटन केंद्रीय विज्ञान व तंत्रज्ञान मंत्री डॉ. हर्षवर्धन व उच्च व तंत्रशिक्षण मंत्री विनोद तावडे, उच्च व तंत्र शिक्षण राज्यमंत्री रवींद्र वायकर यांच्या हस्ते करण्यात आले. याच प्रदर्शनामध्ये अनेक बालवैज्ञानिकांशी भारताचे माजी राष्ट्रपती ए.पी.जे. अब्दुल कलाम यांनी संवाद साधला. बालवैज्ञानिकांचे त्यांनी कौतुकही केले त्याचबरोबर २०१४ चे शांततेचे नोबेल पारितोषिक विजेते कैलाश सत्यार्थी यांनीदेखील बाल विज्ञान परिषदेमध्ये मुलांशी संवाद साधला. 'सार्क देशातील विज्ञान व तंत्रज्ञान'या विषयावरील चर्चासत्रात श्रीलंकेतील नॅशनल ॲकेडमी ऑफ सायन्सचे अध्यक्ष ए. एम. मुबारक यांनी श्रीलंकेतील विज्ञान संशोधनाचा आढावा घेतला. श्रीलंकेचे ध्येय सध्या विज्ञान व तंत्रज्ञानात सुधारणा करणे, संशोधन व त्याच्या विकासाला चालना देणे हे आहे. त्यासाठी भारतासह अनेक देशांशी



संशोधनासंदर्भात सहकार्याचे करार करीत आहोत. नेपाळचे समीर दीक्षित यांनी नेपाळच्या संशोधनाबद्दल सांगितले. 'नेपाळ ॲकेडमी ऑफ सायन्स ॲण्ड टेक्नॉलॉजी' या संस्थेद्वारे मोठ्या प्रमाणावर संशोधन सुरू आहे. भारताचे इंडियन कौन्सिल ऑफ मेडीकल रिसर्चचे संचालक व्ही. एम. काटोच यांनी, 'सार्क' देशांनी संशोधनासाठी एकत्र येणे आवश्यक आहे, कारण या देशाच्या समस्या सारख्याच आहेत असे सांगितले.

संस्कृतद्वारे प्राचीन विज्ञान या

> **"भारताच्या आधुनिकीकरणातील विज्ञानाचे महत्त्व आपण जाणतो. विज्ञानाविषयी आपल्या समाजात प्रेम निर्माण व्हायला हवे. शेतीचा दर्जा सुधारणे, ग्रामीण भागाला आवश्यक तंत्रज्ञान परवडणाऱ्या दरात उपलब्ध करून देणे, दर्जेदार आरोग्यव्यवस्था उभारणे आणि भारताला उत्पादन क्षेत्रात अग्रेसर बनवणे हे विज्ञान-तंत्रज्ञानामुळे शक्य होईल.**
> **- नरेंद्र मोदी, पंतप्रधान**

चर्चासत्रामध्ये भारतातील प्राचीन विज्ञानाविषयी विविध मान्यवरांनी मते व्यक्त केली. या चर्चासत्रामध्ये केंद्रीय पर्यावरणमंत्री प्रकाश जावडेकर यांनी संस्कृतमधील उपलब्ध असलेल्या साहित्याकडेही लक्ष देणे आवश्यक असल्याचे सांगितले. महासंगणकाचे प्रणेते डॉ. विजय भटकर यांनी आपल्या प्राचीन ग्रंथामध्ये अनेक वैज्ञानिक शोधांची नोंद आहे, त्यांचा समावेश शालेय अभ्यासक्रमात करावा, अशी सूचना परिसंवादात केली.

रसायनशास्त्रातील नोबेल विजेत्या इस्त्रायलच्या अदा इ. योनाथ यांनी 'रायबोसोमस, रिझीस्टन्स टू ॲन्टीबॉयटिक्स ॲण्ड ओरीजन ऑफ लाईफ' या विषयावर तर शरीरशास्त्र व औषधे या विषयातील नोबेल विजेते पॉल नर्स यांनी 'कंट्रोलिंगद सेल सायकल' या विषयावर मार्गदर्शन केले.

तिसऱ्या दिवशी आदिवासींचे आरोग्य विज्ञान व तंत्रज्ञानाला आव्हान या विषयावर 'सर्च' चे संचालक डॉ. अभय बंग यांनी मार्गदर्शन केले. वैद्यकशास्त्रावरील नोबेल विजेते ऑस्ट्रेलियातील रॉबीन वॉरेन यांनी वैद्यकशास्त्रावरील त्यांच्या शोधासंदर्भात मार्गदर्शन केले.

(लेखक मुंबई विद्यापीठात जनसंपर्क अधिकारी आहेत.)
**संपर्क : ०९८६९७९००६६**

## स्वच्छ भारत

- **भारतीय विज्ञान परिषदेत 'स्वच्छ भारत : दी रोल ऑफ सायन्स, टेक्नॉलॉजी ॲण्ड इनोव्हेशन' कार्यक्रमात उपस्थितांच्या प्रश्नांना ज्येष्ठ शास्त्रज्ञ डॉ. रघुनाथ माशेलकर यांनी उत्तरे दिली तसेच त्यांनी 'स्वच्छतागृह आंदोलना'ची संकल्पना मांडली. सत्याग्रहाप्रमाणे स्वच्छतागृहांसाठी आंदोलन केले तरच स्वच्छ भारताचे स्वप्न पूर्ण होईल, असे त्यांनी सांगितले.**

# प्रभावी मुख्यमंत्री उत्स्फूर्त प्रतिसाद

**गुजरातमधील गांधीनगर येथे ७ ते ९ जानेवारी या काळात जागतिक प्रवासी दिवस साजरा झाला. ९ जानेवारी १९१५ रोजी महात्मा गांधी दक्षिण आफ्रिकेतून भारतात परत आले होते. या घटनेचे औचित्य म्हणून हा प्रवासी भारतीय दिवस दरवर्षी साजरा केला जातो. यावर्षी महात्मा गांधी यांच्या परतण्याला १०० वर्षे पूर्ण झाली. त्यामुळे या वर्षी हे राष्ट्रीय आयोजन गुजरातमध्ये करण्यात आले. या आयोजनाचा पहिला दिवस गाजविला केंद्रीय विदेश व प्रवासी भारतीय मंत्री सुषमा स्वराज यांनी. दुसऱ्या दिवशीचे आकर्षण ठरले पंतप्रधान नरेंद्र मोदी. तिसरा दिवस होता मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा. त्यांनी दोन ठिकाणी दोन सत्रात दोन प्रभावी भाषणे देऊन महाराष्ट्राचे महत्त्व आणि माहात्म्य उपस्थित देश-विदेशातील मान्यवरांच्या मनावर ठसवले. गुंतवणुकीसाठी महाराष्ट्र हे सर्वश्रेष्ठ राज्य असल्याचे बिंबवण्यात मुख्यमंत्री यशस्वी ठरले.**




गांधीनगर येथील महात्मा मंदिर परिसर म्हणजे दिल्लीतील प्रगती मैदानाच्या तोडीसतोड ठिकाण. येथील मुख्य कार्यक्रमाचा अतिविशाल हॉल हा दिल्लीच्या विज्ञान भवनाच्या भव्यतेत स्वत:ला सामावून घेतो. गांधीनगर आणि आजूबाजूचा सुंदर परिसर देश-विदेशातून आलेल्या साऱ्याच प्रवासी भारतीयांना आणि अन्य राज्यातील शिष्टमंडळाला गुजरातने कात टाकल्याची खात्री पटविण्यास पुरेसा होता. तीन दिवस हजारो अनिवासी भारतीयांनी या ठिकाणी ठाण मांडले होते. गुंतवणूक, परस्पर संवाद, अनेक करारांसोबतच देशभरातील नेत्यांची आणि प्रमुख राज्यांच्या मुख्यमंत्र्यांच्या भेटीगाठी आणि प्रत्येक राज्याची वैशिष्ट्ये सांगणारे स्टॉल, राज्यांची माहिती आणि गुंतवणुकीची पार्श्वभूमी सांगणारे दर्जेदार साहित्य व हजारो एकर परिसरात भरलेले प्रदर्शन हे या कार्यक्रमाचे वैशिष्ट्य ठरले. शुक्रवार दिनांक ९ जानेवारी २०१५ हा दिवस मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या दोन प्रभावी भाषणांसाठी कायम लक्षात राहील.

**मुख्यमंत्र्यांचे प्रभावी संभाषण**

सकाळच्या सत्रात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे आगमन झाले ते मुख्यमंत्र्यांच्या सत्राला

सुरुवात झाल्यानंतर... केंद्रीय गृहमंत्री राजनाथसिंह या सत्राचे अध्यक्ष होते. या कार्यक्रमाला व्यासपीठावर पंजाबचे मुख्यमंत्री प्रकाशसिंग बादल, केरळचे मुख्यमंत्री ओमान चंडी, मध्यप्रदेशचे मुख्यमंत्री शिवराजसिंह चौहान, आंध्र प्रदेशचे मुख्यमंत्री एन. चंद्राबाबू नायडू, गुजरातच्या मुख्यमंत्री आनंदीबेन पटेल, मेघालयाचे मुख्यमंत्री डॉ. मुकुल संगमा, गोव्याचे मुख्यमंत्री लक्ष्मीकांत पार्सेकर, हरियाणाचे मुख्यमंत्री मनोहरलाल खट्टर आणि झारखंडचे मुख्यमंत्री रघुवर दास यांची उपस्थिती होती. गृहमंत्री राजनाथ सिंह यांनी महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा देशाचे सर्वात तरुण व टेक्नोसॅव्ही मुख्यमंत्री असा उल्लेख केल्यानंतर उपस्थितांनी टाळ्यांच्या कडकडाटात त्यांचे स्वागत केले. मुख्यमंत्र्यांच्या मुद्देसूद भाषणाला यावेळी उत्तम प्रतिसाद मिळाला. इंग्रजी आणि हिंदी भाषेतील त्यांचे भाषण कोट्यवधीची गुंतवणूक आकर्षित करण्याइतपत प्रभावी आणि महाराष्ट्र प्रेमाने ओतप्रोत होते.

### दिल खोलके बैठे है

त्यांच्या भाषणापूर्वी ४ राज्यांच्या मुख्यमंत्र्यांनी आपल्या राज्याची आर्थिक बाजू मांडून अनेक योजना पुढे ठेवल्या. त्याचा संदर्भ घेऊन आपल्या भाषणाची सुरुवात करताना मुख्यमंत्री म्हणाले की, कुणी आपल्यासाठी खिडकी उघडली तर कुणी आपल्यासाठी दरवाजा उघडला. कुणी संगणक उघडला. मी ना खिडकी उघडणार, ना दरवाजा उघडणार, ना संगणक उघडणार. आम्ही तर तुमच्यासाठी हृदयच खुले करून बसलो आहोत. ***हमने हमारा दिल खोल दिया है आप के लिए. जब मर्जी है तब आईये. जिस सेक्टर में मर्जी हो उसमे इन्व्हेस्ट किजीए, आपका स्वागत है.*** आपल्या घरात येण्यासाठी निमंत्रणाची आवश्यकता नसते. येणाऱ्या प्रत्येकाचे स्वागत होईल प्रत्येकाला सर्व ती मदतही केली जाईल.

### एफडीआयमध्ये महाराष्ट्र अव्वल

महाराष्ट्रात गुंतवणुकीला आवश्यक असणारी पार्श्वभूमी सांगताना ते म्हणाले की, महाराष्ट्र हे देशातील अग्रेसर राज्य आहे. देशाच्या सकल राष्ट्रीय उत्पादनात (जीडीपी) महाराष्ट्राचा १५ टक्के वाटा आहे. महाराष्ट्राची लोकसंख्या ही देशाच्या लोकसंख्येत १० टक्के आहे, पण ती देशाच्या जीडीपीत १५ टक्के वाटा

## मुख्यमंत्र्यांच्या हाकेला तरुणाईची साद



या वन-टू-वन संवादाच्या कार्यक्रमात मुख्यमंत्र्यांसोबत तरुण गुंतवणूकदारांची अनेक प्रश्नांवर चर्चा झाली. चर्चेदरम्यानच अनेकांनी त्वरित प्रतिसाद देत राज्यात गुंतवणूक व सहभागाची तयारी दाखवली. अमेरिकेतली सेनेरिटा आयझॅक या तरुणीने आरोग्य आणि बालसंगोपन या क्षेत्रात काम करण्याची इच्छा यावेळी व्यक्त केली. मुख्यमंत्र्यांनी त्याच ठिकाणी त्यांना राज्य शासनाच्या उपक्रमात त्वरित सहभागी होण्याची परवानगी दिली.

इंग्लंडचे कॅसेलिन यांनी घनकचरा व्यवस्थापनात आपल्याला काम करण्याची इच्छा असल्याचे सांगताच मुख्यमंत्र्यांनी त्यांना नागपूरच्या मिहान प्रकल्पात काम करण्याचे निमंत्रण दिले. शिवाय दोन दिवसांनी लगेच भेटण्यासही सांगितले. मुख्यमंत्र्यांच्या तात्काळ प्रतिसादाने चर्चेत सकारात्मक वातावरण तयार झाले. शिकागोमध्ये स्थायिक झालेले राकेश मल्होत्रा यांनी राज्यातील शैक्षणिक क्षेत्रात गुंतवणुकीची इच्छा व्यक्त करताच मुख्यमंत्र्यांनी त्यांनाही भेटण्याची वेळ दिली. दुबईचे वाधवाणी यांनी भिवंडी परिसरातील रियल इस्टेटच्या व्यवसायातील समस्या कथन केल्या. त्यावर मुख्यमंत्र्यांनी याबाबत महिन्याभरात तोडगा काढला जाईल, असे आश्वासन दिले.

राज ढवळीकर या तरुणाने राज्यात दर्जेदार शिक्षण व त्याबाबतच्या दर्जाची तपासणी होणे आवश्यक असल्याची अपेक्षा व्यक्त केली. राज्य सरकार या संदर्भात कार्यवाही करत असल्याचे त्यांनी सांगितले. या कार्यक्रमात मुख्यमंत्र्यांच्या आत्मविश्वासाचा प्रभाव जाणवला. महाराष्ट्र हेच गुंतवणुकीसाठी सुयोग्य असल्याचा विश्वास गुंतवणूकदारांमध्ये निर्माण करण्यात मुख्यमंत्री यशस्वी ठरले.




उचलते. महाराष्ट्राने सातत्याने चांगला विकासदर राखला आहे. थेट परकीय गुंतवणुकीत (एफडीआय) महाराष्ट्र क्रमांक एकवर आहे. गेल्यावर्षी एप्रिल ते ऑक्टोबर या कालावधीत २० हजार कोटी अमेरिकन डॉलरची गुंतवणूक महाराष्ट्रात झाली आहे. सातत्याने ही गुंतवणूक वाढतच आहे. यावरून महाराष्ट्रात गुंतवणुकीसाठी सुयोग्य वातावरण असल्याचे स्पष्ट होते.

### विकासदर वाढीचा प्रयत्न

महाराष्ट्राच्या अर्थकारणात ८९ टक्के उत्पन्न हे सेवा आणि औद्योगिक क्षेत्रातून प्राप्त होते. महाराष्ट्रात आमचे सरकार आल्यानंतर मोदीजींचे 'मेक इन इंडिया','डिजिटल इंडिया' चे स्वप्न आहे ते पूर्ण करण्याचा आम्ही प्रयत्न करीत आहोत. २०१५ हे वर्ष डिजिटल वर्ष म्हणून साजरे केले जाणार आहे. देशाला आठ किंवा नऊ टक्के विकासदराने पुढे न्यायचे असेल तर महाराष्ट्राला दहा टक्क्यांपेक्षा अधिक दराने विकास करावा लागेल. त्या दृष्टीने आम्ही प्रयत्न सुरू केला आहे.

### सात नवी शहरे

राज्यात पायाभूत सुविधांमध्ये गुंतवणूक करण्याची संधी मोठ्या प्रमाणावर आहे. राज्यात येत्या काळात सात छोटी शहरे वसवली जाणार आहे. त्यामुळे गृहनिर्माण क्षेत्रात काम करणाऱ्यांसाठी या ठिकाणी मोठ्या संधी उपलब्ध आहेत. कल्याण-डोंबिवली भागात होत असलेल्या तिसऱ्या मुंबईचा दाखला यावेळी त्यांनी दिला. स्मार्ट शहरांमध्ये गृहनिर्माण क्षेत्रातील गुंतवणूकदारांनी मोठ्या प्रमाणात गुंतवणूक करावी, असे आवाहन त्यांनी केले.

### छोट्या शहरांमध्ये गुंतवणूक

महाराष्ट्र हे ५० टक्के नागरीकरण झालेले एकमेव राज्य आहे. अनेक छोटी शहरे झपाट्याने भरभराटीला येत आहेत. त्यामुळे अशा शहरांच्या विकासासाठी आवश्यक असणाऱ्या पायाभूत क्षेत्रात गुंतवणूक करा. नागपूरसारख्या मध्यवर्ती शहरात मोठ्या प्रमाणात सर्व क्षेत्रात गुंतवणुकीची संधी असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले. सर्वांना परवडतील अशा ११ लाख घरांची निर्मिती सरकार करणार आहे. ज्यांना १०० हेक्टरवर नवीन शहर बनवायचे असेल त्यांनाही आमच्याकडे संधी असल्याचे त्यांनी सांगितले.

### मेक इन महाराष्ट्र

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली बदललेला भारत सारे अनुभवत आहेत. बदलाचा हा अनुभव महाराष्ट्रातही येईल. पंतप्रधानांनी 'मेक इन इंडिया'चा नारा दिला आहे. आम्हीदेखील त्याच धर्तीवर 'मेक इन महाराष्ट्रा'साठी आवाहन करत आहोत. विदेशी गुंतवणूकदारांसाठी महाराष्ट्र ही सर्वात चांगली भूमी आहे. त्यासाठी मी आपल्याशी थेट संपर्कात असेल, चांगला प्रस्ताव आणा, सोबत बसून चर्चा करू. लगेच प्रस्तावाला गती देऊ, अशी ग्वाही मुख्यमंत्र्यांनी यावेळी दिली.

**— प्रवीण टाके**

**संपर्क : ९७०२८५८७७७**

## २६ दिवसांत १६०० कोटींची गुंतवणूक

**गुंतवणुकीच्या संदर्भात सुविधा देण्यात महाराष्ट्र गतिमान झाल्याचे उदाहरण मुख्यमंत्र्यांनी दिले. गुंतवणूक करणाऱ्यांसाठी काही परिवर्तन आम्ही केले. काही दिवसांपूर्वी सीएट कंपनी आमच्याकडे आली. शिष्टमंडळ सकाळी भेटले. आम्ही विचारले की, गुंतवणुकीची तुमची तयारी आहे का? ते म्हणाले तयारी आहे. लगेच दोन तासांनी त्यांना बोलावले. त्याच दिवशी भू-संपादनाचे पत्र दिले. २५ दिवसात सर्व परवानग्या दिल्या. २६व्या दिवशी भूमिपूजन केले. १६०० कोटींची गुंतवणूक २६ दिवसात. या सर्व बाबी आम्ही फास्टट्रॅक केल्या आहेत. 'मेक इन इंडिया' किंवा 'मेक इन महाराष्ट्र' यशस्वी करायचे असेल तर हे सर्व करावे लागेल. इमारतीच्या बांधकामाच्या परवान्यासाठी १८० दिवस यापूर्वी लागायचे. हळूहळू त्याला ३० दिवसांवर आम्ही आणतो आहोत. औद्योगिक क्षेत्रात गुंतवणूक करण्यासाठी पूर्वी लागणाऱ्या ७६ परवानग्यांना आता २५ वर आणण्यात आले आहे.**

# मातृतीर्थाचा विकास

**सिंदखेडराजा या नगरीचा विकास करण्यासाठी तसेच सुविधा उभारण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडून २५० कोटी रुपयांचा विकास आराखडा जाहीर**



**राजमाता जिजाऊ यांच्या जयंतीनिमित्त मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी जिजाऊ सृष्टीमधील राजमाता जिजाऊ यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले.**

तारीख १२ जानेवारी दुपारची १.३० ची वेळ. मातृतीर्थ सिंदखेडराजा नगरी गर्दीने फुलून गेलेली. राज्यातून व शेजारील राज्यातून आलेला लाखोंचा जनसमुदाय अशी परिस्थिती. येणार-येणार अशी रंगलेली चर्चा. मध्येच सूर निघाला नाही येणार. दौरा रद्द. काय होत आहे, कुणालाच कळेना.. प्रत्येकाच्या तोंडात का रद्द केला असेल दौरा. पण घुर्रर्र करीत येणारे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे हेलिकॉप्टर दिसले आणि चर्चेचा धुरळा खाली बसला व जनसमुदायात उत्साह संचारला.

मातृतीर्थ बुलडाणा जिल्ह्यात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे मुख्यमंत्री झाल्यानंतर प्रथमच आगमन झाले. निमित्त होते माँ जिजाऊ यांचा ४१७ वा जन्मोत्सव सोहळा. या जन्मोत्सव सोहळ्याला याआधीही मुख्यमंत्री आले आहेत. मात्र, यावेळी गर्दीचे उच्चांक मोडीत नव्या मुख्यमंत्र्यांचे न भूतो असे स्वागत या ऐतिहासिक नगरीने केले.

संपूर्ण जगात मराठी बाणा ज्यांच्या नावाने ओळखला जातो, राजा कसा असावा याचे मूर्तिमंत उदाहरण ज्यांचे दिले जाते, संपूर्ण

## निलेश तायडे


भारत देश ज्यांना दैवत मानतो, राज्य ज्यांना आपला वीरपुरूष व प्रेरणास्थान समजतो असे छत्रपती शिवाजी महाराज. ज्यांनी त्यांच्या पोटी जन्म घेतला त्या माँ जिजाऊ यांचे जन्मस्थान असणारे सिंदखेड राजा. या नगरीचे अलौकिक महत्त्व सांगण्याची गरज नाही.

माँ जिजाऊ यांचा जन्म झालेला राजे लखुजी जाधव यांचा राजवाडा नागपूर-पुणे राज्य मार्गावर आहे. याच राजवाड्यात १२ जानेवारी १५९८ साली राजे लखुजी जाधव आणि म्हाळसाबाई ऊर्फ गिरीजाबाई या उभयताच्या पोटी माँ जिजाऊ यांचा जन्म झाला. या जन्मठिकाणी राजवाड्यात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी माँ जिजाऊ यांच्या प्रतिमेला अभिवादन केले. यावेळी राजवाड्याबाहेर अलोट गर्दी जमली होती. राज्याचा कारभारी अभिवादन करीत असताना उपस्थितांनी त्यांच्यामधील संवेदनशीलता अनुभवली. येथून मुख्यमंत्र्यांचा ताफा निघाला तो जालना रस्त्याने जिजाऊ सृष्टीकडे. या ठिकाणी स्थापित माँ जिजाऊ यांच्या पूर्णाकृती प्रतिमेला मुख्यमंत्र्यांनी अभिवादन केले. येथून मुख्यमंत्री बाहेर पडताच मुख्यमंत्र्यांची भावमुद्रा नजरेच्या कॅमेऱ्यात टिपण्यासाठी लोकांनी स्पर्धा केली.

लगेचच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस भव्य अशा व्यासपीठावर विराजमान झाले. त्यांचा माँ जिजाऊंची प्रतिमा भेट देऊन सत्कार करण्यात आला. जिजाऊ सृष्टीसमोरील भव्य प्रांगणात दाटीवाटीने बसून जनसमुदाय मुख्यमंत्र्याचे भाषण एकत होता. एकेक शब्द जोशपूर्ण व आवेगाने माइकवर धडकत होता. लगेच टाळ्यांचा कडकडाट होत दादही मिळत होती. यावेळी मुख्यमंत्र्यांनी विकास आराखडा राबवण्यासाठी जिल्ह्याचे पालकमंत्री एकनाथराव खडसे यांना प्राधिकृत करीत जिल्हा वार्षिक योजनेतून १ कोटी रुपये प्रारंभिक निधी घेण्याची तत्काळ परवानगी दिली. विकास आराखडा तयार करण्याच्या सूचना दिल्या. या आराखड्यानुसार राजवाडा, मोती तलाव व चांदनी तलाव यांचे सौंदर्यीकरण करून पर्यटनाच्या दृष्टीने या नगरीचा विकास होणार आहे. त्यामुळे निश्चितच सिंदखेडराजा नगरीला विकासाचे कोंदण लाभणार आहे.

# सरस महिला सक्षम महिला

**मुंबई येथील बांद्रा रेक्लमेशन मैदानावर राज्य आणि केंद्राच्या ग्रामविकास विभागाने महालक्ष्मी सरस प्रदर्शनाचे आयोजन केले. या प्रदर्शनात राज्याच्या कान्याकोपऱ्यातून बचत गटाशी निगडित महिलांनी त्यांच्याद्वारे उत्पादित वस्तू विक्रीसाठी ठेवल्या होत्या. देशाच्या आर्थिक राजधानीत या वस्तू विकताना त्यांच्याकडे ठामपणा होता. आपण निर्मित केलेली वस्तू उच्च दर्जाची असल्याचा आत्मविश्वास त्यांच्यात दिसत होता. शिक्षित, अल्पशिक्षित आणि निरक्षर महिला आपल्या वस्तूंच्या दर्जाविषयी भरभरून सांगत होत्या. या महिला बचतगटात सहभागी होऊन आपल्या कुटुंबाचा आर्थिक भार उचलून कुटुंबप्रमुख बनल्या आहेत. महिला सक्षमीकरणाचे जिवंत उदाहरण या प्रदर्शनामध्ये स्वयंस्पष्टपणे दिसत होते.**









प्रवीण कुलकर्णी

आर्थिक परिस्थिती बेताची, गावात बारमाही रोजगार उपलब्ध नाही, व्यवसाय करायचा तर भांडवल नाही, प्रशिक्षण नाही, बाजारपेठेचा अंदाज नाही. अशा पिचलेल्या महिलांना बचतगटांनी उभारी दिली आणि बघता बघता त्यांच्या कार्यकर्तृत्वाचा परीघ विस्तारत गेला. आर्थिक गरजेपोटी बचत गटात सहभागी झालेल्या महिला आता लघुउद्योजिका बनल्या आहेत. महालक्ष्मी सरस प्रदर्शनात सहभागी झालेल्या बचत गटांच्या यशाच्या कहाण्या बचतगटाच्या चळवळीपासून दूर राहिलेल्या महिलांसाठी आदर्शच बनल्या आहेत. पापड, लोणची करण्याच्या पारंपरिक व्यवसायासोबतच या महिला आता लाकडी खेळणी आणि हळदीचे उत्पादन घेऊ लागल्या आहेत. सरकारी योजनांचा लाभ घेत आपल्या व्यवसायाला नव्या उंचीवर घेऊन जात आहेत. महिलांच्या या धडपडीला राज्य सरकारने आपले मजबूत हात दिले असून बचतगटांची ही चळवळ ग्रामीण अर्थव्यवस्थेचा हळूहळू कणा बनत चालली आहे.

देशाच्या आर्थिक राजधानीत आपले उत्पादन विकताना या महिलांकडे ठामपणा होता. आपण निर्मित केलेली वस्तू उच्च दर्जाची आहे आणि तिचा भाव होत नाही हा विश्वास होता. शिक्षित, अल्पशिक्षित आणि अगदी निरक्षर महिलाही आपल्या उत्पादनाविषयी, त्याच्या दर्जाविषयी भरभरून सांगत होत्या. प्रदर्शनाच्या सुरुवातीलाच मालवण तालुक्यातील वराडच्या प्रगती बचत गटाचा स्टॉल लागला होता. बांबूपासून केलेल्या अनेक वस्तू या बचतगटाने तयार केल्या होत्या. त्यात कलात्मकता होती, तसेच व्यावसायिक भानही. लाकडी बुडकल्यापासून ते पेनस्टँड, घड्याळ, ट्रे. अगदी सुबक आणि सुंदर. स्टॉलवरच त्यांनी मिळविलेल्या पुरस्कारांची मानचिन्हेही लावलेली. पाचशे–साडेपाचशे किलोमीटरचा प्रवास करून तिथे लक्ष्मी वराडकर आणि रमाई वराडकर आपल्या उत्पादनांची माहिती सांगत होत्या. अगदी सर्वसामान्य कुटुंबातील, शिक्षण अगदी कमी. मात्र माविममुळे स्वबळावर उभ्या राहिलेल्या. वराड कोकणातील अगदी छोटेसे गाव. शेतीशिवाय दुसरा व्यवसाय नाही. जगण्याच्या या लढाईत मग माविमने साथ दिली. बचतगटाच्या माध्यमातून बांबूच्या वस्तू तयार

करायला सुरुवात केली. बाजारपेठही उपलब्ध करून दिल्याने आर्थिक स्थैर्यही आले. बचतगटातून सामाजिक भान आल्याचेही रमाई वराडकर आवर्जून सांगतात. बचतगटाच्या माध्यमातून लघुउद्योजिका बनलेली अशीच एक स्वयंसिद्धा म्हणजे लक्ष्मी कांबळे. सांगली जिल्ह्यातील नागठाणेमधील. अगदी दोनवेळच्या जेवणाची भ्रांत अशा स्थितीत बचतगटाने साथ दिली. पापड करून हाता–तोंडाची लढाई तरी संपली पण मग मुलांचे शिक्षण आणि इतर गोष्टींसाठी व्यवसाय वाढीची गरज होती. बचतगटाने मग स्टेट बँकेचे कर्ज घेतले आणि मग पुढचा प्रवास सुरू झाला. बचतगटाच्या महिला स्वयंपूर्ण बनल्या असून त्याचबरोबर आता त्या इतर जणांनाही रोजगार पुरवत आहेत याचे समाधान आहे. दिव्याने दिवा पेटावा आणि संपूर्ण परिसर प्रकाशमय व्हावा अशीची ही किमया आहे. गरीब, होतकरू महिला आता एकत्र येत आहेत आणि आपले उत्पादन निर्माण करत आहेत. माविम आम्हाला बाजारपेठ तर मिळवून देतेच त्याचबरोबर बाजारपेठेत आपलाच माल कसा टिकावा याचे प्रशिक्षणही देते. त्यामुळे उत्साह वाढतो. शासनाच्या योजना अनेक आहेत मात्र त्या फलद्रूप करण्यासाठी तुम्हालाही पुढाकार घ्यावा लागेल. कष्ट घ्यावे लागतील. लक्ष्मी कांबळे आवर्जून सांगतात. स्वतःला लघुउद्योजिका संबोधून घ्यायला त्या घाबरत नाहीत आणि तेवढा आत्मविश्वास त्यांच्या चेहऱ्यावर दिसतोही. बचतगटाकडे केवळ रोजगार म्हणून मी बघत नाही तर उद्योजक बनण्याची संधी म्हणून बघते असे ही स्वयंसिद्धा सांगते. त्यामुळे या व्यवसायात आता पुढची पिढीही सहभागी करून घ्यायची आहे. आता आम्ही स्वयंपूर्ण बनत असताना इतर काही महिलांना रोजगारही पुरवतो असेही त्या आवर्जून सांगतात.

### संस्कृतीचीही जोपासना

प्रदर्शनात सगळ्यात जास्त लक्ष वेधून घेतले ते नाशिक जिल्ह्यातील निफाड तालुक्यातील शिंगवेच्या रमाबाई महिला बचतगटाच्या स्टॉलने. एक साठ वर्षांची स्वयंसिद्धा आपल्या उत्पादनाची माहिती देत होती. बचतगटाचे उत्पादन विकण्याच्या निमित्ताने आम्ही देशभर फिरल्याचे सांगताना आपल्याला आपल्या संस्कृतीचाही विसर पडता कामा नये हे त्या आवर्जून सांगतात. नथ, नऊवारी साडी आणि डोक्यावर पदर घेतलेली ही महिला आपल्या संस्कृतीचा अभिमान मिरवत होती. बचतगटाच्या माध्यमातून आम्ही देशभर आमची उत्पादने विकतो त्याबरोबरच मराठी संस्कृतीचाही प्रसार होत असेल तर बिघडले कुठे. अगदी कमी शिक्षण असूनही समाज आणि संस्कृतीबद्दलची त्यांची जाण भल्याभल्या शिक्षितांना तोंडात बोटे घालायला लावणारी आहे.

### सामाजिक भानही वाढले

निफाड तालुक्यातील विंचूरच्या पंचशील महिला बचतगटाच्या अध्यक्ष रत्नप्रभा वाघ बचत गटामुळे सामाजिक भान वाढत असल्याचे आवर्जून सांगतात. आर्थिक उन्नती हा महिला बचतगटाचा मूळ उद्देश असला तरी त्याचबरोबर सामाजिक उन्नती साधली जाते.

❐ ❐



## स्त्री शक्तीची नवी ओळख



महिला बचतगट हे ग्रामीण भागातील महिलांना सक्षम करण्याचे उत्तम माध्यम असून मुंबईत दरवर्षी आयोजित केले जाणारे 'महालक्ष्मी सरस' हे स्त्री शक्तीची ओळख करून देणारे आदर्श असे प्रदर्शन आहे. यंदाच्या प्रदर्शनात ठेवण्यात आलेली महिला बचतगटांची उत्पादने अतिशय दर्जेदार होती. महिला बचतगटाच्या उत्पादनांचा दर्जा चांगला आणि किंमतही वाजवी होती.

'महालक्ष्मी सरस' प्रदर्शनाने महिलांना गरिबीशी लढण्याचे बळ दिले आहे. स्त्री सक्षम झाली तर केवळ तिचे कुटुंबच नाही तर संपूर्ण समाज व पर्यायाने राज्य आणि देश सक्षम होतो. राष्ट्रीय ग्रामीण जीवनोन्नती अभियान हे एक मिशन असून नि:स्वार्थीपणे काम करणाऱ्या अधिकाऱ्यांनी बचतगटांच्या माध्यमातून हे मिशन यशस्वी केले आहे. देशात बचतगटांच्या माध्यमातून सुरू झालेल्या महिला सक्षमीकरणाच्या मोहिमेला राज्यात चांगले यश मिळाले आहे. महिला बचतगटाच्या माध्यमातून ही संधी ग्रामीण भागातील महिलांना मिळाली आहे.

ग्रामीण भागातील महिलांची कला परदेशी पाठविण्यासाठी बँकांनी कर्ज द्यावे, असे आवाहन महिला व बालविकास मंत्री श्रीमती पंकजा मुंडे यांनी केले आहे. तसेच पुढील वर्षी महालक्ष्मी सरस प्रदर्शनामधील स्टॉल्सची संख्या वाढवण्यात येईल, असेही त्यांनी सांगितले.

# दारूबंदी ते व्यसनमुक्ती

**'राज्यमंत्रिमंडळाने एकमताने माझ्या प्रस्तावाला मंजुरी दिली. त्यासाठी मी त्यांचा आभारी आहे. जिल्ह्यातील जनतेला विशेषत: भगिनींना दिलेल्या वचनाचे मी पालन करू शकलो. याचा मला सर्वाधिक आनंद आहे.'**



**दारूबंदीचे शिल्पकार वित्त व नियोजन मंत्री सुधीर मुनगंटीवार**

रवी गिते

राज्य मंत्रिमंडळाने घेतलेल्या चंद्रपूर जिल्हा दारूबंदीचे जिल्हाभरात धूमधडाक्यात स्वागत करण्यात आले. व्यसनमुक्त समाज या राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या विचाराचा विजय असल्याच्या भावना जिल्हावासीयांनी यानिमित्ताने व्यक्त केल्या. चंद्रपूर जिल्हा दारूबंदी आंदोलनाला मोठा इतिहास आहे. विशेष करून हा विजय महिलांचा आहे. महिलांनी एकत्र येऊन दिलेल्या निकराच्या लढ्याचे हे यश आहे. 'तुकडोजी महाराज की प्रेरणा है, दारूबंदी करना है' असा नारा देत जून २०१० मध्ये चंद्रपूर जिल्हा दारूबंदीला सुरुवात झाली. सुरुवातीला लहानसे वाटणारे आंदोलन महिलांच्या सहभागाने व्यापक झाले. दारूच्या व्यसनाने संसार उद्ध्वस्त होत असल्याची जाणीव तीव्र होत गेल्याने दारूबंदी आंदोलनाशी महिला मोठ्या प्रमाणात जोडल्या गेल्या. श्रमिक एल्गारच्या ॲड. पारोमिता गोस्वामी यांच्या नेतृत्वात आंदोलनाने मोठे रूप धारण केले. या आंदोलनाची दखल घेत शासनाने समिती स्थापन करून अभ्यास अहवाल तयार केला. दरम्यान सुधीर मुनगंटीवार आमदार असताना त्यांनीसुद्धा वारंवार विधानसभेत या विषयावर आवाज उठविला होता.

मंत्रिपदाची शपथ घेतल्यानंतर सुधीर मुनगंटीवार यांनी जिल्हा दारूबंदीचे आश्वासन पूर्ण केल्याशिवाय शासकीय बंगल्यात वास्तव्यास जाणार नाही, असा शब्द दिला होता. अर्थमंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी स्वत: पुढाकार घेऊन हा विषय मंत्रिमंडळासमोर सादर करून जिल्ह्यात दारूबंदी जाहिर केली. नवीन सरकारने २० जानेवारी रोजी संपूर्ण चंद्रपूर जिल्हा दारूबंदीचा निर्णय जाहीर करून महिलांना दिलासा मिळवून दिला.

चंद्रपूर, वर्धा आणि गडचिरोली या तीन जिल्हा आणि राज्याच्या सीमेलगत अवैध दारूनिर्मिती आणि हातभट्ट्या सुरू होण्याची शक्यता मंत्रिमंडळाने वर्तवून त्याला परिणामकारक आळा घालण्यासाठी उपाययोजना करण्याचा निर्णय घेतला. दारूबंदीसोबतच जनतेची मानसिकता बदलण्यासाठी सामाजिक न्याय विभागाच्या व्यसनमुक्ती व समुपदेशनतर्फे प्रभावीपणे कार्य करण्यात येणार आहे.

दारूबंदीची प्रभावीपणे अंमलबजावणी करण्यासाठी वर्धा, गडचिरोली आणि चंद्रपूर या तीन दारूबंदी केलेल्या जिल्ह्यांचा मिळून एक स्वतंत्र विभाग तयार करण्यात येणार आहे. त्यासाठी पोलीस आणि उत्पादन शुल्क खात्यामध्ये पुरेसे मनुष्यबळ उपलब्ध करून देण्यात येणार आहे. यावरून शासन दारूबंदीची प्रभावी अंमलबजावणी करण्याचा गांभीर्याने विचार करत असल्याचे सिद्ध होते.

दारूबंदीनंतर उद्‌भवणाऱ्या सामाजिक समस्यांवर समुपदेशनाच्या माध्यमातून जिल्हा प्रशासन उपाय करणार आहे. आरोग्य विभागानेही यापूर्वीच जाणीवजागृती व समुपदेशन सुरू केले आहे. दारूबंदी सोबतच व्यसनमुक्त समाज हा दारूबंदीमागचा शासनाचा उद्देश आहे. शासन निर्णयाची कडक अंमलबजावणी करण्यासाठी जिल्हा प्रशासनाने पूर्ण तयारी केली आहे. १ एप्रिलनंतर चंद्रपूर जिल्हा दारूबंदीकडून व्यसनमुक्तीकडे वाटचाल करणार आहे. ❒ ❒

# वचनपूर्ती



**चंद्रपूर जिल्ह्यात दारूबंदीची घोषणा झाल्यानंतर महिलांनी असा जल्लोष केला.**

राज्याचे वित्त व नियोजन मंत्री व चंद्रपूर जिल्ह्याचे पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी जिल्हावासीयांना दारूबंदीचे वचन दिले होते.

जिल्ह्यामध्ये फिरताना त्यांना अनेक गावांमध्ये महिला भेटत. त्या त्यांना त्यांच्या गावातील विविध समस्या आणि प्रश्नांविषयी सांगत. या महिला गावात झालेल्या विकास कामांबद्दल कौतुकाने त्यांच्यासमोर आपल्या भावना व्यक्त करत. मात्र त्यांच्या बोलण्यामध्ये एक खंत नेहमीच दिसून येई. ती खंत होती दारूच्या व्यसनाची. गावातील कर्त्या पुरुषांना या व्यसनाने चांगलेच जखडले होते. त्यामुळे महिलांमध्ये फार मोठी अस्वस्थता दिसून येत होती. या अस्वस्थेमध्ये आणखी भर पडण्याचे कारण म्हणजे अनेक महिलांची मुलेही आता या व्यसनाच्या अधीन होत होती. नवरा तर कामातून गेलाच होता आता मुलगाही हातून जाण्याची शक्यता निर्माण झाली होती. याचे दु:ख या महिलांना पोखरून काढत होते. त्यांच्या वेदना दूर करण्याचा निर्धार श्री. मुनगंटीवार यांनी केला.

**■ १ एप्रिलनंतर चंद्रपूर जिल्ह्यात अंमलबजावणी ■ वर्धा व गडचिरोलीनंतर महाराष्ट्रात चंद्रपूर तिसरा दारूबंदी जिल्हा**

## अभिनंदनीय निर्णय



जिल्ह्यात दारूबंदी करण्याचा मंत्रिमंडळाने घेतलेला निर्णय अभिनंदनीय आहे. या निर्णयामुळे लोकांचे जीवन बदलणार नाही तर राज्याच्या विकासालाही मोठा हातभार लागणार आहे. वित्त व नियोजन मंत्री सुधीर मुनगंटीवार हे दिलेल्या शब्दाला जागले. व्यसनामुळे चंद्रपूर जिल्ह्याच्या विकासाची गती मंदावली होती. या निर्णयाची प्रभावी अंमलबजावणी करायला हवी.

**– डॉ. अभय बंग**
**ज्येष्ठ समाजसेवक**

## निर्णयाचे स्वागत, शासनाचे आभार



गेल्या अनेक वर्षापासून आम्ही महिलांनी उभारलेला लढा अखेर यशस्वी झाला आहे. शासनाने जिल्हा दारूबंदीचा निर्णय घेऊन महिलांच्या लढ्याला न्याय दिला आहे. त्यासाठी राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि वित्तमंत्री सुधीर मुनगंटीवार यांचे आम्ही आभारी आहोत. ८ फेब्रुवारी ते ८ मार्च दरम्यान गावोगावी जाऊन तरुणांमध्ये जनजागृती करणार आहोत.

**– ॲड. पारोमिता गोस्वामी**
**समाजसेविका, संस्थापक श्रमिक एल्गार**

## निर्णयाची कडक अंमलबजावणी



मंत्रिमंडळाने घेतलेल्या चंद्रपूर जिल्हा दारूबंदी निर्णयाची जिल्हा प्रशासन कडक अंमलबजावणी करेल. शासनाचा निर्णय जनहिताचा असून तरुण पिढीला व्यवसनापासून मुक्त करण्यासाठी उचललेले हे महत्त्वपूर्ण पाऊल आहे. अनेक दिवसापासून दारूबंदीसाठी महिलांनी आंदोलन केले. शासनाचा हा निर्णय अनेक कुटुंबांना सावरणारा ठरणार आहे.

**– डॉ. दीपक म्हैसेकर**
**जिल्हाधिकारी, चंद्रपूर**

## उद्धवजींचे वेगळेपण कौतुकास्पद !



छायाचित्र काढत असताना त्यामधील वेगळेपण टिपणे हीच छायाचित्रकाराची खरी कला असून त्यातून त्याचे नैपुण्य सिद्ध होते. उद्धवजींनी छायाचित्रकलेच्या माध्यमातून दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांप्रती जोपासलेली मदतीची सामाजिक बांधिलकी निश्चितच कौतुकास्पद आहे, असे गौरवोद्‌गार मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काढले.

शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी टिपलेल्या छायाचित्रांचे प्रदर्शन जहांगीर आर्ट गॅलरी येथे आयोजित करण्यात आले होते. या प्रदर्शनास मुख्यमंत्री फडणवीस यांनी भेट दिली. यावेळी ते म्हणाले की, 'छायाचित्र काढताना त्यातील वेगळेपण टिपण्याचे कौशल्य ठाकरे यांच्या छायाचित्र प्रदर्शनाने आपल्याला या ठिकाणी अनुभवण्यास मिळत आहे. या छायाचित्र प्रदर्शनाच्या माध्यमातून त्यांनी शेतकऱ्यांसाठी केलेली मदत हा समाजाच्या उत्तरदायित्वासाठी एक प्रेरणादायी संदेश आहे.'

## आता ऑनलाइन ग्रामपंचायती

राज्यातील जिल्हा परिषदा या 'मिनी मंत्रालय' म्हणून ओळखल्या जातात. या यंत्रणेवरील ताण कमी करण्याच्या दृष्टीने तसेच लोकांना जिल्हा परिषदांच्या योजनांचा लाभ सुलभरीत्या मिळण्यासाठी ग्रामपंचायतींचे संगणकीकरण करून विविध योजना ऑनलाइन करण्यात येणार आहेत.



राज्यातील जिल्हा परिषदांच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांच्या परिषदेत ग्रामविकास मंत्री पंकजा मुंडे यांनी ही माहिती दिली.

ग्रामपंचायती, पंचायत समित्या आणि जिल्हा परिषदांशी संबंधित बहुतांश प्रश्न हे पारदर्शकता आणि गतिमानतेशी संबंधित असून त्यासाठी या सर्व यंत्रणांच्या संगणकीकरणावर तसेच त्यांचा संपूर्ण कारभार ऑनलाइन करण्यावर भर दिला जाईल, असे त्यांनी सांगितले.

ग्रामीण भागाशी संबंधित शिक्षण, आरोग्य, रोजगार, कृषी, जलसंधारण, सार्वजनिक बांधकाम, स्वच्छता, पाणीपुरवठा, अंगणवाड्या, कुपोषण निर्मूलन अशा जनतेच्या जिव्हाळ्याच्या अनेक विषयांची अंमलबजावणी या यंत्रणेमार्फत केली जाते. यासाठी कर्मचारीवर्गही अपुरा असल्यामुळे लोकांची अनेकवेळा अडचण होते. या सर्व समस्यांचे निराकरण करण्यासाठी ग्रामविकास विभागामार्फत व्यापक प्रयत्न केले जातील.

## तारांकित

### महाराष्ट्र पर्यटन महामंडळ सर्वाधिक प्रभावी उपक्रम

महाराष्ट्र पर्यटन महामंडळाला देशातील सार्वजनिक क्षेत्रातील अव्वल उपक्रम म्हणून पुरस्कृत करण्यात आले आहे. पर्यटनाच्या क्षेत्रात देशामध्ये सर्वोत्कृष्ट कार्याबद्दल भारतीय सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रम (आयपीएसई २०१४) या संस्थेतर्फे नवी दिल्ली येथे हा पुरस्कार महाराष्ट्राला देण्यात आला आहे.

२०१३ मध्ये भारतात येणाऱ्या

महाराष्ट्र पर्यटन महामंडळ

पर्यटकांमध्ये सर्वाधिक पर्यटक महाराष्ट्राकडे आकर्षित करण्यात पर्यटन महामंडळाला यश आले आहे. ४१ लाख ५६ हजार ३४३ विदेशी तर ८ कोटी २७ लाख ५५६ देशी पर्यटकांनी महाराष्ट्राला भेट दिली आहे. महाराष्ट्र हे विदेशी पर्यटकांना सर्वाधिक सुरक्षित राज्य वाटते. राज्यातील विविध पर्यटन स्थळे, गड किल्ले, सागर किनारे, मायानगरी मुंबई, विदर्भातील जंगले, अजिंठा-वेरूळची जगप्रसिद्ध लेणी यामुळे पर्यटकांची संख्या वाढली आहे. गेल्या दोन वर्षात पर्यटन महामंडळाने न्यूयार्कच्या 'टाईम्स स्क्वेअर'पासून जगभरात व देशात आपली प्रसिद्धी मोहीम राबवली आहे. 'महाराष्ट्र अनलिमिटेड' पर्यटन मोहिमेतील 'महा है महाराष्ट्र' हा उपक्रम देखील गाजला आहे. या मोहिमेलाही ' आयपीएसईने' पुरस्कृत केले आहे. नवी दिल्लीतील कार्यक्रमात विपणन विभागाचे व्यवस्थापक सुनील कुनगेरी यांनी पर्यटन विभागातर्फे हा पुरस्कार स्वीकारला.

## सायबर गुन्ह्यांच्या प्रतिबंधासाठी स्वतंत्र यंत्रणा

वाढत्या सायबर गुन्ह्यांना प्रतिबंध करण्यासाठी राज्यात स्वतंत्र यंत्रणा उभारण्यात येणार आहे. या अनुषंगाने पोलीस अधिकाऱ्यांना प्रशिक्षण देण्यात येऊन त्यांना अत्याधुनिक साधनसामग्री पुरवण्यात येईल. मुंबईत सीईआरटी (कॉम्प्युटर इमर्जन्सी रिस्पॉन्स टीम)चे केंद्र आणि सायबर गुन्ह्यांसाठी स्वतंत्र न्यायालय सुरू करण्यासाठी शासनाने पावले उचलली आहेत.

मुख्यमंत्री कार्यालयाच्या पुढाकाराने 'सायबर स्ट्रॅटेजी' विषयी नुकतेच सादरीकरण झाले. त्यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सायबर गुन्ह्यांविषयी चिंता व्यक्त केली. मुंबईसारख्या महानगरांमध्ये सायबर गुन्ह्यांच्या संख्येत वाढ होत आहे. शासनाने ही बाब गांभीर्याने घेतली आहे. जे गुन्हे दाखल आहेत, त्यावर तातडीने कारवाई करण्यासाठी माहिती तंत्रज्ञान कायद्याची प्रभावी अंमलबजावणी केली जाईल.

सायबर गुन्ह्यांचा तपास गतीने व्हावा यासाठी पहिल्या टप्प्यात मुंबई पोलीस दलातील १००० अधिकाऱ्यांना प्रशिक्षण देण्यात येईल. सायबर गुन्ह्यांच्या तपासासाठी पोलीस उपायुक्त दर्जाचा स्वतंत्र अधिकारी नेमण्यात येईल. स्वतंत्र सायबर क्राइम विंग देखील तयार करण्यात येतील.




## प्रत्येक पोलिसाला घर

पोलिसांच्या ताब्यात असलेल्या राज्यातील भूखंडावर तत्काळ बांधकाम सुरू करण्यात येणार असून आगामी काळात सुमारे लाखभर घरे बांधण्यात येणार आहेत. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यासाठी आग्रही असून त्यानुसार अंमलबजावणी होईल. प्रत्येक पोलिसाला घर मिळालेच पाहिजे व ते त्यांना हे शासन देणारच, अशी ग्वाही मुख्यमंत्र्यांनी मुंबई पोलिसांतर्फे शहाजी राजे क्रीडा संकुल, अंधेरी येथे आयोजित उमंग संगीत रजनी या कार्यक्रमात दिली.

पोलीस दिवसभर पहारा देतात म्हणून आपण सुरक्षित राहतो. दिवसरात्र काम करणाऱ्या पोलिसांना सुट्टीही घेता येत नाही. या सर्व बाबींचा विचार करता पोलिसांना सुट्टीच्या दिवशीचा पूर्ण पगार दिला जाईल, असे मुख्यमंत्र्यांनी यावेळी सांगितले.

पोलिसांच्या गृहनिर्माणाबाबत पोलीस गृहनिर्माण व कल्याण मंडळामार्फत गृहसचिवांसमोर सादरीकरण करण्यात आले. त्यात सध्या उपलब्ध असलेल्या भूखंडावर कसे घरांचे बांधकाम करण्यात येऊ शकते हेही स्पष्ट करण्यात आले आहे. पोलीस गृहनिर्माण मंडळाचे महासंचालक अरूप पटनाईक पोलिसांना जास्तीत जास्त सुविधा मिळवून देण्यासाठी खास प्रयत्न करत आहेत. पोलीस गृहनिर्माण मंडळाच्या कार्यालयाचाही कायापालट झाला आहे.

## तारांकित ★★★★★

### 'मिठी'ला देणार पुन्हा गतवैभव



पर्यावरण खात्याची सूत्रे हाती घेतल्यानंतर पर्यावरण मंत्री रामदास कदम यांनी मिठी नदीच्या स्वच्छतेकडे गांभीर्याने लक्ष घातले आहे. २००५ साली मिठीला पूर आल्यानंतर मुंबईत हाहाकार उडाला होता. त्यानंतर मिठीच्या स्वच्छतेचे आणि गाळ काढण्याचे काम हाती घेण्यात आले. तसेच मिठी नदीच्या किनाऱ्यावरील अनधिकृत बांधकामे हटवून मिठीला मोकळा श्वास घेता यावा यासाठीही प्रयत्न सुरू झाले. प्रत्यक्षात हे काम किती झाले आहे, मिठी नदीची सद्य:स्थिती काय आहे, याची माहिती घेण्यासाठी पर्यावरण मंत्री रामदास कदम यांनी थेट मिठी नदीवर जाऊन पाहणी केली.

नदीच्या उगमापासून सात ठिकाणी भेट देऊन कामाच्या सद्य:स्थितीची माहिती घेतली. मिठी नदीतील आतापर्यंत ७० टक्के गाळ काढण्याचे काम पूर्ण झाले आहे.

### उपाययोजना

- मिठी नदीतील कॉजवेलगतचा गाळ तातडीने काढण्याचे आदेश.
- गाळ काढण्याबरोबरच नदी प्रदूषण मुक्त करण्याच्या कामास गती.
- नदी प्रदूषित करणारी ठिकाणे शोधण्याच्या अधिकाऱ्यांना सूचना.
- मिठी नदीला मुंबईतील प्रेक्षणीय स्थळ बनविण्याचा मानस

## आदर्श मुख्यमंत्र्यांचा सत्कार




माईर्स एमआयटी स्कूल ऑफ गव्हर्नमेंट आणि भारतीय छात्र संसद फाउंडेशनच्या संयुक्त विद्यमाने आयोजित पाचव्या भारतीय छात्र संसदेमध्ये मध्यप्रदेशचे मुख्यमंत्री शिवराज सिंह चौहान यांना पहिल्या आदर्श मुख्यमंत्री पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस ज्येष्ठ शास्त्रज्ञ डॉ. रघुनाथ माशेलकर, उद्योजक डॉ. अभय फिरोदिया, संगणकतज्ज्ञ डॉ. विजय भटकर, तिबेटचे पंतप्रधान डॉ. लोबसांग सांगे, विश्वशांती केंद्र (आळंदी) आणि माईर्स एमआयटीचे संस्थापक अध्यक्ष प्रा. डॉ. विश्वनाथ दा. कराड, छात्र संसद फाऊंडेशनचे संस्थापक-संकल्पक व मुख्य समन्वयक प्रा. राहुल कराड, आदी मान्यवर उपस्थित होते. श्री. फडणवीस यांनी यावेळी सांगितले की, राज्य सरकारने भ्रष्टाचार हटवण्याची मोहीम हाती घेतली असून, त्याचाच एक भाग म्हणून आठ अधिकाऱ्यांवर कारवाई करीत २०० कोटी रुपयांची मालमत्ता जप्त केली आहे.

राज्यात २० हजार गावे दुष्काळग्रस्त आहेत. त्यातील पाच हजार गावे लवकरच दुष्काळमुक्त केली जाणार आहेत. शेतकऱ्यांना पाणी आणि वीज देण्यासाठी जलयुक्त शिवार ही नवी योजना तयार केली जात आहे.

राज्यात परिवर्तनाला सुरुवात झाली आहे. उद्योगांना प्रोत्साहन दिले जाणार असून, त्यातून रोजगाराच्या अनेक संधी निर्माण होतील. शिक्षण व्यवस्थेतही अनेक आमूलाग्र बदल विचाराधीन आहेत.

## शाळांमध्ये महिला तक्रार निवारण कक्ष

राज्यातील महिलांवरील अत्याचार रोखण्यासाठी सर्व माध्यमांच्या व सर्व व्यवस्थापनांच्या प्राथमिक, उच्च प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांमध्ये महिला तक्रार निवारण कक्ष स्थापन करण्याची शिफारस न्या. चंद्रशेखर धर्माधिकारी (निवृत्त) यांच्या अध्यक्षतेखालील समितीने केली आहे. या समितीच्या अहवालानुसार महिला तक्रार निवारण कक्ष स्थापन करण्याचा निर्णय राज्य शासनाने घेतला आहे. न्यायालय स्तरावर, ग्रामपातळीवर, शाळा, महाविद्यालय स्तरावर व औद्यागिक आस्थापनांमध्ये तसेच शिक्षण संचालक (प्राथमिक), शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक) इत्यादी क्षेत्रांमधील महिलांकरिता तक्रार निवारण समिती कक्ष स्थापन करण्यात येणार आहेत. राज्यातील सर्व माध्यमांच्या व सर्व व्यवस्थापनांच्या शाळांमध्ये महिलांसाठी तक्रार निवारण कक्ष स्थापन करण्याच्या कार्यवाहीचा आढावा घेऊन एकत्रित माहितीसह त्यासंबधीचा अहवाल संबधित विभागास लवकरच सादर करण्यात येणार आहे.

## तारांकित ★★★★★

### मोतीबिंदू शस्त्रक्रिया सप्ताह

राज्यात राष्ट्रीय अंधत्व नियंत्रण कार्यक्रमांतर्गत २३ ते ३० जानेवारी या कालावधीमध्ये मोतीबिंदू शस्त्रक्रिया सप्ताह राबवण्यात आला. या कार्यक्रमांतर्गत १०,४०६ शस्त्रक्रिया करण्यात आल्या. या मोहिमेंतर्गत दहा हजार शस्त्रक्रियांचे उद्दिष्ट सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री डॉ. दीपक सावंत यांनी ठेवले होते. ते उद्दिष्टापेक्षा जास्त पूर्ण झाले आहे. मोफत मोतीबिंदू शस्त्रक्रिया मोहिमेचा सर जे.जे. रुग्णालय येथे आरोग्यमंत्री डॉ. सावंत यांच्याहस्ते शुभारंभ करण्यात आला. कार्यक्रमास जे.जे. रुग्णालयाचे अधिष्ठाता डॉ.



तात्याराव लहाने, आरोग्य संचालक डॉ. सतीश पवार, सहसंचालक डॉ. साधना तायडे आदी उपस्थित होते. राज्यातील ८४ शासकीय रुग्णालयांमध्ये मोतीबिंदू शस्त्रक्रिया झाल्या असून यासाठी १२९ नेत्रशल्य चिकित्सक, ६६० नेत्रचिकित्सा अधिकारी कार्यरत होते. महाराष्ट्र मोतीबिंदू मुक्त व्हावा, असे शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांचे स्वप्न होते. दरम्यान शासनाने निर्धारित केलेल्या उद्दिष्टामध्ये भर घालू, असा निर्धार डॉ. तात्याराव लहाने यांनी व्यक्त केला होता तो पूर्ण करण्यात आला.

## अल्पसंख्याकांना मुख्य प्रवाहात आणणार




राज्यातील अल्पसंख्याकांना समाजाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी शासन सर्वातोपरी प्रयत्न करत असल्याचे प्रतिपादन महसूल, अल्पसंख्याक विकास व वक्फ विभागाचे मंत्री एकनाथ खडसे यांनी केले. मौलाना आझाद अल्पसंख्याक आर्थिक विकास महामंडळामार्फत देण्यात येणाऱ्या कर्ज मंजुरीपत्राचे वितरण नुकतेच त्यांच्याहस्ते नागपूर येथे करण्यात आले.

आतापर्यंत शासनाने नागपूर विभागातील ५६८ लाभार्थ्यांना २ कोटी २७ लाख रुपयांचे कर्ज वितरण केले असून, दि. २३ डिसेंबर रोजी २०४ लाभार्थ्यांना सुमारे १ कोटी रुपयांचे कर्ज वितरण करण्यात आले. श्री. खडसे यांच्या हस्ते हे कर्ज ऑनलाईन प्रणालीद्वारे लाभार्थ्यांच्या थेट बँक खात्यात जमा करण्यात आले. दरम्यान श्री. खडसे म्हणाले की, अल्पसंख्याक समाजातील विद्यार्थ्यांना उच्च शिक्षण घेण्यासाठी शासन प्रोत्साहन देणार असून, अल्पसंख्याक समाजासाठी स्वतंत्र पॉलिटेक्निक महाविद्यालय सुरू केली जाणार आहेत. यामध्ये मुलींसाठी ३० टक्के जागा आरक्षित ठेवल्या जातील. विद्यापीठ स्तरावर अल्पसंख्यांक समाजातील मुलींसाठी स्वतंत्र वसतिगृह सुरू करण्यात येणार आहे.

अल्पसंख्यांक समाजातील विद्यार्थ्यांनी उर्दूबरोबर मराठी व इंग्रजी भाषेतूनही शिक्षण घेत, शासनाच्या वतीने घेण्यात येणाऱ्या विविध स्पर्धा परीक्षा देताना आत्मविश्वासाने सामना केला पाहिजे, असे मत श्री. खडसे यांनी व्यक्त केले. मौलाना आझाद अल्पसंख्याक आर्थिक विकास महामंडळाच्यावतीने अल्पसंख्याक समाजाच्या सामाजिक, आर्थिक व शैक्षणिक प्रगतीसाठी कर्ज उपलब्ध करून दिले जाते. महामंडळाला ५०० कोटी रुपयांचे भागभांडवल मंजूर असून, आतापर्यंत २६८.१९१० कोटी रुपये इतके कर्ज वितरित करण्यात आले आहे.

## धनगर समाजाच्या आरक्षणाचा प्रश्न मार्गी लावणार

धनगर समाजाच्या आरक्षणाचा प्रश्न कुठलाही राजकीय अभिनिवेश न बाळगता महाधिवक्त्यासोबत चर्चा करून सोडविण्यात येईल, अशी ग्वाही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी धनगर आरक्षण अंमलबजावणी अधिवेशनात दिली.

वर्धा रोडवर स्नेहनगर येथील जॉर्गस पार्कवर धनगर आरक्षण अंमलबजावणी अधिवेशन आयोजित करण्यात आले होते. राज्यभरातून आलेल्या धनगर बांधवांना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मार्गदर्शन केले. या अधिवेशनाच्या अध्यक्षस्थानी विधानसभेतील ज्येष्ठ आमदार गणपतराव देशमुख होते.

धनगर आरक्षणाचा निर्णय घेताना त्यात त्रूटी राहू नये यासाठी आपल्याला प्रयत्न करावयाचा आहे. धनगर समाजातील पाच-सहा अभ्यासू नेत्यांनी एकत्र यावे. त्यानंतर राज्याच्या महाधिवक्त्याचा सल्ला घेऊन आरक्षणाचा निर्णय घेण्यात येईल, सोलापूर विद्यापीठाला पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकरांचे नाव देण्याबाबत निश्चित प्रयत्न करेन, असे मुख्यमंत्री फडणवीस यांनी नागपूर येथील आयोजित कार्यक्रमात स्पष्ट केले.

### तारांकित ★★★★★

### जगासाठी दीपस्तंभ

छत्रपती शिवाजी महाराज यांच्या अरबी समुद्रातील स्मारकाला केंद्रीय पर्यावरण मंत्रालयाकडून हिरवा कंदील मिळाला आहे. समाजकारण आणि राजकारण यांचा आदर्श वस्तुपाठ घालून दिलेल्या या लोकोत्तर राजांचे स्मारक होणे हे जगासाठी दीपस्तंभ ठरणार हे निश्चित. राज्यातील तळागाळातील लोकांचा प्राधान्याने विचार कसा करायचा, राज्य चालवताना शेतकरी,



कष्टकरी, मजूर, स्त्रिया यांच्या कल्याणाचा कायम ध्यास ठेवायचा हेच सूत्र शिवरायांनी आपल्या वचनातून आणि कृतीतून व्यक्त केले. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीही पत्रकारांनी विचारलेल्या प्रश्नावर उत्तर देताना नेहमी सांगितले की, हे राज्य छत्रपतींचा आदर्श डोळ्यासमोर ठेवूनच वाटचाल करेल. त्यामुळेच फडणवीस सरकारने ३१ ऑक्टोबरला शपथ घेतल्यानंतर अवघ्या दोन महिन्यात छत्रपती शिवाजी महाराजांच्या अरबी समुद्रातील भव्य स्मारकाबाबत केंद्रीय पर्यावरण मंत्रालयाकडे पाठपुरावा केला. केंद्रीय पर्यावरण राज्यमंत्री प्रकाश जावडेकर यांनी या प्रश्नी जातीने लक्ष घालून शिवस्मारकाचा मार्ग मोकळा केला. १९ फेब्रुवारीला साजरी होत असलेल्या शिवजयंतीनिमित्त लोकराज्यतर्फे शिवरायांना कोटी कोटी प्रणाम.

# आणखी एका मुंबईचा विकास




कल्याण-डोंबिवली महापालिका क्षेत्रालगतच्या २७ गावांच्या आणि भिवंडी परिसरातील ६० गावांच्या प्रारूप विकास आराखड्यास मंजुरी देण्यात आली.

कल्याण येथे झालेल्या आंतरराष्ट्रीय फिल्म फेस्टीवलमध्ये कल्याण-डोंबिवली लगतच्या २७ गावांच्या विकास आराखड्यांचा प्रश्न दोन दिवसात सोडविण्याचे आश्वासन मुख्यमंत्र्यांनी दिले होते. त्यानुसार मंत्रालयात नगरविकास विभाग, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, नगररचना संचालनालयाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांची बैठक मुख्यमंत्र्यांनी बोलावली होती. या विकास आराखड्यांबाबत नगरविकास विभागामार्फत या बैठकीत सादरीकरण करण्यात आले. त्यानंतर झालेल्या सविस्तर चर्चेनंतर मुख्यमंत्र्यांनी हे दोन्ही विकास आराखडे मंजूर केले.

यावेळी मुख्यमंत्री म्हणाले की, पुढील २० वर्षांच्या लोकसंख्येचा आणि विकासाचा दर लक्षात घेऊन विविध प्रकल्पांचे नियोजन करावे. कल्याण-डोंबिवली लगतच्या २७ गावांच्या विकासासाठी याठिकाणी एखादी नगरपरिषद करता येईल काय याबाबतही विचार करण्यात यावा, असे मुख्यमंत्र्यांनी संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांना सांगितले. या भागात परवडणारी घरे योजना लागू करावी या दृष्टीनेही नियोजन करण्याचे मुख्यमंत्र्यांनी सांगितले. भिवंडी परिसर लगतच्या ६० गावांच्या विकास योजनेच्या आराखड्यासही मान्यता देण्यात आली.

# आर.के. लक्ष्मण यांचे स्मारक उभारणार

जगविख्यात व्यंगचित्रकार आर.के. लक्ष्मण यांची स्मृती जपणारे स्मारक राज्य शासनामार्फत उभे केले जाईल, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पुणे येथे लक्ष्मण यांच्या पार्थिवाचे दर्शन घेऊन त्यांना श्रद्धांजली अर्पण केल्यानंतर सांगितले.



लक्ष्मण यांच्या निधनामुळे देशाचे वैभव हरपले असून त्यांच्या जाण्याने समाजाच्या बहुविध क्षेत्रात एक पोकळी निर्माण झाली आहे. त्यांनी निर्माण केलेला कॉमन मॅन जगाच्या अंतापर्यंत कायम राहील. या कॉमन मॅनचे भाष्य राजकीय, शासकीय, सामाजिक व्यवस्थेला कायम अंकुशाप्रमाणे भासत राहील. आर.के. लक्ष्मण यांचे कार्य पुढील पिढीस कळावे यासाठी राज्य शासन त्यांचे यथोचित स्मारक उभे करेल.

## तारांकित

### मुख्यमंत्र्यांचा विद्यार्थ्यांशी संवाद

मुले हीच देशाचे भविष्य आहेत. तेच उद्याचा देश घडवणार आहेत. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस वेळोवेळी मुलांना विविध कार्यक्रमात आवर्जून भेटतात. सामाजिक बांधिलकी जपण्यासाठी त्यांना प्रोत्साहित करतात. टाइम्स ऑफ इंडिया वृत्तपत्र समूहातर्फे आयोजित 'टाइम्स न्यूजमेकर्स मीट' या विद्यार्थ्यांशी प्रश्नोत्तरांच्या कार्यक्रमात त्यांनी सहभाग घेतला. यावेळी बोलताना ते म्हणाले, विद्यार्थ्यांनी शास्त्रीय व तांत्रिक ज्ञानासह विविध विषयांत पारंगत



होऊन त्याचा उपयोग देशहितासाठी करावा, तसेच उपलब्ध माहितीचे रूपांतर ज्ञानात करावे.

देशातील ६५ टक्के लोकसंख्या ही ३५ वर्षांखालील असून विद्यार्थ्यांनी शालेय जीवनात मिळवलेल्या ज्ञानाचा उपयोग देश महासत्ता होण्यामध्ये करावा. हेच या पिढीचे मोठे योगदान असणार आहेत.

याप्रसंगी विद्यार्थ्यांनी शालेय शिक्षणाची गुणवत्ता, शालेय विद्यार्थ्यांची सुरक्षितता, दुरवस्थेतील पुतळ्यांची देखरेख, गावांचे डिजिटलायझेशन, दैनंदिन घडणारे रेल्वे अपघात, पाणीटंचाई इत्यादी विविध विषयांवर प्रश्न विचारून मुख्यमंत्र्यांशी संवाद साधला. यावेळी पत्रकारिता विषयात यश संपादन करणाऱ्या विविध शाळांच्या १० विद्यार्थ्यांना प्रशस्तिपत्र देऊन गौरविण्यात आले.

यावेळी टाइम्सचे राजकीय संपादक प्रफुल्ल मारपकवार, बाची करकारिया, विकेश वालिया, सुगंधा इंदुलकर आदी उपस्थित होते.

## सिंधुदुर्ग जिल्ह्याला पर्यटनाचा ब्रॅण्ड करणार




सिंधुदुर्ग जिल्ह्याला पर्यटनाचा ब्रॅण्ड म्हणून जगभर ओळख देण्यासाठी महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळामार्फत विशेष प्रयत्न करण्यात येणार आहेत. याकरिता या जिल्ह्याला विशेष सवलती देण्यात येतील असे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले.

मालवण तालुक्यातील बोर्डिंग ग्राऊंड येथे जिल्हा नियोजन समिती, यूएनडीपी प्रकल्प सिंधुदुर्ग, महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळातर्फे आयोजित सिंधुदुर्ग पर्यटन महोत्सव २०१५ च्या उद्घाटनप्रसंगी मुख्यमंत्री बोलत होते.

यावेळी सांस्कृतिक कार्यमंत्री विनोद तावडे, पालकमंत्री दीपक केसरकर, आमदार वैभव नाईक, महाराष्ट्र पर्यटन विकास मंडळाच्या महाव्यवस्थापक किशोरी गद्रे, विभागीय आयुक्त राधेशाम मोपलवार, यूएनडीपी प्रकल्पचे मुख्य कार्यकारी अधिकारी एन. वासुदेवन, सिंधुदुर्ग पर्यटन महोत्सव २०१५ चे अध्यक्ष तथा जिल्हाधिकारी ई रविंद्रन आदी उपस्थित होते.

कोकणाला निसर्गाचे वरदान लाभले असून प्रत्येक जिल्ह्याची पर्यटन क्षेत्रात ओळख निर्माण व्हावी यासाठी राज्याच्या निधीमध्ये विशेष तरतूद करण्यात येणार आहे. पर्यटनावर आधारित रोजगार निर्माण करणे तसेच पर्यटनविषयक ज्या योजना कार्यरत आहेत त्याची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी शासन प्रयत्नशील आहे. सिंधुदुर्ग किल्ला हे जिल्हयाचे वैभव आहे, पर्यटकांना आकर्षित करणाऱ्या ठिकाणांचे मार्केटिंग होणे आवश्यक आहे. यासाठी सिंधुदुर्ग जिल्ह्यातील पर्यटन स्थळांची माहिती देणाऱ्या कॉफी टेबल बूकचे प्रकाशन मुख्यमंत्र्यांनी केले. हे पुस्तक देशातील व परदेशातील पर्यटकांपर्यंत पोहोचविण्यासाठी मी स्वत: पुढाकार घेईल, असे मुख्यमंत्र्यांनी यावेळी सांगितले.

## महाराष्ट्र लोकसेवा हमी विधेयकाचे प्रारूप वेबसाइटवर

नागरिकांना शासनाकडून उत्तम आणि गतिमान सेवा मिळावी यासाठी तयार करण्यात आलेल्या महाराष्ट्र लोकसेवा हमी विधेयकाचे प्रारूप www.maharashtra.gov.in या शासनाच्या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले आहे.

विधान मंडळातील चर्चेपूर्वीच्या प्रक्रियेचा एक भाग म्हणून या विधेयकाचा मसुदा सार्वजनिक करण्यात आला आहे. या संदर्भात ज्यांना कुणाला सूचना करावयाच्या असतील त्यांनी २३ फेब्रुवारी २०१५ पर्यंत त्या अपर मुख्य सचिव (प्र.सु.र.व का.) सामान्य प्रशासन विभाग, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक, मंत्रालय. मुंबई ४०००३२ यांच्याकडे पाठवावेत. या अधिनियमास महाराष्ट्र लोकसेवा हमी अधिनियम २०१५ असे म्हणण्यात येणार आहे. त्यामध्ये सेवा हक्क म्हणजे काय याची नेमकी व्याख्या करण्यात आली आहे.

## तारांकित ★★★★★

### ठाण्यात ट्रॅफिक स्मार्ट कार्ड !

ठाणे शहर विस्तृत पसरत चाललेले आहे. प्रवाशांना रिक्षा, टॅक्सी शिवाय दुसरा कुठलाच पर्याय उरत नाही. या शहरात महिलांना नोकरी, शिक्षणासाठी रात्री उशिरा एकट्याने प्रवास करावा लागतो. या महिला बऱ्याचवेळा अत्यंत असुरक्षिततेच्या वातावरणात प्रवास करत असतात. त्यांचा प्रवास सुरक्षित व्हावा या दृष्टीने वाहतूक विभाग ठाणे शहर यांच्यामार्फत ट्रॅफिक स्मार्ट कार्ड योजना सुरू करण्यात येत आहे. हे ट्रॅफिक स्मार्ट कार्ड रिक्षाचालक यांच्या पाठमागील बाजूस लावण्यात येईल. या स्मार्ट कार्डमध्ये त्या रिक्षासंबंधी संपूर्ण माहिती उदा. परमिट नंबर, रजिस्ट्रेशन नंबर, मालकाचे नांव, गाव, गाव पत्ता




इत्यादी माहिती असणार आहे. या कार्डवरील माहिती मोबाइलच्या साहाय्याने फोटो काढून आपल्याकडे ठेवता येणार आहे. या कार्डवर एक बार कोड आहे. Android मोबाइलद्वारे Safe Journey या ॲप्लिकेशनचा वापर करून बार कोडवर क्लिक केले असता या रिक्षासंबंधी संपूर्ण माहिती मोबाइलमध्ये साठवली जाणार आहे. ही माहिती या स्मार्ट कार्ड योजनेंतर्गत मोबाईल फोनद्वारे ५ जवळचे पसंतीचे नंबर असलेल्यांना आपोआपच पाठविण्याची सुविधा उपलब्ध आहे. याद्वारे प्रवासी कोणत्या रिक्षाने प्रवास करत आहेत. याची माहिती संबंधितांना प्राप्त होणार आहे.

# गोदावरी खोऱ्यासारखेच इतर खोऱ्यांचे आराखडे



गोदावरी खोरे एकात्मिक राज्य जलसंपत्ती आराखड्याप्रमाणे राज्यातील इतर खोऱ्यांचेही आराखडे तयार करून प्रलंबित कामांना गती द्यावी, असे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले.

गोदावरी खोरे एकात्मिक राज्य जलसंपत्ती आराखड्याबाबत राज्य जलपरिषदेच्या झालेल्या बैठकीत मुख्यमंत्री बोलत होते. यावेळी जलसंपदा मंत्री गिरीश महाजन, पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री बबनराव लोणीकर, ग्रामविकास आणि जलसंधारण मंत्री पंकजा मुंडे, जलसंपदा राज्यमंत्री विजय शिवतारे, राज्य जल मंडळाचे अध्यक्ष तथा मुख्य सचिव स्वाधिन क्षत्रिय यांच्यासह अनेक वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. घरगुती व औद्योगिक पाणी वापर, जलसंधारण, जलविज्ञान याबाबतची माहिती मुख्य सचिवांनी पाठपुरावा करून तत्काळ प्राप्त करून घ्यावी, असे निर्देश देऊन श्री. फडणवीस म्हणाले की, प्रलंबित राहणाऱ्या कामांसाठी प्राधिकरणाने तज्ज्ञांची मदत घेऊन ती कामे पूर्ण करण्यास प्राधान्य द्यावे. त्याचसोबत अन्य खोऱ्यांचा आराखडा तयार करण्यात यावा. कामे गतीने पूर्ण होण्यासाठी वेळेचे बंधन निर्धारित करून तशी तरतूद नियमात करावी. पाणी वाटपाबाबतची निर्णय प्रक्रिया उचित असेल तर उच्च न्यायालयाकडे दाद मागावी लागणार नाही. नदीखोरेनिहाय प्रकल्प अधिकारी नेमल्यास हा प्रश्न उद्‌भवणार नाही, असेही श्री. फडणवीस यांनी सांगितले.

# वाहतुकीची शिस्त

सर्वोच्च न्यायालयाने दुचाकी वाहनधारकांना हेल्मेट वापरणे सक्तीचे केले आहे. परंतु या नियमांचे पालन होताना दिसत नाही. जे दुचाकीस्वार हेल्मेट न घालता वाहन चालवतात त्यांच्यावर नियमानुसार कारवाई होते. पण भविष्यात यापुढे नवीन दुचाकी वाहनधारकांना वाहतूक परवाना देताना त्यांच्याकडून वाहतूक नियमांचे पालन करीन अशी बांधिलकी स्वीकारणारे शपथपत्र (indemnity bond) लिहून घेण्यात येणार असल्याचे परिवहन मंत्री दिवाकर रावते यांनी सांगितले. रस्ता सुरक्षा पंधरवड्यानिमित्त बोलताना त्यांनी ही माहिती दिली.



रस्त्यावरील झेब्रा क्रॉसिंगचे चिन्ह अधिक ठळक आणि गडद स्वरूपात रंगवण्याच्या सूचनाही त्यांनी महापालिका आयुक्तांना दिल्या. श्री. रावते म्हणाले, 'ही मोहीम म्हणजे वाहनधारकांना आणि पायी चालणाऱ्या नागरिकांना वाहतूक नियमांची जाणीव करून देण्यासाठी हाती घेतलेली मोहीम आहे. रस्त्यावरील सुरक्षा हा केवळ पंधरवाड्याचा विषय असूच शकत नाही, तो जीवनभर काळजी घेण्याचा विषय आहे.

रस्ता सुरक्षा अभियानात सर्व संबंधित विभागांचे सहकार्य घेण्यात आले असून शालेय विद्यार्थ्यांपासून वयस्क व्यक्तींमध्ये वाहतूक नियमांची शिस्त निर्माण करणे हा त्यामागचा उद्देश आहे.

## तारांकित ★★★★★

### जनतेच्या साहाय्याला 'कोशिश' मोबाइल ॲप

सर्वसामान्य जनतेला उपयोगाचे असलेले 'कोशिश' या मोबाइल ॲप्लीकेशनचे उद्‌घाटन नागपूर येथे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याहस्ते झाले. 'नवनव्या तंत्रज्ञानाचा वापर करून नागरिकांना सेवा दिली तर भविष्यातील धोके टाळता येतात. नागपूर ग्रामीण पोलीस दलाने सुरू केलेले मोबाइल ॲप्लिकेशन (कोशिश) जनतेच्या निश्चितच उपयोगात येईल, असा विश्वास




मुख्यमंत्र्यांनी व्यक्त केला. नागपूर ग्रामीण पोलीस कार्यालयातर्फे हे ॲप्लीकेशन विकसीत करण्यात आले आहे. पोलीस अधीक्षक आरती सिंग यांनी यासाठी पुढाकार घेतला.

अपघात घडल्यानंतर पोलीस, वैद्यकीय सेवा, नातेवाईक यांना एकाच वेळी माहिती या नव्या सेवेमुळे मिळणार आहे. याशिवाय वाहनचालकाची विस्तृत माहिती कळणार आहे. नवी मुंबई येथे देखील अशाच प्रकारची सेवा उपलब्ध करून देण्यात आली आहे. या सेवेचा उपयोग अन्यत्रसुद्धा करावा तसेच लोकांना एकाच ठिकाणी सर्व सुविधा उपलब्ध होण्याच्या दृष्टीने एक खिडकी हा उपक्रम पोलीस विभागाने सुरू करावा, अशा सूचनाही मुख्यमंत्र्यांनी केल्या.

# महाराष्ट्राचा अभिमान




## चित्ररथाला पहिला क्रमांक

**६६ व्या प्रजासत्ताकदिन सोहळ्यात 'पंढरीची वारी' दर्शविणारा चित्ररथ लक्षवेधी ठरला. राजपथावर 'माऊली-माऊली' या गीतावर सर्वांनी ठेका धरला होता.**

प्रजासत्ताक दिनी राजपथावरील पथसंचलनात महाराष्ट्राच्या 'पंढरीची वारी' चित्ररथाला यावर्षीचा सर्वोत्तम चित्ररथाचा बहुमान मिळाला. या पुरस्कारासह महाराष्ट्राला सहाव्यांदा प्रथम क्रमांकाचा मान मिळाला आहे. नागपूरच्या दक्षिण-मध्य क्षेत्र सांस्कृतिक केंद्राने सादर केलेल्या लेझीम नृत्याला प्रोत्साहनपर पारितोषिक मिळाले आहे.

महाराष्ट्राच्या सांस्कृतिक कार्य संचालनालयातर्फे राज्याचे वैशिष्ट्ये दाखविणारे दर्जेदार चित्ररथ प्रदर्शित करण्याची दीर्घ परंपरा आहे. लोकमान्य टिळकांनी सुरू केलेल्या सार्वजनिक गणेशोत्सवाचे शताब्दी वर्ष, हापूस आंबा, बापू स्मृती या चित्ररथांना १९९३ ते १९९५ असे सलग तीन वर्ष प्रथम क्रमांकाचे पारितोषिक मिळाले होते. आता २० वर्षानंतर महाराष्ट्राला हा बहुमान परत मिळाला आहे.

राज्याच्या वतीने सर्वप्रथम १९७१ मध्ये वारली दिंडीच्या संकल्पनेवर आधारित चित्ररथ राजपथावर प्रदर्शित झाला. शिवाजी महाराजांचा राज्याभिषेक या संकल्पनेवरील १९८० मध्ये महाराष्ट्राच्या चित्ररथाने प्रथम पारितोषिक पटकाविले होते. १९८३ मध्ये राज्यातर्फे प्रदर्शित बैल पोळा विषयावरील चित्ररथालासुद्धा प्रथम पारितोषिक मिळाले होते.


प्रजासत्ताक दिनी संचलनात सहभागी होऊन प्रथम क्रमांकाचा पुरस्कार जिंकणाऱ्या महाराष्ट्राच्या चित्ररथ पथकाचे आणि राजपथावर संचलनात सहभागी झालेल्या चित्ररथासोबतच्या कलावंतांचे आणि चित्ररथाची संकल्पना साकारणाऱ्या कारागीरांचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि सांस्कृतिक कार्यमंत्री विनोद तावडे यांनी अभिनंदन केले.

चित्ररथाच्या माध्यमातून देशवासीयांना महाराष्ट्राचे लोकदैवत आणि लोकसंस्कृतीचे प्रभावी दर्शन घडविल्याबद्दल मुख्यमंत्र्यांनी आनंद व्यक्त केला.

# नको भीती क्षयरोगाची

**भारतात क्षयरोग होण्याचे प्रमाण चिंताकारक आहे. क्षयाची बाधा झाल्यानंतर उपचार न करून घेणे किंवा उपचार मध्येच सोडणे यामुळे हा रोग बरा होत नाही आणि रुग्ण दगावतो. त्यामुळे तातडीने उपचार आणि उपचारात सातत्य ठेवल्यास क्षयरोग पूर्ण बरा होतो, सांगताहेत जे.जे. रुग्णालयातील ज्येष्ठ क्षयरोग तज्ज्ञ डॉ. नागसेन रामराजे.**







क्षयरोग हा संसर्गजन्य रोग आहे. हा रोग मायकोबॅक्टेरियम ट्युबरक्युलोसीस नावाच्या जंतुमुळे होतो. क्षयरोगाचे रुग्ण जगभरात आढळतात. क्षयरोग स्त्री-पुरुष किंवा लहान-मोठा तसेच गरीब किंवा श्रीमंत भेदभाव मानीत नाही. या रोगाचे प्रमाण तरुण व मध्यम वयात जास्त असते. गलिच्छ राहणी व रोगराईमुळे शरीराला कमजोरपणा आला असेल तर रोग लवकर होऊ शकतो. क्षयरोगाचे मायकोबॅक्टेरियम ट्युबरक्युलोसिस हे जंतू मुख्यत: हवेतून पसरतात. फुप्फुसांचा क्षयरोग असलेला रुग्ण जेव्हा खोकतो किंवा शिंकतो तेव्हा क्षयरोगाचे जंतू हवेत पसरतात व ज्यावेळी जवळचा निरोगी मनुष्य श्वास घेतो तेव्हा हे जंतू त्याच्या शरीरात प्रवेश करतात. त्या निरोगी मनुष्याला क्षयरोग होऊ शकतो. क्षयरोग हा शरीराच्या कोणत्याही भागाला होऊ शकतो.

जर ओटीपोटीच्या अवयवात क्षयरोगाची वाढ झाली नसेल तर त्या बाईने गर्भवती राहण्यास हरकत नाही. परंतु अगोदरच क्षयरोगी महिलेच्या शरीराची रोगप्रतिबंधक शक्ती कमी झालेली असल्यामुळे तिला जर क्षयरोग असेल तर तो बरा होईपर्यंत तिने गर्भवती राहू नये.

फुप्फुसाव्यतिरिक्त इतर अवयवांचा क्षयरोग झाला असल्यास खालील लक्षणाखेरीज ज्या अवयवाचा क्षयरोग झाला असेल त्याप्रमाणे लक्षणे दिसून येतात.

- गंडमाळा (Lymphadenopathy) मानेवर सूज व गाठी येतात. कधी कधी त्यामध्ये पू बाहेर येतो.
- मेंदूच्या आवरणाचा क्षयरोग



## क्षयरोगाची लक्षणे

- दोन आठवडे किंवा जास्त दिवस असणारा बेडकायुक्त खोकला
- हलकासा परंतु संध्याकाळी वाढणारा ताप
- वजन कमी होणे
- भूक मंदावणे
- छातीत दुखणे
- रात्री खूप घाम येणे
- बेडक्यातून रक्त पडणे

# निरामय

(मेनिनजायटीस) लक्षण : डोकेदुखी, ताप, ग्लानी, मानेचा ताठपणा इत्यादी.

- मणक्याचा क्षयरोग : पाठ दुखणे, पाठीच्या मणक्यावर सूज येणे, ताप येणे इत्यादी.

वरील सर्व लक्षण आढळल्यास अशा व्यक्तीने जवळच्या शासकीय/निमशासकीय किंवा खासगी रुग्णालयात जाऊन डॉक्टरांच्या सल्ल्यानुसार सांगितलेल्या चाचण्या करून आजाराचे निदान करून घेणे गरजेचे आहे. निदान झाल्यास लगेचच डॉक्टरांच्या सल्ल्यानुसार औषधोपचार घ्यायला हवेत.

### क्षयरोगाचे निदान

फुफ्फुसाच्या क्षयरोग्याच्या थुंकीची तपासणी करतात आणि छातीचा एक्सरे काढून क्षयरोगाचे निदान केले जाते. त्याचप्रमाणे नवीन विविध उपलब्ध चाचण्यांद्वारे डॉक्टरांच्या सल्ल्यानुसार शरीराच्या कोणत्या भागाचा क्षय आहे हे पाहून निदान केले जाऊ शकते. डॉक्टरांच्या सल्ल्याप्रमाणे नियमितपणे औषधे घेतली तर क्षयरोग पूर्णपणे बरा होतो. क्षयरोगावरील औषधोपचार ग्रामीण तसेच शहरात सरकारी व निमसरकारी क्षयरोग केंद्रात मोफत मिळतात व तो सर्व डॉट्स सेंटरवर उपलब्ध आहे.

### डॉटस

भारतामध्ये राष्ट्रीय क्षयरोग नियंत्रण कार्यक्रमांतर्गत प्रत्येक क्षेत्रात निदान केंद्र व उपचार केंद्र प्रस्थापित केले आहे. या रुग्णांची तपासणी व औषधे या कार्यक्रमांतर्गत मोफत दिली जातात. उपचार पद्धतीस डॉट्स प्रणाली म्हटले जाते. ज्यामध्ये क्षयरोगाच्या रुग्णास डॉट्स प्रोव्हायडरच्या देखरेखीखाली औषधे दिली जातात.

क्षयरोग औषधोपचाराचे दोन टप्पे असतात.

- **इन्टेन्सिव्ह फेज :** अतिदक्षतेचा कालावधी औषधोपचार २ ते ४ महिने
- **कन्टीन्युअेशन फेज :** नियमित कालावधी औषधोपचार ४ ते ५ महिने

औषधोपचार नियमित अखंडित स्वरूपात डॉक्टरांच्या सल्ल्याने चालू ठेवावा व डॉक्टरांनी सांगितल्याशिवाय औषधे बंद करू नयेत. वेळोवेळी ठरलेल्या तारखेनुसार दवाखान्यात जाऊन तपासणी करून घ्यावी.



### क्षयरोगाचे प्रकार

- फुफ्फुसाचा क्षयरोग (Pulmonary Tuberculosis)
- फुफ्फुसाव्यतिरिक्त (Extra Pulmonary Tuberculosis) इतर अवयव, ग्रंथींचा, हाडांचा व सांध्यांचा, जनन व विसर्जन संस्था, मज्जासंस्थेचा व आतड्याचा क्षयरोग

### डॉटसचे फायदे

- दुपटीने अचूक निदान ९५ टक्के यशस्वी
- यामुळे थुंकीबाधित क्षयरोगाचे त्वरित निदान करून औषधोपचार करता येतो व या रोगाचा प्रसार थांबवता येतो. यामुळे क्षयरोगाचे प्रमाण कमी करता येते.
- आजाराचा काळ कमी करून नवीन क्षयरोग रुग्ण कमी करता येतात. त्यामुळे अनेकांचे प्राण वाचविता येतात.
- समाजाला क्षयरोगाचा लागलेला डाग कमी करून उत्तम प्रकारची सुविधा देता येते. ट्रिटमेंट फेल्युअर व एम.डी.आर. क्षयरोगी कमी करता येतात.
- देशाला क्षयरोगमुक्त करण्यासाठी लागणाऱ्या प्रयत्नांना व आरोग्य पद्धतीला चालना मिळते.

क्षयरोगावरील औषध उपचारांनी रोग्यास लवकर आराम पडतो. परंतु तो केवळ तात्पुरता आराम असतो. रोग बरा झालेला नसतो. परंतु बरेच रोगी मध्ये औषधोपचार सोडून देतात. थोडाकाळ गेल्यानंतर परत रोगाची लक्षणे दिसण्यास सुरुवात होते आणि आजार फार वाढतो. याचा परिणाम असा होतो की रोग्याला आधीच्या स्वस्त औषधांचा उपयोग होत नाही. त्यामुळे त्याला बाजारातील महागडी औषधे घ्यावी लागतात. शास्त्रीय दृष्टीने असे सिद्ध केले आहे की, क्षयरोगी व्यक्तीला रुग्णालयामध्ये राहण्याप्रमाणेच घरीही राहून यशस्वीपणे औषधोपचार केला जाऊ शकतो. परंतु हवेशीर असणारी खोली हवी. तसेच सर्वसाधारण स्वच्छतेची आवश्यकता असते. फक्त गुंतागुंतीच्या रुग्णाला रुग्णालयात राहणे आवश्यक असते. नियमितपणे औषधोपचार घेतल्यानंतर कुटुंबातील इतरांना रोगसंसर्ग होण्याची शक्यता कमी असते. परंतु रोगी व्यक्तीने निष्काळजीपणे इकडेतिकडे थुंकता कामा नये. तसेच खोकतांना आपले तोंड रुमालाने झाकले पाहिजे. मुलांना क्षयरोग प्रतिबंधक बी.सी.जी. लस टोचून क्षयरोगाच्या प्रसाराला आळा घालता येईल. क्षयरोगाचे उपचार हे मोफत आहेत ते सर्व शासकीय/निमशासकीय आरोग्य केंद्रात मिळतात.

❐ ❐



### अशी घ्या काळजी

- सार्वजनिक ठिकाणी थुंकू नका,
- खोकताना, शिंकताना तोंडापुढे रुमाल धरा,
- थुंकदानासाठी वापरण्यात येणाऱ्या डब्यामध्ये माती टाका. त्यावर झाकण ठेवा.
- थुंकीची योग्य तऱ्हेने विल्हेवाट लावा.
- समतोल आहार,
- योग्य व्यायाम,
- पुरेशी विश्रांती
- जर तुम्हाला क्षयरोग झाल्याचे निदान झाले तर डॉक्टरांच्या सल्ल्यानुसार नियमित औषधोपचार सुरू करा.
- क्षयरोगग्रस्त रुग्णाने डॉक्टरांच्या सल्ल्यानुसार नियमित पाठपुरावा करावा जेणेकरून रुग्ण उपचारांना साथ देतो आहे किंवा नाही हे समजू शकते.
- क्षयरोग उपचारादरम्यान औषधाचे दुष्परिणाम होतात त्यामुळे रुग्ण बहुतेककरून औषधोपचार थांबवतो. हे चुकीचे आहे. अशाने रुग्ण इतरांना संसर्ग देतो किंवा त्यांचा आजार जास्त बळावतो किंवा रुग्ण दगावतो. म्हणून रुग्णाने पूर्ण काळजी घ्यावी.



# आपलो मालवण

**सिंधुदुर्गावर निसर्गाने मुक्तहस्ताने उधळण केली आहे. या जिल्ह्याला स्वच्छ आणि सुरक्षित समुद्रकिनारा लाभला आहे. शिवकालीन इतिहासाचा महत्त्वपूर्ण साक्षीदार असलेला सिंधुदुर्ग किल्ला आपणास वेगळाच अनुभव देऊन जातो. आंब्याच्या मोहरलेल्या बागा आणि हिरवाईने नटलेले डोंगर आपले मन प्रसन्न करून टाकते. त्यातही मालवण म्हणजे निसर्गाने पृथ्वीवर रेखाटलेले अद्‌भुत असे चित्रच होय. मालवणातील नारळी-पोफळीची झाडे, सिंधुदुर्ग आणि पद्मगड हे जलदुर्ग यांनी आपले मन मोहून जाते. सिंधुदुर्ग किल्ल्याच्या जवळ स्कुबा डायव्हिंगच्या मदतीने पाण्याखालील जलसृष्टीचा अतिशय वेगळा आणि नयनरम्य अनुभव येता येतो.**

समोर नजर संपेपर्यंत अथांग निळाशार समुद्र. लाटांच्या लहरी. पायाखाली रुपेरी वाळू आणि एखाद्या निष्णात संगीतकाराने आपल्या वाद्याला छेडल्यावर घुमणाऱ्या आवाजासारखी सागराची गाज. मालवणचा समुद्र, समुद्रकिनारा आणि भोवतीचा परिसर एका अनोख्या विश्वात घेऊन जातात आणि आपल्या मागच्या तारा काही काळासाठी तरी अलगद सूटून जातात.

महाराष्ट्राला पश्चिम घाटाचे जसे वरदान लाभले आहे तसेच विस्तृत अशा समुद्रकिनाऱ्याचेही वरदान लाभले आहे. त्यातही सिंधुदुर्गावर निसर्गाने मुक्तहस्ताने उधळण केली आहे. स्वच्छ आणि सुरक्षित समुद्रकिनारा, शिवकालीन इतिहासाचा साक्षीदार सिंधुदुर्ग किल्ला. आंब्याच्या बागा आणि हिरवाईने नटलेले डोंगर. मुळात मालवणला पोहोचण्यापूर्वी तुम्ही तिथपर्यंत जाण्याच्या प्रवासाचा आनंदच खूप घेता. एका बाजूला डोंगर आणि दुसऱ्या बाजूला खोल दरी अशा घाटातून गाडी जेव्हा वळण घेते त्यावेळी निसर्गाची ही सौंदर्य लयलूट डोळ्यांत साठवून कशी ठेवावी हाच प्रश्न पडतो. हा अनुभव कॅमेराबद्ध करण्यापेक्षा डोळ्यात साठवून ठेवावा.

सध्या कोकणात आंब्यांना मोहोर आला आहे. त्याचा आंबटगोड वास श्वासात भरून घ्यावा असाच आहे. आपल्या मनाच्या कोपऱ्यात असलेल्या कोकणातील गावाची, समुद्रकिनाऱ्याची प्रचिती येथील कोणत्याही किनाऱ्यावर येते. उंचचउंच माडाची झाडे, तांबडे रस्ते, सुटी घरे आणि समुद्रकिनाऱ्यावर कोळी बांधवांची चाललेली लगबग. एकूणच वातावरण समृद्धी आणि शांती यांचा मिलाफ करणारे.

सिंधुदुर्गातील अनेक ठिकाणे प्रेक्षणीय आहेत. पण यामध्ये सर्वात सुंदर शहर म्हणजे मालवण. नारळी-पोफळीच्या गच्च झाडीची चादरच या गावाने ओढली आहे असे वाटते. सिंधुदुर्ग आणि पदमगड हे जलदुर्ग मालवणच्या वैभवशाली इतिहासाचे साक्षीदार आहेत.

या जलदुर्गाला जोडणारा भुयारी मार्ग असल्याचे येथे सांगितले जाते. समुद्रमार्गे बोटीद्वारे तुम्ही सिंधुदुर्ग किल्ल्यावर जाऊ शकता. छत्रपती शिवाजी महाराजांच्या दूरदृष्टीची प्रचिती येथे येते.

मालवण येथील समुद्रकिनारा खूपच स्वच्छ आहे. त्याहीपेक्षा येथील समुद्र अगदी नितळ आहे. स्वच्छ सूर्यप्रकाशात तब्बल २० फुटापर्यंत समुद्राचा तळ दिसेल असा नितळ समुद्र दुसरीकडे कुठे पाहायला मिळणे दुरपास्तच. निसर्गदेवतेने खूप वेळ घेऊन पृथ्वीच्या एका कोपऱ्यात हातात ब्रश आणि रंग घेऊन सुंदर चित्र रेखाटले आहे असेच इथे आल्यावर वाटत राहते. संध्याकाळी समुद्रकिनाऱ्यावर तर सूर्यकिरणांची रंगपंचमीच सुरू आहे असे वाटते. अस्ताला जाणारा सूर्य केशरी रंगाची उधळण करत असतो. तथापि ते सारे रंग पिऊन निळाशार समुद्रही केशरीच बनून जातोय असेच वाटत राहते आणि मग त्या रंगातच तो हलकेच अंगावर रात्रीची काळी शाल ओढून घेतो.

**— प्रवीण कुलकर्णी**

भ्रमंती



# करा स्कुबा डायव्हिंग

समुद्रतळाशी असलेली जीवसृष्टी अनुभवायची असेल तर मालवणमध्ये स्कुबा डायव्हिंगची सुविधा उपलब्ध आहे. आतापर्यंत आपण फक्त डिस्कव्हरी, नॅशनल जिऑग्राफी किंवा जिंदगी मिले ना दोबारा सारख्या चित्रपटातून स्कुबा डायव्हिंग बघतो आहे. हा थरार आपण कोणीही घेऊ शकतो. खोल समुद्रातच त्यासाठी गेले पाहिजे असेही नाही. आपल्या जमिनीपेक्षा एक विलक्षण आणि अद्‌भुत जग पाण्याखाली असते. तिचा अनुभव एकदा तरी घेतलाच पाहिजे. सिंधुदुर्ग किल्ल्याच्या शेजारी तुम्हाला स्कुबा डायव्हिंग करता येईल. समुद्रजीव समुद्रात बघण्यासारखा दुसरा अनुभव नाही. येथे तुम्हाला घेऊन जाणारे गाइड असतात. त्यामुळे तुम्हाला पोहता येते किंवा नाही याला महत्त्व नाही. पाण्यात श्वास कसा घ्यायचा याचे प्रशिक्षणही ते अगोदर देतात. न जाणो स्कुबा डायव्हिंग करताना तुम्हाला एखादा मोती असलेला शिंपला मिळाला तर, ऑक्टोबर ते मार्चपर्यंत येथील समुद्र खूपच स्वच्छ असतो. त्यामुळे सध्याचा काळ हा यासाठी उत्तम काळ आहे.

## असे जाता येईल

- कोकण रेल्वेने कुडाळ किंवा कणकवली रेल्वे स्टेशनवर उतरून तिथून बसने मालवणला पोहोचता येते.
- मुंबईहून मालवण ५७६ किमी , खाजगी बसेस आणि एसटी ची सोय उपलब्ध
- गोव्यातील दम्बोलीनी  जवळचे विमानतळ. तिथून मालवणपर्यंत बसची सोय

## येथे राहता येईल

- महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळातर्फे तारकर्ली येथे खोल्या उपलब्ध आहेत. त्यांचे बुकिंग मुंबई, रत्नागिरी, गोवा, पुणे, गणपतीपुळे, कोल्हापूर येथील आरक्षण कक्षातून करता येते. ऑनलाइन बुकिंगही होते.
- मालवण येथे नाथ पै सेवांगण अतिथीगृह
- मालवणमध्ये खासगी रिसॉर्टची संख्या खूप आहे.

## भेटीचा उत्तम काळ

- ऑक्टोबर ते मार्च या काळात समुद्र खूप नितळ असतो.
- स्कुबा डायव्हिंग करता येते.
- पावसाळ्यात सिंधुदुर्ग किल्ल्यावर जाता येत नाही. ऑक्टोबर ते मार्च दरम्यान वातावरण प्रसन्न असते.
- आंब्यांना मोहर आल्यानंतरचा जानेवारी, फेब्रुवारी हा काळ भेटीसाठी सर्वोत्तम.

# आपणच आपले मार्गदर्शक

**आपले काम प्रामाणिपणे करणे हीच एक मोठी समाजसेवा. चांगले करीअर आणि समाजाच्या ऋणातून काहीसे मुक्त होण्याची संधी म्हणजे यूपीएससी परीक्षा. ही संधी साधण्याचे स्वप्न अगदी लहानपणापासून पाहिलेल्या पुण्याच्या मृण्मयी जोशी यांनी ९८ व्या रँकिंगसह दुसऱ्याच प्रयत्नात आयएएस होण्याचे ध्येय साध्य केले. त्यांच्याशी बोलताना समाजाविषयीची त्यांची तळमळ वेळोवेळी व्यक्त होते. त्या सध्या केरळमध्ये प्रशिक्षणार्थी सहायक जिल्हाधिकारी म्हणून कार्यरत आहेत. त्यांच्या यशाचा फार्म्युला त्यांच्याच शब्दात...**



**मृण्मयी जोशी**

रँक-९८, भा.प्र.से, केरळ

आपण समाजाचे खूप देणे लागतो ही जाणीव अनेकांच्या मनात जागृत असते. त्याप्रमाणे ते प्रयत्नही करत असतात. काहींना खासगी क्षेत्रात गलेलठ्ठ पगाराची नोकरी असते, पण त्यांना इच्छा असूनही समाजासाठी विशेष असे काही करता येत नाही. पण प्रयत्न करणेही काही कमी नव्हे. माझ्या मनातही ही जाणीव प्रबळ होती. त्यामुळे शालेय जीवनापासूनच आपण जनतेला त्यांचा हक्क, न्याय मिळवून देण्यासाठी काहीतरी करावे ही तळमळ होती. या तळमळीची ज्योत माझ्या मनात कायम तेवत राहिल्याने तीच माझ्यासाठी प्रेरणादायी ठरली.

### ध्येयनिश्चिती

वडील शशांक जोशी खासगी क्षेत्रात, आई न्यायाधीश. आम्ही मूळ पुण्याचेच. कुणावर अन्याय होता कामा नये याचे बाळकडू आईकडूनच मिळाले. आपल्या मुलीने सामान्य जनतेच्या जीवनात बदल घडवावे, त्यांना त्यांचे मूलभूत हक्क मिळवून देण्यासाठी झटावे अशी आईची प्रामाणिक इच्छा. त्यामुळे तिने मी नागरी सेवेत यावे अशाच प्रकारे माझ्या मनावर संस्कार केले. आयएएस होण्याचे स्वप्न तिनेच मला प्रथम दाखवले. त्यामुळे शालेय जीवनापासूनच मी त्या दृष्टीने प्रयत्न आणि वाटचाल करत राहिले. यादरम्यान मला लहान भाऊ आणि वडील यांचा खूप सपोर्ट आणि प्रोत्साहन राहिले.

### अभ्यास

ध्येय निश्चित असल्यामुळे मी अकरावी-बारावीला ठरवूनच कला शाखेला प्रवेश घेतला. विषयदेखील सामाजिक जीवनाशी निगडित आणि यूपीएससी परीक्षेत उपयोगी पडतील असेच निवडले. स्पर्धा परीक्षेच्या तयारीची मुहूर्तमेढ म्हणून फाउंडेशन कोर्सही केला. फर्ग्युसन महाविद्यालयात बी.ए.ला प्रवेश घेतल्यानंतर मी अभ्यासाचे तासही वाढवले. यूपीएससी ही सातत्य आणि संयमाची परीक्षा आहे. त्यामुळे अभ्यासात सातत्य ठेवणे महत्त्वाचे ठरते. अभ्यासक्रम खूप मोठा असल्याने आपण साधारणत: तो पूर्ण करण्यासाठी १०-१२ तास देणे अपेक्षित असते. त्याप्रमाणे अभ्यास केला. पहिल्या प्रयत्नात अपयश आले. मात्र झालेल्या चुका शोधल्या. पुन्हा जोमाने अभ्यासाला लागले आणि दुसऱ्याच प्रयत्नात आयएएस होण्यात मी यशस्वी झाले.

### अभ्यासाची पद्धत

या परीक्षेसाठी ठरावीक अभ्यास पद्धती नसतेच मुळी. आणि ती नसावीही. कारण अभ्यासक्रमाचा व्याप एवढा असतो की एखादी ठरावीक पद्धत त्याला लागू होईलच असे नाही. ती प्रत्येकाला वेगवेगळी लागू होते. अभ्यासक्रम पूर्ण करताना आपल्याला जी पद्धत योग्य आणि सोपी वाटते ती आपण अवलंबवायला हवी.

वृत्तपत्रीय लिखाणामुळे मला लिहिण्याची अडचण येत नव्हती, परंतु फॅक्ट्स (वस्तुनिष्ठ माहिती) लक्षात राहत नसे. त्यामुळे मी ते लक्षात ठेवण्यावर अधिक भर दिला. माझी ही पद्धत सर्वांना लागू होईलच असे नाही. कुणाला एकदा वाचल्यानंतर लक्षात राहते, कुणी स्वत:च्या नोट्स काढतात तर कुणी गट चर्चा, वरिष्ठांचे मार्गदर्शन, माहितीपट, लिखाण आदींवर भर देतात.

त्यामुळे स्वत:ची अभ्यास शैली विकसित करावी आणि त्याप्रमाणेच अभ्यास करावा. शिवाय महत्त्वपूर्ण मासिके आणि वृत्तपत्रांचे नियमित वाचन करावे. त्यातील काही घटना, वस्तुनिष्ठ माहिती नोट्सच्या रूपात नमूद करावी.

### मुक्तपत्रकारितेचा फायदा

फर्ग्युसन महाविद्यालयात बी.ए.ला असतानाच मी टाइम्स ऑफ इंडिया या इंग्रजी आणि नावाजलेल्या वृत्तपत्रात मुक्तपत्रकार (फ्रीलान्सर) म्हणून काम करण्यास सुरुवात केली होती. यामुळे मला वेळेत लिहिण्याची सवय झाली. शिवाय त्यामुळे मला नागरिकांसोबत संवाद साधता आला. त्यांच्या समस्यांचे आकलन होऊन त्याची धग जाणवली. त्याचा मला परीक्षेत उत्तर लिहिताना आणि मुलाखतीदरम्यान चांगला फायदा झाला.

प्रेरणा

### मार्गदर्शन

या परीक्षेची तयारी करताना सर्वप्रथम आपणच आपले मार्गदर्शक असतो. आपल्यालाच माहिती असते की आपला किती अभ्यास झाला आहे. कोणत्या विषयाचा अधिक अभ्यास करायला हवा. शिवाय अभ्यासही आपल्यालाच करावा लागतो. याचा अर्थ असा नाही की कुणाच्या मार्गदर्शनाची गरजच नसते. पण हेही तितकेच खरे की फक्त मार्गदर्शनानेच





### आत्मपरीक्षण

यूपीएससीची परीक्षा देण्याचा निर्णय घेतला तेथेच आपण अर्धी लढाई जिंकलेलो असतो. आपण आत्मपरीक्षण करून आपल्या जमेच्या बाजू (स्ट्रेन्थ) आणि कमकुवत बाजू (विकनेसेस) जाणून घ्यायला हव्यात. त्या लक्षात घेऊन परीक्षेची तयारी केली तर अधिक चांगले परिणाम मिळतात. आपल्या जमेच्या बाजूंबाबत आत्मविश्वास बाळगावा आणि कमकुवत बाजूंवर कशी मात करता येईल, यावर चिंतन करावे. परीक्षेदरम्यान अथवा मुलखतीदरम्यान ज्या काही चुका झाल्या असतील त्या दुसऱ्या वेळेला होणार नाहीत याची काळजी घ्यावी.

यश मिळवता येत नाही. त्यासाठी स्वत: परिश्रम घेणे आवश्यक ठरते. मी अकरावी व बारावीदरम्यान फाउंडेशन कोर्स केला होता. शिवाय बी.ए.ला असताना पहिल्या प्रयत्नादरम्यान युनिक ॲकेडमीच्या टेस्ट सिरीज व ज्ञान प्रबोधिनीचे मार्गदर्शन घेतले होते. त्याचबरोबर स्वयंअध्ययनावरही भर दिला होता. मार्गदर्शनामुळे आपल्या तयारीत नेमकेपणा येतो.

अभ्यास करताना, वाचन करताना काय महत्त्वाचे आहे हे आपल्याला कळते. यामुळे आपला वेळ वाचतो आणि अभ्यास झाल्याचे समाधानही मिळते.

अभ्यासाची दिशा ठरावी यासाठी शिकवणी लावणे साहजिक आहे. पण त्यासाठी दिल्लीला गेलेच पाहिजे असे काही नाही. किमान स्रोतांच्या माध्यमातूनही चांगले यश मिळवता येते. ग्रामीण भागातील विद्यार्थिनींनी कसलाही न्यूनगंड न बाळगता अभ्यासात सातत्य व नेमकेपणा आणत तयारी केली तर यश अगदी हाकेच्या अंतरावर असते.

### प्लॅन बी तयार असावा

यूपीएससी ही संयमाची परीक्षा आहे. ठरावीक प्रयत्नांमध्ये यश मिळेलच असे नाही. अटेम्प्ट (प्रयत्न) वाढत जातात तसतसे मानसिक दडपण येते. तयारीदरम्यान हे दडपण येऊ नये यासाठी अपयश आलेच तर करिअरचा दुसरा मार्ग आपल्याकडे तयार असावा. एरवी दरम्यानच्या काळात आपला एवढा अभ्यास झालेला असतो की इतर परीक्षांमध्ये आपण सहज यश मिळवू शकतो.

### मुलाखतीची तयारी

मुलाखत म्हणजे आपल्या चुका शोधण्यासाठी बसलेले पॅनल नव्हे. किंबहुना आपण काय आहोत, काय बोलतो, कशी उत्तरे, प्रतिक्रिया देतो, आपल्या मनाशी आपण किती एकनिष्ठ आहोत, पुढे आपल्या कामाशी आपण किती एकनिष्ठ असणार आहोत हे पाहण्यासाठी हे पॅनल असते.

आपल्या एकंदरीत व्यक्तिमत्त्वाचा ठाव घेण्याचे काम पॅनल करत असते. चांगला प्रशासक निवडण्याची जबाबदारी त्यांच्यावर असते. त्यामुळे आपण पूर्णपणे सकारात्मकतेने उत्तरे देणे एवढेच लक्षात ठेवावे. आपले व्यक्तिमत्त्व अधिकारी बनण्यासाठी पात्र आहे की नाही, याची चाचपणी मुख्यत्वे मुलाखतकार करत असतात. इतर बाबींमध्ये त्यांना रस नसतो.

मात्र जेथे आपल्या उत्तराबाबत, प्रामाणिकपणाबाबत शंका उपस्थित होते तेथे आपल्याला मुलाखतकार अडचणीचे प्रश्न विचारणार हे लक्षात ठेवावे. त्यामुळे आपली उत्तरे प्रामाणिक असावीत.

पहिल्यांदा मुलाखतीला सामोरे जाण्यापूर्वी, मुलाखतीला जाऊन आलेल्या उमेदवारांचे मार्गदर्शन घ्यावे.

**शब्दांकन : राजाराम देवकर**

# यशाची पायाभरणी



ऊस उत्पादक शेतकऱ्यांना रास्त आणि किफायतशीर भाव देण्यासंदर्भात केंद्रशासन ठोस निर्णय घेईल, अशी ग्वाही केंद्रीय अर्थ मंत्री अरूण जेटली यांनी मुख्यमंत्र्यांना दिली. ऊस उत्पादक शेतकरी व साखर उद्योगांसमोरील प्रश्नांसदर्भात मुख्यमंत्र्यांच्या नेतृत्वाखालील सर्वपक्षीय शिष्टमंडळाने अरूण जेटली व अन्न व सार्वजनिक वितरण, ग्राहक संरक्षण मंत्री रामविलास पासवान यांची भेट घेऊन त्यांना मागण्यांचे निवेदन सादर केले.

साखर निर्यातीला सबसिडी देण्यात यावी, २० लाख मेट्रीक टन साखर निर्यात करून प्रति मेट्रीक टनास ५ हजार रूपये सबसिडी देण्यात यावी, साखर विकास निधीतून देण्यात आलेले तीन वर्षासाठीचे कर्ज आणखी दोन वर्षे वाढवून मिळावे, केंद्रशासनाने ५० लाख मेट्रीक टनाचा बफर स्टॉक करावा व यातून येणारे व्याज साखर कारखान्यांना देण्यात यावे, साखरेचे भाव व उत्पादन खर्चात तफावत निर्माण झाली आहे, त्यामुळे

**राज्यातील दुष्काळग्रस्त भागास केंद्रीय मदत, मुंबईतील सागरी रस्ते प्रकल्प, मुंबई मेट्रो दराचा प्रश्न तसेच ऊस उत्पादक शेतकऱ्यांना रास्त आणि किफायतशीर भाव (एफआरपी) मिळावा व साखर उद्योगांसमोरील प्रश्नांसदर्भात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिल्लीत केंद्रीय मंत्र्यांच्या भेटीत या प्रश्नांची सोडवणूक करण्यासंदर्भात अपेक्षित यश मिळविले आहे.**

साखर कारखान्यांच्या कर्जाची पुनर्रचना करण्यात यावी, आदी मागण्या सर्वपक्षीय शिष्टमंळाने अरूण जेटली यांच्याकडे केल्या.

ऊस उत्पादकांना रास्त व किफायतशीर भाव (एफआरपी) देण्यासंदर्भात व महाराष्ट्रातील साखर उद्योगांसमोरील प्रश्नांची सोडवणूक करण्यासाठी सकारात्मक निर्णय लवकरात लवकर घेतला जाईल, अशी ग्वाही अरूण जेटली व रामविलास पासवान यांनी मुख्यमंत्र्यांना दिली आहे. या सर्वपक्षीय शिष्टमंडळात केंद्रीय ग्राहक संरक्षण राज्यमंत्री रावसाहेब दानवे, सहकारमंत्री चंद्रकांत पाटील, सार्वजनिक बांधकाममंत्री एकनाथ शिंदे, साखर संघाचे अध्यक्ष व खासदार विजयसिंह मोहिते-पाटील, विधानसभेचे विरोधी पक्षनेते राधाकृष्ण विखे-पाटील, विधान परिषदेचे विरोधी पक्ष नेते धनंजय मुंडे, खासदार राजू शेट्टी, संजय काका पाटील, श्रीकांत शिंदे यांचा समावेश होता.

### मेट्रो दरासंदर्भात पद्मनाभ समिती

मुंबईतील मेट्रो दरासंदर्भातील तिढा सोडविण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केंद्रीय नगर विकास मंत्री व्यंकय्या नायडू यांची भेट घेऊन मुंबई मेट्रो दराचा प्रश्न मार्गी लावण्यात यश मिळवले. व्यंकय्या नायडू यांनी मुंबई मेट्रो दराच्या प्रश्नांसदर्भात अभ्यास करण्यासाठी निवृत्त न्यायमूर्ती पद्मनाभ यांच्या अध्यक्षतेखाली समिती




**दुष्काळग्रस्तांना साहाय्य :** केंद्रीय गृहमंत्री राजनाथ सिंह यांची भेट घेऊन महाराष्ट्रातील दुष्काळाची तीव्रता व शेतकऱ्यांची आर्थिक स्थिती याबाबत निवेदन मुख्यमंत्र्यांनी सादर केले. दुष्काळग्रस्त भागास केंद्रशासनाकडून अधिकाधिक निधी मिळावा असा आग्रह मुख्यमंत्र्यांनी यावेळी धरला. राजनाथ सिंह यांनी दुष्काळग्रस्त भागासाठी केंद्रशासन भरघोस निधी देईल, अशी ग्वाही दिली, एवढेच नव्हे तर राजनाथ सिंह यांनी महाराष्ट्राने सादर केलेल्या निवेदनावर



स्वत:च्या अध्यक्षतेखाली समिति नेमून अभ्यास करण्याचे आश्वासन दिले. केंद्रशासन महाराष्ट्रातील दुष्काळग्रस्त भागातील शेतकऱ्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहील, अशी ग्वाही राजनाथ सिंह यांनी मुख्यमंत्र्यांना दिली.

## उच्च शिक्षणाचा दर्जा वाढवणार

उच्च शिक्षणाचा दर्जा सुधारावा तसेच विद्यार्थ्यांना आपल्या आवडीचे इतर विषयही शिकता यावेत यासाठी महाराष्ट्रातील विद्यापीठांमध्ये निवड आधारित श्रेणी पद्धत येत्या शैक्षणिक वर्षापासून लागू करण्यात येणार असल्याची माहिती उच्च व तंत्र शिक्षण मंत्री विनोद तावडे यांनी दिली. केंद्रीय मनुष्यबळ विकासमंत्री स्मृती इराणी यांची तावडे यांनी भेट घेऊन राज्यातील विविध शैक्षणिक विषयांवर सविस्तर चर्चा केली. नागपूर येथे भारतीय व्यवस्थापन संस्था (आय.आय.एम.) सुरू करण्यात येणार असून या संस्थेचे पालकत्व अहमदाबाद आय.आय.एम.कडे सोपविण्यात येणार असल्याचे तावडे यांनी सांगितले. राज्यात अन्य ठिकाणी आय.आय.एम. किंवा इतर संस्था सुरु करण्यासंदर्भात उच्चस्तरावर विचारविनिमय करण्यात येत आहे, असे त्यांनी सांगितले.

येत्या शैक्षणिक वर्षापासून राज्यात शाळादर्पण योजना सुरू करण्यात येणार असल्याचेही विनोद तावडे यांनी दिल्ली येथे जाहीर केले आहे. पहिल्या टप्प्यात जिल्हा परिषद, नगर परिषद, महानगर पालिकांच्या शाळांमध्ये ही योजना लागू करण्यात येणार आहे. या योजनेंतर्गत विद्यार्थ्यांचे व्यवस्थापन व प्रगतीचे मूल्यांकन करण्यात येणार आहे. विद्यार्थ्यांचे मूल्यांकन त्यांच्या पालकांना मोबाईल संदेशाद्वारे कळविण्यात येणार आहे.

राज्यातील शालेय शिक्षणातील शिक्षण सेवकांच्या ३ हजार ५०० जागा लवकरच भरण्यात येतील, तसेच अंशकालीन निदेशकांच्या पदनिर्मितीस केंद्रशासनाची मान्यता मिळाली असून लवकरच ही पदे भरण्याची प्रक्रिया सुरु करण्यात येईल, असे तावडे यांनी सांगितले आहे.



नेमण्याचा निर्णय लगोलग घेतला. या निर्णयामुळे मुंबई उच्च न्यायालयाने यापूर्वी दिलेल्या आदेशास स्थगिती देण्याची विनंती राज्य शासनाच्यावतीने उच्च न्यायालयास करण्यात येणार आहे, असे मुख्यमंत्री फडणवीस यांनी नायडू यांच्या भेटीनंतर स्पष्ट केले.

### सागरीरस्ते प्रकल्पांना गती

मुंबईतील सागरीरस्ते प्रकल्प अस्तित्वात यावा यासाठी श्री. फडणवीस यांनी वरिष्ठ अधिकाऱ्यांसह केंद्रीय पर्यावरण राज्यमंत्री प्रकाश जावडेकर यांची भेट घेऊन सविस्तर चर्चा केली. या सागरीमार्गास पर्यावरण मंत्रालयाची लवकरच परवानगी मिळेल असे संकेत जावडेकर यांनी दिले आहेत.

मुंबईतील सागरी रस्ते प्रकल्पामुळे वाहतुकीचा ताण कमी होण्यास कशी मदत होणार आहे, याबरोबरच पर्यावरणाचा ऱ्हास होणार नाही यादृष्टीने राज्यशासनाने आखलेल्या या प्रकल्पाचे सादरीकरण प्रकाश जावडेकर यांच्यासमोर करण्यात आले. सागरी रस्ते प्रकल्पात अडचण ठरणाऱ्या सी.आर.झेड. (कोस्टल रेग्युलेशन झोन) नियमांमध्ये सुधारणा करण्यात येईल, असे आश्वासन जावडेकर यांनी या बैठकीत मुख्यमंत्र्यांना दिले. पर्यावरणाच्या हानीशिवाय विकास साध्य करण्याचे केंद्र शासनाचे धोरण आहे या दृष्टीने राज्यशासनाने काम करावे, असे जावडेकर यांनी मुख्यमंत्र्यासमवेतच्या भेटीत स्पष्ट केले. नरिमन पॉइंट ते मालाड-कांदिवली या ३४ किलोमीटर मार्गावर इमारत बांधकामांना परवानगी नाकारण्यासाठी राज्यशासन कायदा करेल व कोणत्याही परिस्थितीत पर्यावरणाचा ऱ्हास होऊ दिला जाणार नाही, असेही मुख्यमंत्र्यांनी स्पष्ट केले.

**— दयानंद कांबळे**

❑ ❑

# सुरक्षित प्रवासाची हमी




**दिलखुलास कार्यक्रमातून जानेवारी महिन्यात रस्ते सुरक्षा अभियान, ई–विश्वकोश इत्यादी महत्त्वाच्या विषयांवर प्रसारित झालेल्या मुलाखतींचा हा थोडक्यात आढावा...**

सुरक्षित रस्ते प्रवासाला प्राधान्य देणार असल्याचे प्रतिपादन परिवहन मंत्री दिवाकर रावते यांनी दिलखुलास कार्यक्रमातून केले. सुरक्षित प्रवासामध्ये महिलांच्या सुरक्षित प्रवासाला प्राधान्य देऊन एस.टी. बसमध्ये शेवटचे आसन शाळेमध्ये जाणाऱ्या मुलींसाठी आरक्षित ठेवण्याच्या सूचना करण्यात आल्या आहेत. तसंच शाळेत जाणाऱ्या मुलांच्या स्कूल बसमध्ये सुरक्षिततेला प्राधान्यक्रम देण्यात आला आहे. ते स्वत: महिला आणि मुलांच्या सुरक्षित प्रवासाच्या बाबतीत आग्रही आहेत, असे त्यांनी कार्यक्रमात आवर्जून सांगितले. याबरोबरच मदत करत असताना वैद्यकीय सुविधा वेळेत मिळाव्यात म्हणून सर्वांनीच प्रयत्न करणे आवश्यक आहे. अपघाताच्या वेळी एक सर्वसामान्य नागरिक म्हणून अपघातग्रस्तांना मदत करावी. मदत करणाऱ्यांच्या पाठीशी शासन सदैव राहील, अशी ग्वाही दिवाकर रावते यांनी मुलाखतीत दिली.

### जिद्दीचे रोल मॉडेल

मा. राष्ट्रपती यांच्या हस्ते केंद्र शासनाच्या सामाजिक न्याय विभागाच्या पुरस्काराने सन्मानित करण्यात आलेल्या सोमय्या महाविद्यालयाच्या उपप्राचार्या डॉ.कल्पना, खराडे यांचा जीवनप्रवास दिलखुलास कार्यक्रमातील मुलाखतीत उलगडला. जन्मापासूनच अल्पदृष्टीचे आव्हान घेऊन शिक्षण घेत असताना त्यांना अनंत अडचणींना सामोरं जावं लागलं. रेटिनाईटोस फिगमेनटोस या दुर्धर आजारावर रशियात जाऊन अंधत्व दूर करण्याचा उपचार घेत असतानाच रशियात रशियन भाषा आणि शिक्षण क्षेत्रातील अभ्यासक्रम आणि पीच.डी. ही पदवी संपादन केली. तसंच १९९१ पासून मुंबईतील सोमय्या महाविद्यालयात प्राध्यापक म्हणून काम करित असताना आलेले अनुभव दिलखुलासमध्ये त्यांनी सांगितले. अपंगांनी, अंधानी निराश न होता आपणही सामाजातील मुख्य प्रवाहाचा भाग आहोत हे समजून आपला स्वत:चा एक रस्ता निर्माण करावा. अशावेळेस लोकांकडून एक एक दिवा आपल्या पदपथावर आपोआप लावला जातो. असा आशावाद त्यांनी आपला जीवनप्रवास उलगडताना व्यक्त केला.

**रस्ते अपघातात जखमी झालेल्या नागरिकांसाठी शासनामार्फत जीपीएस यंत्रणेसह १००० रुग्णवाहिका कार्यरत आहेत.**

### घराघरात विश्वकोश

कोणीही व्यक्ती मराठी भाषेतील ज्ञानापासून वंचित राहू नये, तंत्रज्ञानाचा कुशल वापर, मराठीचा प्रभावी प्रसार या विश्वकोशाच्या ब्रीद वाक्याप्रमाणे घराघरात ज्ञानाचा खजिना उपलब्ध करून देण्यात विश्वकोश निर्मिती मंडळ काटिबद्ध असल्याची ग्वाही डॉ. विजया वाड यांनी दिलखुलास मुलाखतीतून दिली. कुमार विश्वकोश, बोलका, कन्याकोश, तसेच इतर विश्वकोशांच्या खंडांची सविस्तर माहिती त्यांनी दिली. दिलखुलास कार्यक्रम लाखो श्रोते ऐकतात असा आवर्जून उल्लेख करून www.marathivishwakosh.in या वेबसाईटवर असलेल्या माहितीचा फायदा अधिकाधिक लोकांपर्यंत पोहोचेल असा विश्वास डॉ.वाड यांनी व्यक्त केला.

### अपयशी विद्यार्थ्यांसाठी आशेचे किरण

प्रत्येकामध्ये निसर्गाने अमर्याद क्षमता जन्मत:च निर्माण केलेल्या असतात. बऱ्याचदा आपली क्षमता आपण एखाद्या परिक्षेत कमी गुण मिळाले यावरून ठरवतो. पण हा गैरसमज असून आपण यशस्वी होण्यासाठी आत्मविश्वास असण्याची नितांत गरज असते. असे दिलखुलास कार्यक्रमात आमंत्रित ज्येष्ठ समुपदेशक महेंद्र भैसाणे यांनी सांगितले.

विशेषत: दहावी बारावीच्या परिक्षेत अनुत्तीर्ण झालेल्यांसाठी www.bharukaka.com या वेबसाईटच्या माध्यमातून आणि ०९८१९७७८२७८ या हेल्पलाईनच्या माध्यमातून समुपदेशन आणि मार्गदर्शन ते करीत असतात. मुलांनी आपला गेलेला आत्मविश्वास परत कसा मिळवावा, अभ्यासाचे नियोजन कसे करावे तसंच पालकांचा सहभाग विद्यार्थ्यांच्या अभ्यासाठी कसा असावा याविषयी त्यांनी मार्गदर्शन केलं.

**— मीरा ढास**



**दिवाकर रावते**
परिवहन मंत्री



**डॉ. कल्पना खराडे**
उपप्राचार्या, सोमय्या महाविद्यालय



**महेंद्र भैसाणे**
समुपदेशक



**विजया वाड**
अध्यक्ष, विश्वकोश निर्मिती मंडळ

# सात शतके लोकप्रियतेची...

# उद्योगराष्ट्राची ग्वाही

**एक समाजाभिमुख कार्यक्रम अशी ओळख असलेल्या ‘जय महाराष्ट्र’ या कार्यक्रमातून प्रक्षेपित करण्यात आलेल्या काही मुलाखतींचा हा थोडक्यात आढावा...**

‘मेक इन महाराष्ट्र’ संकल्पना आणि राज्याचे औद्योगिक धोरण याविषयी जाणून घेण्यासाठी ‘जय महाराष्ट्र’ कार्यक्रमात निमंत्रित करण्यात आले होते, राज्याचे उद्योगमंत्री सुभाष देसाई यांना. राज्याचे औद्योगिक धोरण कसे असेल याचे चित्रच त्यांनी जय महाराष्ट्र कार्यक्रमातून उभे केले. येत्या काळात विदेशी गुंतवणुकीबरोबरच देशांतर्गत गुंतवणूक राज्यात येण्यासाठी प्रोत्साहन देणार असल्याचे ते म्हणाले.

नव्या उद्योगासाठी गुंतवणूकदारांना विविध प्रकारच्या ७० ते ८० परवानग्या घ्याव्या लागतात. मात्र, येत्या काळात त्यात कमी करून त्या २५ वर आणण्यात येणार असून नव्या उद्योगांना प्रोत्साहन देणार असल्याचे मंत्रिमहोदयांनी सांगितले. यासोबतच ‘मेक इन इंडिया’च्या धर्तीवर उद्योग जगताला नवसंजीवनी देणारा ‘मेक इन महाराष्ट्र’ कार्यक्रम राबवण्यात येत आहे. मेक इन महाराष्ट्र यशस्वी झाल्यास ‘मेक इन इंडिया’ ही यशस्वी होईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

महाराष्ट्राच्या उद्योग क्षेत्राचा येत्या काळात समतोल विकास साधून देशभरात उद्योग क्षेत्रात महाराष्ट्र आघाडीवर कसा येईल, यासाठी प्रयत्न करण्यात येतील हे या कार्यक्रमाच्या माध्यमातून अधोरेखित झाले. खऱ्या अर्थाने ‘जय महाराष्ट्र’ कार्यक्रमातून ‘उद्योगराष्ट्राची’ ग्वाही देण्यात आली.

### लोकोत्तर नररत्ने...

माजी पंतप्रधान अटलबिहारी वाजपेयी आणि बनारस हिंदू विद्यापीठाचे संस्थापक पंडित मदनमोहन मालवीय यांना केंद्र सरकारने अलीकडेच भारतरत्न हा सर्वोच्च नागरी सन्मान जाहीर केला आहे. या पार्श्वभूमीवर वाजपेयी आणि मालवीय यांच्या जीवनचरित्र आणि कर्तृत्वाचा आढावा घेण्यासाठी ‘जय महाराष्ट्र’ कार्यक्रम प्रसारित करण्यात आला. लेखक आणि चित्रपट समीक्षक सुधीर नांदगावकर यांची ज्येष्ठ पत्रकार सुधीर जोगळेकर यांनी मुलाखत घेतली. या मुलाखतीत पंडितजी आणि वाजपेयींमध्ये असलेले साम्य, उभयतांची जडणघडण, राजकीय वाटचाल आदींची माहिती नांदगावकर यांनी दिली. अटलजींची मुंबईतील पहिली सभा ते पंतप्रधानपर्यंतचा प्रवास नांदगावकरांनी या कार्यक्रमातून उलगडून दाखविला. अटलजींच्या मुंबईतील पहिल्यावहिल्या सभेला मोजकेच नागरिक उपस्थित होते. मात्र अटलजींनी आपल्या नेहमीच्याच आवेशात भाषण केल्याची आठवण नांदगावकरांनी सांगितली. शिवाय त्यांच्या पंतप्रधानपदाच्या कार्यकाळात झालेली पोखरण अणु चाचणी हे जागतिक स्तरावरचे मोठे यश असल्याचेही त्यांनी कार्यक्रमादरम्यान सांगितले.

> **‘जय महाराष्ट्र’ कार्यक्रम आता ‘प्राइम टाइम’मध्ये**
>
> **२७ जानेवारीपासून जय महाराष्ट्र हा कार्यक्रम दर मंगळवार आणि शुक्रवारी रात्री ७.१५ ते ८.०० या ‘प्राइम टाइम’मध्ये प्रसारित होणार आहे. १६ ऑगस्ट २००७ पासून सुरू झालेल्या व सलग आठ वर्षे, अखंड ७०० पेक्षा जास्त भाग पूर्ण केलेल्या या कार्यक्रमाने दूरदर्शनच्या ‘टॉप टेन’ कार्यक्रमातील आपले स्थान कायम राखले आहे.**

### पाल्यांकडे लक्ष द्या...

जगभरात आज अमली पदार्थांचा विळखा पाहायला मिळत आहे. मोठ्यांबरोबरच अनेक तरुण मुले या व्यसनांच्या आहारी गेली आहेत. या पार्श्वभूमीवर, पालकांनी आपल्या मुलांकडे लक्ष द्यावे म्हणजे ते या व्यसनांकडे वळणार नाही, असा सल्ला मुंबई येथील अमली पदार्थ विरोधी पथकाचे प्रमुख नामदेव चव्हाण यांनी ‘जय महाराष्ट्र’ कार्यक्रमातून दिला. अंमली पदार्थ म्हणजे काय, त्याचे सामाजिक आणि कौटुंबिक पातळीवर होणारे दुष्परिणाम, अमली पदार्थ कायदा आदींविषयी अतिशय सोप्या शब्दात त्यांनी माहिती दिली.

— **अतुल पांडे**



**सुभाष देसाई**
उद्योगमंत्री



**सुधीर जोगळेकर**
ज्येष्ठ पत्रकार



**सुधीर नांदगावकर**
लेखक, समीक्षक



**नामदेव चव्हाण**
प्रमुख, अमली पदार्थ विरोधी पथक




# ट्विटरवर महान्यूज

देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखालील नवे सरकार अडीच महिन्यांचे झाले आहे. त्याला आता बाळसे येऊ लागले आहे, असे म्हणायला हरकत नाही. आपले वेगळेपण सिद्ध करण्यासाठी कामाचा झपाटाही वाढला आहे. मुख्यमंत्री स्वत: बैठका आणि कार्यक्रमांमध्ये सतत व्यस्त आहेत. प्रत्येक गोष्ट बारकाईने समजून घेण्याकडे त्यांचा कल दिसून येतोय. गतिमान आणि पारदर्शी कारभार करण्याकडे त्यांचा कटाक्ष आहे. त्यांचाच कित्ता गिरवत इतर मंत्री आणि प्रशासनही लोकहिताच्या कामांमध्ये व्यग्र झाले आहेत.



माहिती व जनसंपर्क महासंचालनालय हे मुख्यमंत्र्यांच्याच अखत्यारीतील. त्यामुळे साहजिकच महासंचालनालयातील अधिकारी कर्मचाऱ्यांनीही वेळेचे भान न ठेवता मुख्यमंत्र्यांच्या बैठकांमधील निर्णय आणि कार्यक्रमांना विविध माध्यमांद्वारे नागरिकांपर्यंत तातडीने पोहोचविण्यासाठी कंबर कसली आहे.

शासनाचे निर्णय, योजना, उपक्रमांची माहिती तातडीने प्रसिद्ध करण्याची परंपरा महान्यूज या माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाच्या अधिकृत वेब पोर्टलने २००८ पासून अखंडपणे जपली आहे. शासनाने घेतलेले लोकहिताचे निर्णय आधुनिक तंत्रज्ञानाद्वारे जनतेपर्यंत गतीने पोहोचवणे ही महान्यूज निर्मिती मागील संकल्पना होती. महासंचालनालयाच्या तत्कालीन महासंचालक आणि सध्याच्या सचिव मनीषा पाटणकर–म्हैसकर यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू झालेल्या 'महान्यूज' या न्यूज पोर्टलने आपल्या उपयुक्ततेने अल्पावधीतच नेटिझन्सची पसंती मिळविली आणि ती सातत्याने वाढतही आहे. इंटरनेटच्या माध्यमातून शासनासंदर्भात खात्रीशीर आणि एकत्रित माहिती मिळण्याचे ते एकमेव माध्यम बनले आहे. आजही 'टीम महान्यूज' ही जबाबदारी अखंडपणे पार पाडीत आहे.

महान्यूजवरून शासनाच्या निर्णय आणि कार्यक्रमांना तातडीने प्रसिद्धी दिली जातेच. आता महान्यूजवरील बातम्यांना मुख्यमंत्र्यांच्या ट्विटर आणि फेसबूक अकाऊंटवरही स्थान दिले जाऊ लागले आहे. महान्यूजवरील बातम्यांच्या लिंक मुख्यमंत्र्यांच्या अकाऊंटवर प्रसिद्ध केल्या जातात. यामुळे साहजिकच महान्यूजची




**महान्यूजवरून शासनाचे निर्णय आणि कार्यक्रमांना तातडीने प्रसिद्धी दिली जातेच. आता महान्यूजवरील बातम्यांना मुख्यमंत्र्यांच्या ट्विटर आणि फेसबूक अकाऊंटवरही स्थान दिले जाऊ लागले आहे. महान्यूजवरील बातम्यांच्या लिंक मुख्यमंत्र्यांच्या अकाऊंटवर प्रसिद्ध केल्या जातात. यामुळे महान्यूजची जबाबदारीही वाढली आहे**

जबाबदारीही वाढली आहे. असून आपल्या लौकिकाला साजेशा तातडीने आणि बिनचूक बातम्या देण्यास टीम महान्यूजही कटिबद्ध आहे.

मुख्यमंत्र्यांनी स्वत: सोशल साईट्सचा वापर सुरू केल्याने महासंचालनालयानेदेखील आपल्या पारंपरिक कार्यपद्धतीमध्ये बदल करीत महान्यूजवरील बातम्यांना MahaDGIPR` Twitter अकाऊंटवरून तत्काळ प्रसिद्धी देण्यास सुरुवात केली आहे. काही महिन्यांपूर्वी पर्यंत महान्यूजवर दररोज सुमारे पाच हजारांवर असणाऱ्या युनिक हिट्सची संख्या आता सुमारे सहा ते साडेसहा हजार युनिक हिट्सपर्यंत वाढली असल्याने नव्या कार्यपद्धतीचेही स्वागतच होत असल्याचे दिसून येत आहे.

म्हैसकर मॅडमच्या दूरदृष्टीचा अंदाज त्या महासंचालक असतानाच्या सुरुवातीच्या काळात खूप कमी लोकांना आला असेल कदाचित... शासकीय चौकटीत विविध उपक्रम यशस्वी होऊ शकतील का असा प्रश्नही पडला असेल... परंतु उपलब्ध कर्मचाऱ्यांच्या क्षमतेचा उपयोग करून घेऊन अखंड आणि यशस्वीपणे सुरू असलेल्या महान्यूज, दिलखुलास, जय महाराष्ट्र या विविध माध्यमांतील उपक्रमांची घोडदौड पाहता तोंडात बोटे न गेली तरच नवल.

— **ब्रिजकिशोर झंवर**

# गुजरातमध्ये MAHARASHTRA Ahead

७ते ९ जानेवारी या काळात गुजरात येथील गांधीनगर मध्ये प्रवासी भारतीय दिवसाचा कार्यक्रम पार पडला. हजारो अनिवासी भारतीय या कार्यक्रमाला आले होते. या राष्ट्रीय स्तरावरील मुख्य कार्यक्रमात महाराष्ट्राच्या सर्वांगीण विकासाची मांडणी करण्यासाठी माहिती व जनसंपर्क महासंचालनालयामार्फत महाराष्ट्र अहेडचा विशेषांक काढण्यात आला. या अंकाची या आंतरराष्ट्रीय व्यासपीठावर विशेष चर्चा झाली. पाच हजार अंकाचे तीन दिवसात वाटप करण्यात आले. महाराष्ट्र अहेडचे रिलॉँचींग अशा प्रकारे गुजरातच्या भूमीवर गाजले.




प्रवासी भारतीय दिवसाच्या निमित्त आयोजित कार्यक्रमात विदेशातील शिष्टमंडळे सामील झाली होती. अधिकाधिक विदेशी गुंतवणूक आपल्या राज्याकडे आकर्षित व्हावी यासाठी वेगवेगळ्या राज्यांमार्फत प्रयत्न केले जात होते. या परिसरात आशिया खंडातील सर्वात मोठी प्रदर्शनी आयोजित करण्यात आली होती. प्रत्येक राज्यांचे सुसज्ज दालने उभारण्यात आली होती. या दालनात संबंधित राज्याच्या प्रमुख कार्यक्रमाच्या जाहिराती, उद्योग, व्यवसाय, सेवा



क्षेत्र, पायाभूत सुविधा आणि पर्यटन याबद्दलचे अनेक मॉडेल ठेवण्यात आले होते. यामध्ये लक्ष वेधून घेत होते, राज्या-राज्यामधील प्रमुख प्रकल्पांबाबतचे साहित्य. अनेक शिष्टमंडळांना महाराष्ट्राची माहिती महाराष्ट्र अहेडद्वारे अचूकरीत्या मिळत होती. या वार्षिक संमेलनात महाराष्ट्राची बाजू आणि बदल ठळकपणे लक्षात यावा, यासाठी माहिती व जनसंपर्क महासंचालनालय विभागाच्या सचिव आणि एडिटर-इन-चिफ मनीषा पाटणकर-म्हैसकर आणि व्यवस्थापकीय संपादक चंद्रशेखर ओक यांच्या मार्गदर्शनानुसार गेल्या दोन महिन्यापासून 'महाराष्ट्र अहेड' या नव्या स्वरूपातील नियतकालिकाचे नियोजन केले होते.

या अंकात बदललेल्या महाराष्ट्राचे चित्र रेखाटण्यात आले आहे. सर्व मंत्र्यांचे आगामी वर्षातील महाराष्ट्राच्या हिताच्या संकल्पावर आधारित विशेष लेखाचा समावेश करण्यात आला आहे. मेक इन महाराष्ट्र आणि गुंतवणुकीच्या संधी संदर्भातील मुख्यमंत्र्यांची भूमिका यात समाविष्ट करण्यात आली आहे. उद्योगमंत्री सुभाष देसाई यांच्या 'कव्हर स्टोरी'मुळे राज्यातील उद्योग व्यवसायातील नेमक्या स्थितीचा अंदाज विदेशी गुंतवणूकदारांना घेता आला. अनेक देशातील पत्रकारांना महाराष्ट्राबद्दलच्या सद्य:स्थितीचा मजकूर त्यांना मिळाल्याबद्दल त्यांनी राज्य सरकारचे आभार मानले. एखाद्या मासिकाचा राज्याच्या प्रगतीसाठी वापर करण्याची ही अभिनव कल्पना त्यामुळे यशस्वी झाली.

विशेष म्हणजे कोणत्याही अन्य राज्याचे साहित्य अशा प्रकारे आयोजन स्थळी सर्वत्र वितरित झाले नव्हते. त्यामुळे मुख्यमंत्र्यांसोबत 'लाइव्ह संवाद' आणि हातात 'महाराष्ट्र अहेड' असे चित्र शेवटच्या सत्रात गांधी मंदिर परिसरात पाहायला मिळाले.

**— प्रवीण टाके**

**'महाराष्ट्र अहेड' या इंग्रजी अंकाचे मूल्य ५० रुपये असून वार्षिक वर्गणी ५०० रुपये आहे. वार्षिक वर्गणी वरिष्ठ सहायक संचालक (प्रकाशने) माहिती व जनसंपर्क महासंचालनालय बरेक क्र. १९ फ्री प्रेस जरनल मार्ग, मुंबई - ४०० ०२१ या पत्त्यावर मनिऑर्डरने पाठवावी किंवा लेखाधिकारी, मा. व ज. स., मंत्रालय, मुंबई यांचे नावे मुंबई येथे वठणाऱ्या शाखेचा डिमांड ड्राफ्ट पाठवावा.**




**टेकसेव्ही असलेले मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी महाराष्ट्राच्या विकासाच्या अनुषंगाने अनेक महत्त्वाचे निर्णय गेल्या तीन महिन्यात घेतले आहेत. या निर्णयांची माहिती ते तत्काळ ट्विटरद्वारे प्रसृत करतात. गतिमान आणि पारदर्शक विकासासाठी त्यांची आत्यंतिक तळमळ या ट्विटसमधून दिसून येते. गेल्या महिनाभरातील त्यांच्या काही ट्विटसचा हा आढावा.**

राज्यातील दुष्काळप्रवण भागातील सिंचनाचा प्रश्न निकालात कसा काढता येईल, याविषयी कणेरी (जिल्हा कोल्हापूर) येथे भारतीय संस्कृती मेळाव्याचे उद्‌घाटन करताना –

I talked about making 5000 villages drought free & that our Govt will prepare a policy on organic farming soon.

थोर राष्ट्रभक्त आणि आझाद हिंद सेनेचे संस्थापक सुभाषचंद्र बोस यांच्या जयंतीदिनी –

My Salutations to the Great Patriot & a Visionary Leader Netaji Subhash Chandra Bose on His Birth Anniversary!

State Govt decides to rename Employment & Self Employment Dept as 'Skill Development & Entrepreneurship',post of Principal secretary created.

राजमाता जिजाऊ यांना जयंतीनिमित्त अभिवादन केल्यानंतर...

Paid tributes to Aai Jijau, yesterday. Hon Union Minister @nitin_gadkariji &BJP State President Shri Danveji present.

भेंडी बाजारच्या पुनर्विकासाबाबत –

Assured complete support for Bhendi Bazaar redevelopment project to the delegation of Saifee Burhani Upliftment Trust.

हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांना जयंतीनिमित्त माझे शत शत नमन.



### ज्येष्ठ उद्योगपती रतन टाटासोबत 'ब्रेक फास्ट'

Had a breakfast meeting with @RNTata2000 ji this morning.I thank for his valuable insight to take Maharashtra forward



ईशान्य भारतातील विद्यार्थ्यांशी संवाद साधल्यानंतर ...

It was great to interact with north-east students from ABVP's Students' Experience in Inter-state Living (SEIL) program.

स्वामी विवेकानंद यांना आदरांजली

"Only way to check limits of possible is to go beyond impossible."

- Swami Vivekananda

My Salutations to Swamiji on His Birth Anniversary!

लष्कर दिनानिमित्त लष्करातील अधिकाऱ्यांचा सन्मान केल्यानंतर...

Honoured to honour the brave officers & attend the investiture dinner yesterday, on occasion of Army Day 2015.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी अंशदानित सिलेंडर न घेण्याचा निर्णय घेतला. त्यानंतर त्यांनी मंत्रिमंडळातील आपल्या सहकाऱ्यांनाही अंशदानित सिलेंडर न घेण्याचे आवाहन केले.

I surrender my subsidised LPG Connection & urge all Ministers in State to use non subsidised LPG. Great initiative by Hon @dpradhanbjpji.

❑ ❑




सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन
माहिती आणि जनसंपर्क महासंचालनालयाद्वारे निर्मित
शासन आणि जनता
यांच्यात संवाद दृढ करणारे...
सर्वत्र : सर्वोत्तम
लोकराज्य
४ लाख खप
४० लाख वाचक
ऐकायलाच हवा
दिलखुलास
संवाद...
@२१९०
لوک راجیہ
उर्दू लोकराज्य
जय महाराष्ट्र
लाखो दर्शकांची थेट-भेट घडवून देणारे...
नाबाद...७२४ भाग
बातमी खात्रीची
माहिती प्रगतीची
वेध भविष्याचा
महान्यूज
@१ कोटी ५५ लाख
MAHARASHTRA
Ahead
माहिती व जनसंपर्क महासंचालनालय
https://dgipr.maharashtra.gov.in
माध्यमे संवादाची : जनतेच्या विश्वासाची

R.N.I.No. 14140/57/Postal Registration No. MCS-072/2015-17
Posted at Mumbai Patrika Channel Sorting Office, From 18th to 24th February 2015
Date of Publication : 10th of every Month

# बदलता महाराष्ट्र - बदलता लोकराज्य

- जाणकारांचे लेख
- यशस्वितांच्या कथा
- तज्ज्ञांच्या मुलाखती
- उपयुक्त सूचना

संग्राह्य विशेषांक :
एखाद्या विषयाचा सर्वांगीण आढावा घेणारे




आज आणि उद्यासाठीही

# लोकराज्य

वार्षिक वर्गणी रु.१००

प्रति/ TO

O.I.G.S. भारत सरकार सेवार्थ
लोकराज्य LOKRAJYA

प्रेषक / From

दिगंबर वा. पालवे
वरिष्ठ सहायक संचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय
महाराष्ट्र शासन, बरॅक नं. १९, फ्री प्रेस जर्नल मार्ग, मुंबई ४०० ०२१

लोकराज्य हे मासिक महाराष्ट्र शासनाच्या वतीने मुद्रक व प्रकाशक चंद्रशेखर ओक, महासंचालक,माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई यांनी एच. टी. मीडिया लि. प्लॉट नं. ६, टी. टी. सी. एम. आय. डी. सी. इंडस्ट्रियल एरिया, दिघे, ठाणे-बेलापूर रोड, नवी मुंबई - ४०० ७०८ येथे मुद्रित करून माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई -४०० ०३२ येथे प्रसिद्ध केले.
मुख्य संपादक : चंद्रशेखर ओक